BMM 2026
Seattle - BMM

# शब्द रुची

बीएमएम सिॲटल अधिवेशन विशेषांक
जुलै-सप्टेंबर २०२६ - मूल्य १०० रुपये



सुमन कल्याणपूर यांनी साकारलेले चित्र



# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
# दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४००० ६५



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ अर्थात दादासाहेब फाळके चित्रनगरी कार्यरत असून या महामंडळाची स्थापना २६ सप्टेंबर १९७७ रोजी करण्यात आली आहे.
दादासाहेब फाळके चित्रनगरी ५२१ एकर परिसरात वसली असून यामध्ये सोळा पेक्षा जास्त अद्यावत कलागारे व साठहून अधिक बाह्य चित्रीकरण स्थळे आहेत.

## चित्रपट क्षेत्रासाठी शासनाच्या योजना



- आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य करणे.
- दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य करणे .
- महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक कला व क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींच्या जीवनावर आधारित मराठी चित्रपट / माहितीपट / लघुपट यांना सहाय्यक अनुदान देणे.
- महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे व पुरस्काराचे आयोजन करणे.

## मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ

- मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळावे याकरिता महामंडळ गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या बाजार विभागात, कान आंतरराष्ट्रीय महोत्सवाच्या बाजार विभागात यासह विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होते

CANNES FILM FESTIVAL

International Film Festival of India

## चित्रीकरण परवानग्यांसाठी एक खिडकी योजना

- राज्यात विविध ठिकाणी चित्रीकरण करताना विविध परवानग्या लागतात, या परवानग्या एकच ठिकाणाहून
- मिळाव्या यासाठी 2017 मध्ये सिंगल विंडो यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. दादासाहेब फाळके चित्रनगरी याची अंमलबजावणी संस्था म्हणून कार्य करते.
- फिल्मसिटी गोरेगाव येथे शूटिंग करणाऱ्या मराठी निर्मात्यांना कायमस्वरूपी 50% सवलत देण्यात येत आहे.
- www.filmcell.maharashtra.gov.in

## उपक्रम

- चित्रपताका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन.
- चित्रपट रसास्वाद उपक्रमातर्गत दर महिन्याला एक चित्रपट पाहण्याची संधी.

## एनडी स्टुडिओ

- दिवंगत कला दिग्दर्शक नितीन देसाई स्टुडिओ शूटिंग करिता पुन्हा एकदा सज्ज झालं असून त्याचे परिचालन फिल्मसिटी गोरेगाव करीत आहे.
- www.booking.ndsartworld.com


- अधिक माहितीसाठी -
वेबसाईट - www.filmcitymumbai.org , www.filmcell.maharashtra.gov.in
इमेल - promfscdc@gmail.com , दादासाहेब फाळके चित्रनगरी,गोरेगाव(पूर्व) मुंबई - ४०००६५

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द
# रुची

बीएमएम अधिवेशन विशेषांक
जुलै-सप्टेंबर २०२६ – मूल्य १०० रु.

संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

कार्यालयीन संपर्क
**ग्रंथाली संगणक विभाग**
shabdruchee24@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम**

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : (०२२) ६८८४२२१२ **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया पुढील मेलवर पाठवावी.**
shabdruchee24@gmail.com

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

- **साधी राहणी.. अन् गोड गाणी! / ७**
  अश्विन बापट
- **चालतेबोलते व्यासपीठ / १०**
  मधु मोहिते
- **आनंदयात्री श्रीनिवास खळे / १२**
  जयंत जोशी
- **अभिजात स्वर / १४**
  शैला दातार
- **हे झाड जगावेगळे / १७**
  डॉ. निर्मोही फडके
- **ग्रामीण जीवनाचा अस्सल शब्दचित्रकार / २१**
  राजीव श्रीखंडे
- **वीणाताईंचं गारुड! / २४**
  अश्विनी भोईर
- **स्मिता भागवत एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व / २९**
  डॉ. प्रियदर्शन मनोहर
- **ॲनी अरनॉक्स / ३१**
  संजीवनी खेर
- **नव्या दिशा न्यू डिरेक्शन्सची मालिका / ३५**
  नंदन जोशी
- **हॉलिवूड डायरी / ३९**
  जयंत नाईकनवरे
- **वृत्तांत / ४५ ते ५४**
- **ग्रंथपाने / ५५ ते ५८**

# संपादकीय

**मुखपृष्ठावर** बीएमएम सिॲटल विशेषांक असा उल्लेख आहे. त्यानिमित्त हा अंक. अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या द्वैवार्षिक संमेलनात याही वेळी ग्रंथाली पुस्तकांचा स्टॉल घेऊन सहभागी होत आहे. मराठी साहित्य सातत्याने ३४ वर्षे तिथे नेणारी ग्रंथाली एकमेव आहे. त्याचा वृत्तांत पुढील अंकात.

समाजाला समृद्ध करून गेल्या तीन-चार महिन्यांत काही व्यक्ती आपलं स्थान सोडून काळाच्या पडद्याआड निघून गेल्या. आशा भोसले, सुमन कल्याणपूर, प्रसाद सावकार, चंद्रकात लिमये, या गायकांनी मनाला आनंद दिला. नाटक जगलेल्या, मराठी नाटकाला वेगळा पैलू देणाऱ्या, ते जगाच्या रंगभूमीवर नेणाऱ्या विजया मेहता बाई झाल्या आणि त्या शिस्तीत अनेक कलावंत घडले. 'युक्रांद'चे संस्थापक कुमार सप्तर्षी यांनी सामाजिक हक्कांसाठी आंदोलने उभारली. सर गारफील्ड सोबर्स यांनी अद्वितीय अष्टपैलू खेळाने क्रिकेटविश्वात कायमची मोहोर उमटवली. या साऱ्यांचे योगदान विसरता येणार नाही. एकेका व्यक्तीचे एकेक चरित्रलेखन होईल अशी त्यांची कामगिरी.

'ग्रंथाली' आणि 'मातृभूमी सेवा ट्रस्ट' यांनी एकत्रित काही पुस्तके प्रकाशात आणली. स्मिता भागवत या संस्थेच्या संस्थापक. उत्तम आणि अभ्यासू लेखिका अशी त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनाचे वृत्त क्लेशकारक आहे.

काही नामवंतांचे जन्मशतब्दीवर्ष नुकतेच झाले किंवा होत आहे. संगीतकार श्रीनिवास खळे, गायिका माणिक वर्मा ही संगीतातील दोन वंदनीय नावे. जयंत जोशी आणि शैला दातार यांनी त्यांच्याबद्दल लिहिले आहे. तशीच वसंत नरहर फेणे आणि शंकर पाटील, ही साहित्यातील व्यक्तिमत्त्वे. प्रसिद्धीपासून दूर राहिलेले द्रष्टे कथाकार, कादंबरीकार वसंत नरहर फेणे आणि ग्रामीण जीवनाचे विविध पैलू प्रभावीपणे मांडणारे कादंबरीकार, कथा-पटकथाकार शंकर पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त डॉ. निर्मोही फडके आणि राजीव श्रीखंडे यांनी लेख लिहिले आहेत.

सुमन कल्याणपूर एक अमीट ठेवा मागे ठेवून गेल्या आहेत. त्यांची गाणी ऐकावी आणि मनाला तोषवावे, लता मंगेशकर यांच्याशी निष्कारण तुलना न करावी, हे खरे रसिकत्व. त्यांच्या आठवणी त्यांच्यासह मैफल अनुभवलेल्या गायक-वादकांनी, संवादक मंगला खाडिलकर यांनी अश्विन बापट यांच्याकडे मांडल्या. त्यांचा लेख अंकात आहे. सुमन कल्याणपूर गाण्याबरोबर पाककला आणि चित्रकला यातही निपुण होत्या. त्यांच्या चित्रकारितेची साक्ष या अंकाच्या मुखपृष्ठावरील चित्रातून पटेल.

युवकांची चळवळ, त्यांच्या ऊर्जेचे सकारात्मक लढ्यासाठी उत्थान घडवणारे डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासह कार्यरत असलेले मधु मोहिते यांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला आहे. स्मिता भागवत यांच्या आठवणी डॉ. प्रियदर्शन मनोहर यांनी जागवल्या आहेत.

'ग्रंथाली'शी संपर्क म्हणजे ग्रंथाली वॉच आणि ग्रंथाली-प्रतिभांगण हे दोन यूट्यूब चॅनेल सबस्क्राइब करणे.

यापुढचा अंक ऑक्टोबर-डिसेंबर दिवाळी विशेषांक असेल. विविध माहितीपूर्ण विषय, कथा, कविता असे त्याचे स्वरूप असेल.

**- अरुण जोशी**



SECUTECH
SECURING INDIA'S
CRITICAL INFRASTRUCTURE
Smart Technology. Integrated Solutions. Safer Tomorrow.
From intelligent surveillance to integrated command centres, we deliver end-to-end security solutions that empower organisations, protect infrastructure and enhance everyday safety.
TRUSTED BY GOVERNMENT & ENTERPRISES
25+ YEARS OF EXCELLENCE
COMMITTED TO A SAFER INDIA
SECUTECH
AI ANALYTICS
COMMAND CENTRES
REAL-TIME MONITORING
OUR INTEGRATED SOLUTIONS
INTEGRATED COMMAND AND CONTROL CENTER
End-to-end solutions for control rooms with video walls, operator consoles and real-time dashboards.
VISITOR MANAGEMENT SYSTEM (DIGI PRAVESH)
Secure visitor registration with Aadhaar & QR verification, pre-registration, digital gate passes, real-time tracking and instant host notifications.
INTELLIGENT TRAFFIC MANAGEMENT
Smart traffic management with adaptive signalling, violation detection and real-time traffic flow optimisation for safer mobility.
AI VIDEO SURVEILLANCE
High-performance IP cameras and AI analytics for real-time monitoring and proactive threat detection.
25+ Years of Excellence
300+ Team Size
32+ Awards
8+ Offices
12+ Certificates
Secutech Automation (I) Pvt. Ltd.
Unit No. 401, 4th Floor,
A Wing, Kohinoor Square,
Opp. Shiv Sena, Dadar (W),
Mumbai: 400028
+91 93219 12030
helpdesk@secutechautomation.com
www.secutechautomation.com


BUILDING TRUST.
CREATING LANDMARKS.
SHAPING TOMORROW.
SHASHWAT
- REALTY -
SINCE 2015
CRAFTING EXCEPTIONAL SPACES.
BUILDING LASTING LEGACIES.
Shashwat Realty is a real estate development company committed to creating exceptional spaces across Pune and Mumbai with trust, innovation and enduring value.
From our first development, our focus has remained unwavering – to build with integrity, deliver with excellence and earn lasting trust through transparency and quality.
As we expand, our ambition is not simply to build more, but to create enduring landmarks that shape the future of Maharashtra.
CRAFTING EXCEPTIONAL SPACES ACROSS PUNE AND MUMBAI WITH TRUST, INNOVATION AND ENDURING VALUE.
OUR STRENGTHS
THOUGHTFUL DESIGN
Spaces designed for comfort, functionality and modern living.
QUALITY CONSTRUCTION
Superior materials and best-in-class construction standards.
TIMELY DELIVERY
Commitment to on-time delivery and transparency.
CUSTOMER FOCUSED
Building lasting relationships through trust, service and customer satisfaction.
VALUE DRIVEN
Delivering long-term value and sustainable growth.
ETHICAL & TRANSPARENT
Upholding the highest standards of ethics and transparency.
10+ YEARS OF EXPERIENCE
5+ ONGOING PROJECTS
300+ HAPPY FAMILIES
PUNE MUMBAI & BEYOND
WE DON'T JUST BUILD BUILDINGS,
WE BUILD TRUST, COMMUNITIES AND A BETTER TOMORROW.
CORPORATE OFFICE
Office No. 301,
Crystal Empire,
Next to Karnataka Bank,
Baner Road, Pune - 411045
EMAIL
shrikant@shashwatrealty.com
PHONE
+91 84322 85454

सिॲटल

# साधी राहणी.. अन् गोड गाणी!



अश्विन बापट

संगीतामध्ये एक अशी जादू असते, जी तुम्हाला वेगळ्या विश्वात नेते. तुमची दुःखं, वेदना तुम्हाला विसरायला लावते. तुमचं जगणं सुखावते. मधुर स्वरांनी आपल्यासारख्या रसिकांचं जगणं समृद्ध करणाऱ्या अशाच एका गायिकेनं नुकताच आपला निरोप घेतला. त्या ख्यातनाम गायिका म्हणजे सुमन कल्याणपूर. 'सुमन सुगंध' हा त्यांच्या संगीतप्रवासाचा आढावा घेणारा गाजलेला कार्यक्रम. या कार्यक्रमातील कलाकार मंडळींसह याच नावाच्या पुस्तकाच्या लेखिका मंगला खाडिलकरांशी संवाद साधला असता या सर्वांनीच सुमनताईंच्या आठवणींचा कोलाज मांडला.

'गोड गळा, साधी राहणी आणि साधं वागणं यांचा संगम म्हणजे सुमन कल्याणपूर. त्यांच्यासोबत एका स्टेजवर कार्यक्रम करता आला, हे आमचं भाग्य.' असं सांगत 'सुमन सुगंध' या सुमनताईंच्या संगीतमय कार्यक्रमाचे संगीतसंयोजक आप्पा वढावकर भरभरून बोलू लागले. ते सांगू लागले, 'मला थेट सहा दशकांपूर्वीचा तो काळ आठवतो. माझे वडील राम वढावकर यांनी संगीतबद्ध केलेली गीतं सुमनताईंनी गायली होती. सिनेमाचं नाव होतं, शोधा म्हणजे सापडेल. गाण्यांचे बोल होते 'लपा फुलांनो लपा' आणि 'माझ्या मनी उगा का फुलली वसंतवेल.' तेव्हा त्या आमच्या घरी आलेल्याही मला आठवतात. मी तेव्हा १४ वर्षांचा असेन. त्यांच्या रिहर्सलमध्ये मी त्यांना हार्मोनियमची साथ करत असे. त्यानंतर गेल्या १०-१५ वर्षांमध्ये 'सुमन सुगंध' हा कार्यक्रम आम्ही केला. अत्यंत सोज्वळ बोलणं, साधेपणा हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. त्यांचं मूळ नाव सुमन हेमाडी. दाक्षिणात्य मूळ असल्यानं त्यांनी मराठी, हिंदी गाणी गाताना त्या त्या भाषेतले शब्दोच्चार समजून घेतले. त्या शब्दांचं सौंदर्य, बलस्थान याचा त्यांनी अभ्यास केला. ही गीतं गाताना त्यांनी उच्चारांवर खूप मेहनत घेतली. ज्याचा मोठा इम्पॅक्ट आपल्याला त्यांच्या गाण्यांमध्ये जाणवतो. दशरथ पुजारी, कमलाकर भागवत आणि अशोक पत्की या तीन संगीतकारांची त्यांनी गायलेली गीतं खास गाजली. मराठीप्रमाणेच हिंदीतही त्यांनी आपला असा वेगळा ठसा उमटवलाय.'

'सुमन सुगंध' या कार्यक्रमात साथसंगत करणारे ज्येष्ठ बासरीवादक विजू तांबे म्हणाले, 'कोणत्याही वाद्याशिवाय अतिशय सुरांत गायलेलं गाणं हे मी त्यांच्यासोबत कार्यक्रम करताना अनुभवलंय. या कार्यक्रमात त्या एखादं गाणं गुणगुणायच्या तेव्हा ते इतकं सुरांत असे, की ऐकणारे आणि आम्ही स्टेजवरची वादक मंडळी मंत्रमुग्ध होऊन जात असू.'

याच कार्यक्रमात सहभागी होणारा गायक मंदार आपटे

म्हणाला, 'साधारण २००९च्या सुमारास मंगला खाडिलकरांचं 'सुमन सुगंध' हे पुस्तक प्रकाशित झालं आणि सुमन कल्याणपूर बऱ्याच काळानंतर रसिकांसमोर आल्या. त्यांनी गायन पंधरा-वीस वर्षं आधीच थांबवलं होतं. मोठ्या ब्रेकनंतर त्या परत आल्या, त्या या पुस्तकाच्या आणि 'सुमन सुगंध' कार्यक्रमाच्या निमित्तानं. त्यांची गाणी इतकी गोड आणि आपल्या हृदयाच्या कप्प्यात घर करून आहेत, की इतक्या वर्षांनी त्या प्रेक्षकांसमोर येऊनही लोकांचा त्यांना जो प्रतिसाद लाभला, त्यानं त्या आनंदून गेल्या. पुन्हा एकदा कार्यक्रमात सहभागी होऊ लागल्या. त्या काहीशा बुजऱ्या स्वभावाच्या होत्या. कमी बोलणाऱ्या. मंगलताई त्यांना छान बोलतं करत. सुमनताई मध्येच दोन ओळी गुणगुणत. त्यांच्या त्या दोन ओळीही ऐकायला कमाल असायच्या.

'आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे' आणि 'नाना करते प्यार तुम्हीसे' यांसारख्या युगलगीतांची झलक या कार्यक्रमात मला त्यांच्यासोबत गाऊन सादर करता आली, हे माझं मोठं भाग्य आहे. गायकापेक्षा म्हणजे व्यक्तीपेक्षा त्याची कला, गायकी मोठी असते, हे सुमनताईंनी आपल्या वागण्या-बोलण्यातून आम्हा तरुण मंडळींना शिकवलं. कलेवर निष्ठा ठेवून वाटचाल करावी हा त्यांचा अत्यंत मोलाचा सल्ला आम्हाला आमच्या कारकिर्दीतही उपयोगी पडतोय.

'एक संगीतकार म्हणून माझी खूप इच्छा होती, की एक तरी गाणं त्यांनी माझ्यासाठी गावं. ज्येष्ठ कवी गंगाधर महांबरे यांची रचना असलेली एक अंगाई मी त्यांच्यासाठी कंपोज केली होती. परंतु तो योग कधी आलाच नाही ही रुखरुख मनात कायम राहील.

'असं असलं तरी त्यांचा लाभलेला सहवास हीच आमची श्रीमंती.'

'सुमन सुगंध' या कार्यक्रमात आप्पा वढावकर यांच्यानंतर प्रशांत लळीत संगीतसंयोजन करायचा. या अनुभवाबद्दल प्रशांतला विचारलं असता त्यानं सांगितलं, 'आम्ही २०२२पर्यंत अंदाजे २५ कार्यक्रम केले. सतत हसरा



सुमन कल्याणपूर आणि साथीदार

चेहरा हे त्यांचं मला भावलेलं वैशिष्ट्य. आम्ही कलाकार मंडळी त्यांच्या वयाच्या, अनुभवाच्या तुलनेत अगदीच नवखे होतो. तरी त्या अत्यंत आपलेपणानं आमच्याशी संवाद साधत. त्यांनी गुणगुणलेल्या गीताच्या एखाद्या ओळीनंही अवघं थिएटर स्तब्ध होत असे आणि मग टाळ्यांचा कडकडाट होत असे. ही त्यांच्या सुरांची जादू होती, जी आम्ही स्टेजवर कार्यक्रम सादर करताना अगदी जवळून अनुभवली. 'केतकीच्या बनी', 'नाविका रे' ही त्यांची गाणी खूप मोठा प्रतिसाद मिळवत असत.

'सुमन सुगंध'च्या लेखिका, ख्यातनाम निवेदिका मंगला खाडिलकरांनीही सुमनताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळे पैलू मांडले. त्या म्हणाल्या, मी 'पंचकन्या स्मरेनित्यं' हा एक कार्यक्रम केला होता. तेव्हा माझी आणि सुमनताईंची प्रथम ओळख झाली. या कार्यक्रमात सुमनताईंशिवाय उषा मंगेशकर, सुलोचना चव्हाण, मालती पांडे आणि माणिक वर्मा या गायिकांची गाणी अशी संकल्पना घेऊन हा कार्यक्रम मी गुंफला होता. त्यावेळी सुमनताईंबद्दल अत्यल्प माहिती उपलब्ध असल्यामुळे त्यांच्यावर लिहिण्याची निकड भासू लागली. तेव्हा त्यांना पुन्हा पुन्हा भेटून मी लिखाणासाठी आग्रह करू लागले. 'सुमन सुगंध' पुस्तकाची नांदी तिथूनच झाली. पुढे त्यांचे पती नंदाजींच्या प्रेमळ आग्रहामुळे त्या अखेर माझ्याशी बोलण्यास तयार झाल्या. पुस्तक आणि याच शीर्षकाच्या कार्यक्रमानं आमच्यातला स्नेहाचा धागा आणखी घट्ट झाला. २००६ ते २००९ अशी तीन वर्षं आम्ही या पुस्तकावर काम केलं. त्यांच्याशी या पुस्तकानिमित्तानं बोलताना त्यांचा साधेपणा तर मला भावलाच. तसा काही गोष्टींबद्दल त्यांचा ठामपणाही मी अनुभवला. विचारांशी तडजोड न करता गायचं, हाच सुमनताईंचा ध्यास असायचा. तल्लख बुद्धिमता, तल्लख स्मरणशक्ती आणि अतिशय गोड आवाज याचा संगम त्यांच्यामध्ये झाला होता. त्यांनी मराठी, हिंदीसह मगधी, ब्रज, मारवाडी, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, आसामी अशा विविध तेरा भाषांमध्ये सुमारे साडेतीन हजार गाणी गायली




मंगला खाडिलकर आणि सुमन कल्याणपूर

आहेत. 'कसक' नावाचा गझलसंग्रह आणि उर्दू गायकीतील नात, मुनाजात यांसारखे गायनप्रकारही त्यांनी सिनेसंगीताच्या निमित्तानं गायले. ठुमरी, भजनंही त्यांनी गायली.

'वतन की पुकार', 'माँ की सौगंध' यांसारख्या सिनेमांमधली गाणी गायल्यानंतर या क्षेत्रापासून काहीशा दूर गेल्या. काळानुरूप या क्षेत्रातलं बदलत गेलेलं वातावरण त्यांना मानवलं नाही. त्यांनी मग या क्षेत्रापासून अलिप्त राहणंच पसंत केलं.

गाण्याशिवाय खाण्याचीही त्यांना फार आवड. त्या उत्तम स्वयंपाक करत आणि लोकांना तितक्याच प्रेमानं खाऊ घालत. त्यांच्या हातचे केक, सॅलेड; इतकंच काय तर त्यांनी केलेल्या व्हेज बिर्याणीची चव काही औरच असे. त्यांच्या या खाद्यपदार्थांच्या वस्तूंबाबतही त्यांचा नेमकेपणा असे. म्हणजे अमुक एक पदार्थ बनवताना किंवा तो सर्व्ह करताना त्यांना विशिष्ट भांडं किंवा चमचा लागत असे. नेमकेबद्दल त्यांचा आग्रह असायचा.

तसंच १९६५पासून देशासह जगभरात त्या जितक्या ठिकाणी गेल्या तिथल्या अतिशय दुर्मिळ वस्तूंचा त्यांच्याकडे मोठा संग्रह आहे. पुढे १९७०च्या दशकातही हातमागावरची प्रदर्शनं असोत किंवा हस्तकलेच्या वस्तूंचं प्रदर्शन असो, सुमनताईंची आवर्जून उपस्थिती या प्रदर्शनांना असायची. गुलाबाच्या फुलांचीही त्यांना विशेष आवड होती. अशा प्रदर्शनांमध्ये तर त्या इतक्या तल्लीन होत की त्यांना त्या ठिकाणहून काही वेळा खेचून आणावं लागत असे. त्यांनी घरातही पानाफुलांचं अप्रतिम कलेक्शन ठेवलं आणि जोपासलं.

त्यांच्या गाण्याबद्दल बोलू तितकं कमी आहे. भावनांचे अनेक कंगोरे त्यांनी गाण्यांतून उलगडलेत. 'या लाडक्या मुलांनो', 'आईसारखे दैवत साऱ्या', 'मृदुल करांनी छेडित तारा', 'सांग कधी कळणार तुला', 'धौम्यऋषी सांगतसे रामकथा पांडवा', 'जिथे सागरा धरणी मिळते', 'इथून दृष्ट काढते निमिष एक थांब तू...' अशी किती गाणी सांगू! प्रत्येक गाणं वेगळ्या रंगाचं, वेगळ्या भावना ध्वनित करणारं, काळजाचा ठाव घेणारं आहे. 'चांद' या सिनेमातलं 'कभी आज कभी कल' हे गाणं लतादीदी आणि सुमनताईंनी गायलंय. हे या दोन दिग्गज गायिकांनी गायलेलं एकमेव ड्युएट आहे. मला सुमनताईंचा इतका सहवास लाभला हे माझं भाग्य. सुमनताईंबद्दल मी इतकंच म्हणेन, की मनानं, स्वरानं आणि वृत्तीनं ही सुमनासम कोमल असलेली एक महान पार्श्वगायिका काळाच्या पडद्याआड गेली.'

आता कृतार्थ जीवनगाण्याची सांगता झालीय.

**– अश्विन बापट**

ashwin ashb2906@gmail.com

सिॲटल

# चालतेबोलते व्यासपीठ



**मधु मोहिते**
एक युक्रांदीय

**डॉ.** कुमार सप्तर्षींचे निधन म्हणजे हजारो कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक विद्यापीठ लोप पावणे होय. वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच त्याने सामाजिक न्याय्य भूमिका घेण्यास सुरुवात केली. संवेदशील मनाच्या कुमारने पुण्यातील बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये असताना डॉ. अरुण लिमये, डॉ. अनिल अवचट, डॉ. जब्बार पटेल, सतीश आळेकर, अनिल लिमये व पुढे डॉ. रत्नाकर महाजन असे त्याचे सहकारी होते. अशा अनेक सहकाऱ्यांचे साहाय्य घेऊन, त्याने जयप्रकाश नारायण यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून बिहार राज्यातील दुष्काळग्रस्तांसाठी मदतकेंद्र सुरू केले. गया जिल्ह्यातील रजौली गावात तळ ठोकून अविरत सेवा केली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जातीयता व बिहार राज्यातील सामाजिक परिस्थितीचे अवलोकन केल्यानंतर युवकांना सोबत घेऊन त्याने ‘युवक क्रांती दल’ या संघटनेची स्थापना केली. दलित म्हणजे सामाजिक व आर्थिक दृष्ट्या जे मागास आहेत अशा जनसमूहांच्या पुढाकाराने क्रांतिकारी बदल घडवून आणणे हे राजकीय व सामाजिक उद्दिष्ट ठेवले. स्वतःची व अनेक सहकाऱ्यांची जात उच्च समजली जात होती त्यांना डिकास्ट होण्याची प्रेरणा कुमारने दिली. दलितांवर हल्ला झाला तर युक्रांदच्या शेकडो कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे, तर त्या विचारांच्या पाठी प्रसंगी तुरुंगवास झाला, मार पडला तर झेलण्यासाठी तत्पर राहा, क्रांतिकारी पावलांच्या वाटेवर हे स्वाभाविक आहे अशीच शिकवण कुमारच्या प्रत्येक शब्दामध्ये होती. कुमारचे आपल्यातून निघून जाणे हे त्याच्यासोबत काम केलेल्या प्रत्येकाला जड झाले आहे.

माझ्यासारखा कार्यकर्ता युवक क्रांती दल या संघटनेने घेतलेल्या भूमिकेमुळे पूर्णवेळ कार्यकर्ता झाला. परंतु साधारण समज असताना, पूर्व अहमदनगर व आताच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील मु. राशीन, ता. कर्जत या गावात म्हणजेच कुमारच्या मूळ गावी ‘कम्युन’ पद्धतीने युक्रांदचे कार्यकर्ते राहात होते त्यामध्ये मी मॅट्रिकची परीक्षा देऊन सहभागी झालो होतो. जानेवारी ते जून १९७५ दरम्यान अनेक जिल्ह्यांतील कार्यकर्ते आले होते. शहरात राहणाऱ्या काही कार्यकर्त्यांना ग्रामीण भागातील बाजरी/ज्वारी भाकरी खाणे, जमिनीवर सतरंजीवर झोपणे, खुल्या जागेवर शौचालयास जाणे, पदयात्रा म्हणून गावागावात जाणे, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची माहिती घेणे – प्रबोधन करणे, गावातील बकाल दलित वस्तीत मीटिंग करणे, मिळेल ते जेवण करणे इत्यादी अनेक गोष्टी नित्याच्या नव्हत्या. त्यामुळे सगळे सहजसुलभ होणे अवघड होते. मात्र प्रेरणा देणारा कुमार सप्तर्षी होता. त्याच्या आश्वासक भूमिकेमुळे, सकाळी सुरू केलेल्या प्रभातफेरीमध्ये क्रांती म्हणजे काय, सत्याग्रही भूमिका आणि महात्मा गांधीजींचे विचार, समाजवाद, लोकशाही समाजव्यवस्था इत्यादी गोष्टींवर तो कार्यकर्त्यांशी

बोलायचा. त्यांना बोलते करायचा. एखाद्या गावातील पदयात्रेत आपल्याशी लोकांनी जो संवाद केला त्यामधून काय बोध होतो, आपण काय करू शकतो, अशा प्रकारचा संवाद भल्यापहाटे एखाद्या माळरानावर करणे म्हणजे मंतरलेले दिवस वाटायचे. शोषितांचा आवाज बुलंद होऊ शकतो असे बळ मिळायचे. माझ्या मनावर इथे पैलू पाडले गेले. प्रभातफेरी आटोपून कम्युनमध्ये आल्यावर बऱ्याचदा नाश्ता करायला काही नसायचे. ज्येष्ठ कार्यकर्ते काहीतरी धावाधाव करून पोहे, भाकरीचे पीठ, तेल, मीठ-मसाला याची व्यवस्था करायचे. क्रांतिकारी लढ्याची ही पाठशाळा म्हणून याकडे पाहात होतो. या साऱ्या गोष्टी तावूनसुलाखून निघण्यासाठी कुमार बळ देत होता. कुमारचे बोलणे आणि सोपे करून सांगणे कमालीचे होते. अवघड पेपर सोडवताना मूळ सूत्र कसे समजून घ्यावे याची गुरुकिल्ली कुमार सप्तर्षींकडे होती.

मार्च-एप्रिल-मे १९७५ दरम्यान आणीबाणी जाहीर होण्याआधी राशीनमध्ये अशा प्रकारे काम सुरू होते. रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार, त्यातच ह्या कामाच्या ठिकाणी सवर्णांसाठी व दलितांसाठी पिण्याच्या पाण्याचा स्वतंत्र माठ ठेवलेला असे. भाकरीसाठी दोन्ही समाजांना अतोनात घाम गाळावा लागतो, मग एकच माठ ठेवून एकमेकांमधील अंतर का संपवू शकत नाही, असे प्रबोधन कुमार त्याच्या शैलीत प्रभावी करत असे. गावगुंड प्रस्थापित सत्ताधारी यांच्यासाठी दडपशाही करत, त्यांना सत्याग्रही भूमिकेने आपण विरोध करू शकतो यासाठी कुमार विश्वास देत होता. निर्भीडपणे मुकाबला करण्यासाठी ताकद देत होता.

राशीन आंदोलन सुरू करण्याआधी कुमार सप्तर्षी याचे नेतृत्व महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले होते. मुख्यतः २२ मार्च १९७३ रोजी पुरीचे शंकराचार्य निरंजनदेव तीर्थ यांच्याबरोबर दोन दिवस वैज्ञानिक दृष्टीने वाद घातला होता. हा वाद महाराष्ट्रात व देशभर गाजला होता. कुमार केवळ ३१ वर्षांचा असतानाच त्याला खूप प्रसिद्धी मिळाली होती. जुलै १९७१मध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, परभणी येथील कुलगुरू हटाव आंदोलन, कोयना भूकंप व जून १९७२ सोलापूर मेडिकल कॉलेज कॅपिटेशन विरोधी आंदोलन, आयुर्वेद कॉलेज, बी.एड. कॉलेज मालेगाव, १९७४चे मराठवाडा विकास आंदोलन अशा कितीतरी आंदोलनांत कुमार सप्तर्षीने नेतृत्व केले होते. आणीबाणी सुरू होण्यापूर्वी अशा प्रकारे आंदोलने करणाऱ्या कुमारला आणि युक्रांदच्या रंगा राचुरे, संदीपान बडगिरे, अजित सरदार, रामराव जाधव, व्यंकप्पा पत्की, डॉ. रत्नाकर महाजन, डॉ. अरुण लिमये यांना आणीबाणीत अटक झाली. शासनाच्या धोरणांना व वैचारिक परिवर्तनवादी भूमिकेला सत्ताधाऱ्यांनी गंभीर घेऊन ही कारवाई केली होती.

आणीबाणीनंतर निर्माण झालेल्या जनता पक्षात युक्रांदने



कुमार सप्तर्षी

सहभागी व्हावे अशी भूमिका कुमार सप्तर्षी व रत्नाकर महाजन यांनी आग्रहाने मांडली होती. युक्रांदच्या भूमिकेला अनुसरून संघटनेचे पूर्णवेळ काम करण्यासाठी एक संच उभा राहात असताना आघात झाला. कुमार आमदार झाला, परंतु जनता पक्ष अल्पजीवी ठरल्यामुळे कुमारच्या राजकीय वाटचालीला खीळ बसली. कुमारने म्हटले असते तर त्याला भाजप सोडून कोणत्याही पक्षात स्थान मिळाले असते. शरद पवार त्याचे जवळचे मित्र होते. राजकीय बस्तान बसवण्यात धन्यता न मानता विचारांची बांधिलकी व लोकशाही समाजवादी भूमिका घेऊन कुमार अनेक प्रयोगशील संस्था निर्माण करून सतत कार्यरत राहिला. ही एक निष्ठाच होती. राशीन येथे शाळा-कॉलेज सुरू केले, भारतीय समाज विकास व संशोधन संस्था यामार्फत ग्रामीण विकास केंद्र सुरू केले, १९९१मध्ये 'सत्याग्रही विचारधारा' हे वैचारिक मासिक सुरू करून एक प्रकारे आपले विचारपीठ धगधगते केले. पुढे २००१मध्ये युक्रांदचे पुनरुज्जीवन करून पुन्हा कार्यकर्ते प्रबोधित करणे, संघर्ष व विधायक उपक्रम राबवणे यास त्याने सुरुवात केली. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्याने या संस्थेचा मोठा कायापालट केला. विचारांचे व्यासपीठ, तरुणांच्या हक्काची ऊठबस व अनेक संस्थांना उपयुक्त, असे हे केंद्र बनले. कुमारचे संबोधन, प्रबोधन अव्याहत सुरू झाले. सारी दालने कुमारच्या विचारांची साक्षीदार झाली.

आता ते एक सळसळते, गजबजलेले केंद्र सुन्न झालेय. कुमारच्या सर्व कठीण प्रसंगी पाठीशी पहाडासारख्या उभ्या राहणाऱ्या ऊर्मिला सप्तर्षी यांचे योगदान विसरता येणार नाही. आज कुमार आपल्यामध्ये नाही हे सहन करणे कुमारवर प्रेम करणाऱ्यांसाठी सहज नाही. कुमार त्यांच्या मनात कायम राहणार हे निश्चित!

**– मधु मोहिते**

mmrmohite@yahoo.com

सिॲटल

# आनंदयात्री श्रीनिवास खळे



**जयंत जोशी**

**ख**ळेसाहेबांच्या अगणित आठवणी मनात ताज्या आहेत. त्यांचा हसरा चेहरा आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व मनात आहे. अनेक, पुसटशा, वेगवेगळ्या काळातल्या आठवणी झर्रकन डोळ्यांसमोरून जातात. त्यांची ही झलक.

१९९०च्या दशकात, एका संध्याकाळी, मी आणि माझी पत्नी, मुंबईत वर्सोव्याला, श्रीनिवास खळे यांच्या घरी होतो. ती तारीख होती ३० एप्रिल. खळेसाहेबांचा वाढदिवस होता. ते, त्यांची पत्नी, तिन्ही मुली खूप आनंदात होते. खळे यांची मित्रमंडळी जमली होती. मंगेश पाडगांवकर पार्टीचे सूत्रधार होते. खाण्यापिण्याची रेलचेल होती. पाडगावकरांच्या खुसखुशीत कॉमेंटमुळे सारे जण हसूहसून लोळायचेच बाकी होते. रात्री उशिरा आम्ही घरी निघालो.

एचएमव्हीमध्ये माझ्या वडिलांच्या रेकॉर्डिंगच्या वेळी खळेसाहेबांची आणि माझी ओळख झाली, की कारमायकेल रोडला झालेल्या वडिलांच्या एका खाजगी मैफलीत झाली ते नीट आठवत नाहीये, परंतु त्यांच्या सुंदर सुंदर भावगीतांमुळे संगीत-दिग्दर्शक म्हणून त्यांचे नाव लहानपणापासूनच माझ्या परिचयाचे होते. अजूनही त्यांची त्या काळातली भावगीते मराठी भावजीवनाचा भाग बनून राहिली आहेत.

एचएमव्हीमध्ये, फोर्ट भागात जाणे झाले तर त्यांची भेट व्हायची. मला हृदयनाथ मंगेशकर यांनी 'जैत रे जैत' सिनेमाच्या कॅसेटचे कव्हर आणि नंतर 'महानंदा' सिनेमाच्या एलपीचे कव्हर डिझाइन करायला सांगितले होते ते द्यायला, त्या निमित्ताने एचएमव्हीत जाणे झाले होते. दोन्ही वेळी खळेसाहेबांबरोबर खूप गप्पा रंगल्या होत्या. त्यांना गोष्टी सांगायला खूप आवडायचे. संथलयीत, सावकाश सावकाश किस्से उलगडायची त्यांची एक खास शैली होती.

काळ जात होता, वर्षे उलटत होती. एक दिवस वडिलांनी घरी सांगितले, खळे यांचा फोन आला होता. काही अभंगांच्या चाली ऐकवण्यासाठी ते आपल्या घरी येणार आहेत. आम्हाला खूप थ्रिलिंग वाटले. काही दिवसांनी खळेसाहेब आले. अतिशय गोड चाली होत्या त्यांच्या. रिहर्सलमध्ये ऐकून ऐकून घरातल्या आम्हा सर्वांच्याच त्या तोंडपाठ झाल्या. मोठ्या अक्षरात, वडिलांच्या गाण्याच्या वहीत ते अभंग मी लिहून काढले. आठवडाभर खळे आमच्याच घरी मुक्कामी होते. संध्याकाळपासून रात्री जेवायच्या वेळपर्यंत रिहर्सल व्हायच्या. जेवण झाल्यावर घरातले बाकी सारे झोपायला त्यांच्या त्यांच्या खोल्यांमध्ये निघून जायचे. खळेसाहेब खूप उशिरापर्यंत माझ्याशी गप्पा मारत बसायचे. कधी कधी तर पहाट व्हायची. त्यांचे मुंबईतले सुरुवातीचे दिवस, लताबाईंच्या रेकॉर्डिंगचे किस्से, लहानपणी

बडोद्याला त्यांनी ऐकलेल्या मैफिली, त्यांचे रेडिओतले दिवस, त्यांना भेटलेली विक्षिप्त माणसे... अनेक विषय. त्यांना त्यांच्या नवी चाली शिकवायला मनापासून आवडायचे. माझ्या बहिणीला आणि मला त्यांनी त्यावेळी गाणी शिकवली आणि बसवून घेतली होती.

खळेसाहेबांनी वडिलांसाठी केलेल्या अभंगांचे रेकॉर्डिंग मुंबईत सुरू झाले. पहिल्या दिवशी 'विठ्ठल गीती गावा, विठ्ठल चित्ती ध्यावा' या अभंगाचे रेकॉर्डिंग व्हायचे होते. आम्ही सारे वडिलांबरोबर मुंबईला गेलो होतो. कफपरेडला



**श्रीनिवास खळे आणि भीमसेन जोशी**

वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या नव्या इमारतीत पहिल्या मजल्यावर एचएमव्हीने हा नवाकोरा भव्य रेकॉर्डिंग स्टुडिओ उभारला होता. अद्ययावत मशिनरी आणि साधने. या आधी इथे 'सिलसिला' या सिनेमातल्या गाण्यांचे रेकॉर्डिंग झाले होते. खळे यांच्या गाण्यांचे रेकॉर्डिंग हा त्या स्टुडिओतला दुसरा मोठा प्रसंग होता. आम्ही, त्यांची मित्रमंडळी, हृदयनाथ मंगेशकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर असे बरेच मोठे लोक रेकॉर्डिंग रूममध्ये रेकॉर्डिस्टबरोबर होतो. रेकॉर्डिंग फार छान, निर्दोष आणि सर्वांच्या मनासारखे झाले. खळेसाहेब खुशीत होते. त्या स्टेट ऑफ आर्ट साउंड सिस्टीमवर रेकॉर्ड झालेले अभंग स्टुडिओतल्या मोठ्या मॉनिटर स्पीकरवर ऐकताना मन तृप्त झाले होते.

या अभंगांची रेकॉर्ड 'अभंगवाणी दोन' या नावाने रीलिज झाली आणि तुफान खपली. त्यानंतर आणखी एक प्रपोजल घेऊन खळे पुण्याला वडिलांना भेटायला आले. अण्णा, (खळे माझ्या वडिलांना अण्णा म्हणायचे), रामाची आणि कृष्णाची गाणी तुम्हाला दीदींबरोबर गायची आहेत. दीदींनी संमती दिली आहे. पंडित नरेंद्र शर्मा गाणी लिहिणार आहेत. तुम्ही हो म्हणा.



**श्रीनिवास खळे**

परत खळेसाहेब पुण्याला आमच्या घरी मुक्कामाला आले. रिहर्सल झाल्या. मुंबईत रेकॉर्डिंग झाले. 'राम श्याम गुणगान' ही एलपी रेकॉर्ड भारतभर खूप लोकप्रिय झाली. तिने विक्रीचे सारे उच्चांक मोडले. या निमित्ताने मुंबईला ओबेरॉय शेरेटन हॉटेलमध्ये वडिलांना प्लॅटिनम डिस्क देण्याचा मोठा सोहळा एचएमव्ही कंपनीने साजरा केला. 'अण्णा आणि दीदी माझ्यासाठी एकत्र गायले आणि माझ्या रचना जगभर सर्वदूर पोहोचल्या. मी कृतकृत्य झालो. भरून पावलो.' अशी खळेसाहेबांची प्रतिक्रिया होती.

माझे वडील पूर्णपणे शास्त्रीय संगीतात बुडालेले असत. भारतभर त्यांचा लहानपणापासून संचार होता. त्यांचे संस्कार, जडणघडण, आवाजाचा लगाव, संगीतविषयक मते खूप निश्चित होती. काव्य, साहित्य, भाषा याची त्यांना आनुवंशिक गोडी आणि जाण होती. खळेसाहेबही शास्त्रीय संगीताचे जाणकार रसिक होते. त्यांना शास्त्रीय संगीताचे गायकच व्हायचे होते, परंतु नियतीने त्यांना संगीतदिग्दर्शक बनवले. रोमँटिक तरल भावना त्यांनी त्यांच्या रचनांमधून सतत सजीव केल्या. भक्तिभाव खळेसाहेबांच्या स्वभावात होताच. संगीताविषयी माझे वडील आणि खळेसाहेब भिन्न प्रकृतीचे होते, परंतु गाण्याच्या उत्कृष्टतेच्या दोघांच्याही व्याख्या सारख्याच होत्या. दोघांचीही प्रतिभा वेगळ्या जातीची होती. कार्यक्षेत्रे वेगळी होती. उस्ताद फैय्याज खां यांचे गाणे हा दोघांचा वीकपॉइंट होता. करत असलेल्या कामाबद्दल समर्पणाची भावना आणि श्रद्धा हा दोघांच्या व्यक्तिमत्त्वातील समान धागा होता.

माझ्या वडिलांना खळेसाहेब मोठा भाऊ मानायचे आणि माझ्या वडिलांनीही ते नाते निभावले.

**– जयंत जोशी**

jvjoshi2002@yahoo.co.in

सिॲटल

# अभिजात स्वर



**शैला दातार**

**स**न १९८० साली मला राज्य सरकारची शिष्यवत्ती मिळाली आणि माणिकबाई मला गुरू म्हणून लाभल्या. माणिक वर्मा म्हटलं की डोळ्यांपुढे येतं ते एक सुसंस्कृत, समृद्ध, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व. त्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या, गोड आवाजाच्या गायिका होत्या. तशाच घरकाम आणि उत्तम पाहुणचार करणाऱ्या घरंदाज गृहिणी होत्या. भारती, अरुणा, वंदना, राणीच्या प्रेमळ आणि आदर्श आई होत्या. अमर वर्माजींच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या हसतमुख सहचारिणी होत्या. दत्तोबा बागलकोटकर आणि हैदराबादचे बशीर खान यांच्याकडे माणिकबाईंच्या आई गाणं शिकायच्या त्यामुळे माणिकबाईंवर लहानपणापासूनच घराणेदार संगीताचे उत्तम संस्कार झाले. पुणे भारत गायन समाजातल्या अप्पासाहेब भोपे यांच्याकडे माणिकबाईंचं गाण्याचं प्राथमिक शिक्षण झालं, तेव्हा त्यांचं वय होतं अवघ्या नऊ-दहा वर्षांचं! तेराव्या वर्षी पुणे इथे उंबऱ्या गणपती चौकात त्यांचा पहिला जाहीर कार्यक्रम झाला. याच सुमारास एचएमव्हीतर्फे दत्ता डावजेकर यांचं गीत आणि संगीत असलेली माणिकबाईंची पहिली ध्वनिमुद्रिका निघाली, 'बहरली जणू लतिका कालिका' आणि 'चल जाऊ या रमू या वनी.'

पं. सुरेशबानू माने हे किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक आणि माणिकबाईंचे गुरू. सुरेशबाबूंनी सुरेलपणाकडे बाईंचं लक्ष अधिक वेधलं. पुढे सुरेशबाबू आणि हिराबाई बडोदेकरांची परवानगी घेऊन बाई इनायत खांसाहेब यांच्याकडे शिकायला लागल्या. पं. इनायत खांसाहेब हे आग्रा घराण्याचे तयार गवई होते. माणिकबाईंना त्यांनी उत्तमोत्तम बंदिशी दिल्या. १९४६मध्ये प्रभात चित्र संस्थेनं माणिकबाईंना 'गोकुळ' या चित्रपटासाठी गाण्याची संधी दिली. त्यानंतर 'आगे बढो', 'सीधा रास्ता', 'अपराधी' या चित्रपटांतूनही बाई गायल्या. यावेळी सुधीर फडके यांच्या संगीतदिग्दर्शनाखाली बाई हिंदी चित्रपटात प्रथमच गायल्या. बाई म्हणत, 'सुधीर फडके म्हणजे माझे सुगम संगीतातले गुरूच.' १९४६ साली सुधीर फडके यांनीच संगीत दिलेल्या माणिकबाईंच्या 'सावळाच रंग तुझा' या गाण्याला पुढील वर्षी ८० वर्षं पूर्ण होतील, तरीही त्याचा रंग अजून आहे तसाच आहे. हे खरं अभिजातपण.

प्रभातच्या 'आगे बढो' या चित्रपटाचे गीतकार होते अमर वर्मा. इथेच बाईंची त्यांच्याशी ओळख झाली आणि पुढे माणिक दादरकरांच्या माणिक वर्मा झाल्या. अमर वर्मांशी लग्न झाल्यावर माणिकबाईंचं गाणं वाढतच गेलं. त्यांचं सासर अलाहाबादचं. तिकडे गेल्यावर त्यांना अनेकदा भोलानाथ भट यांच्याकडून शिक्षण मिळालं. हे भोलानाथ भट म्हणजे



शैला दातार माणिक वर्मा यांच्याबरोबर



माणिक वर्मा

अलाहाबादचे एक अवलिया गायक. झोपडीत राहायचे. ऐन थंडीच्या दिवसांत पहाटे साडेचार वाजता जाऊन बाईंनी त्यांच्याकडून विद्या मिळवली. पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे आग्रा घराण्याचे गायक. पं. राम मराठे, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. वसंतराव कुलकर्णी, पं. सी.आर. व्यास यांच्यासारखे अनेक गायक त्यांच्याकडे शिकत. त्यांची गायकी तालप्रधान होती. जगन्नाथबुवांनी माणिकबाईंनाही मुलीप्रमाणे शिकवलं.

माझा आणि बाईंचा सहवास सोळा वर्षांचा. प्रत्यक्ष शिक्षण व सहवासातून शिक्षण अशा दोन्ही गोष्टी मला लाभल्या. बाईंच्या ख्यालगायकीचं वैशिष्ट्य सांगायचं तर त्यांचा आवाज किंचित बसकट पण अत्यंत आकर्षक. आवाजाला गोलाई, संयम, लहान मुलाला प्रेमानं गोंजारावं तसं त्या गात. स्वर खडे लावत नसत. त्याला मागे एखादा कण स्वर असे. 'स्वरात प्रेम हवं तरच लोकांना गाणं आवडतं. बायकांनी लडिवाळपणा ठेवावाच.' असं त्या म्हणत. त्यांचा सुरुवातीचा षड्ज भरदार असे. ख्यालाच्या बंदिशीच्या आधी अगदी मोजकी, परंतु आपण कोणता राग गाणार आहोत ते स्पष्ट करणारी आलापी त्या करत. बंदिश मांडताना अस्ताई-अंतरा जोडून गात. त्यामुळे संपूर्ण रागस्वरूप रसिकांसमोर उभं राहत असे. गाताना आपल्या जव्हारीदार आवाजात दोन वेळा अस्ताई आणि नंतर अंतरा म्हणून पहिल्याच सभेला रसिकांची 'वाहवा' अशी दाद घेत असत. संपूर्ण ख्याल मांडताना त्या मध्यलयीतच मांडत. आलापी करताना आपलं गाणं सतत पुढे कसं जात राहील याचा विचार करत. आलापीत आकार, उकार, इकार यांची चपखल योजना असे. रागांचे वादी-संवादी सांभाळत रागस्वरूप दाखवताना त्यातील हरकती, मुरक्या, तिहाया आणि विलक्षण गोडवा यांनी त्या रसिकांची मनं जिंकत. उच्चार बंदिशीच्या शब्दातील अर्थ रसिकांपर्यंत पोहोचवणारे स्पष्ट असत. बंदिशीची लय वाढवली की लयकारी करताना ती गायिकेला शोभेल अशीच करत. आग्रा घराण्याची बंदिश असो नाहीतर किराणा घराण्याची, त्यांच्या हृदयातून आलेल्या गाण्यानं त्या बंदिशींच घराणेपण विरघळून जायचं आणि खानदानी गाण्याचा आनंद श्रोत्यांना सहज मिळायचा. बाईंची तान तर तयार होती. बाईंच्या तानेत रस होता, सहजता होती. द्रुत बंदिश गाताना एकेक ओळ वेगवेगळ्या पद्धतीनं गमकेच्या अंगानं अशा गात की त्या जे काही गात आहेत ते अगदी सहज, सोपं वाटे. ख्यालानंतर ठुमरी गाताना तर बाई आपण 'वर्मा' आहोत म्हणजे उत्तर हिंदुस्थानी आहोत असंच सिद्ध करायच्या. ठुमरीचा बाज त्या इतक्या नजाकतीनं सांभाळत की त्यातला दर्द श्रोत्यांच्या काळजाला भिडे. त्यांच्या ठुमरीत बनारसी ठुमरीतले भाव होते, लखनवी ठुमरीतला नखरा होता आणि पंजाबी ठुमरीतली 'तय्यारी'ही होती आणि हे गाताना कुठेही आपण किती अवघड गातो आहे हे दाखवणं नसायचं.

बालगंधर्वांची नाट्यपदं गावीत तर माणिकबाईंनीच असं मोठमोठ्या कलाकारांनी म्हटलं आहे. माणिकबाईंची भावगीतं,

भक्तिगीतं हा तर सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय. रसिकांना मोहवून टाकणाऱ्या त्यांच्या पदांचा विचार केला की जाणवतं की ही पदं गाताना माणिकबाईंनी स्वर, शब्द, भावना या गीताला आधारभूत असणाऱ्या गोष्टी जपल्याच, शिवाय गाताना त्या गीतातून जिव्हाळा, आपलेपणा, संगीतावरचं प्रेम, श्रद्धा हे सारं जपलं म्हणूनच घराघरात त्यांचं गाणं प्रिय झालं. आर्जव, मार्दव आणि लाघव ही बालगंधर्वांच्या गाण्यातली खासियत बाईंच्याही गाण्यात असल्यानं उभ्या महाराष्ट्रानं बालगंधर्वांनंतर माणिकबाईंवर उदंड प्रेम केलं.

अनेक चित्रपटांतील त्यांची अनेक गाणी गाजली. ‘पैंजण पायी माझ्या रुणझुण बोले’, ‘कबीराचे विणतो शेले’, ‘श्रीहरी विदुराघरी पाहुणा’, ‘जाळीमंदी पिकली करवंदं’, ‘घननीळा लडिवाळा’ अशा अनेक गीतांनी महाराष्ट्राला वेड लावलं. माणिकबाई रत्नपारखी होत्या, त्यामुळे प्रत्येक घराण्यातलं, कलाकारातलं चांगलं ते त्यांनी आत्मसात केलं. आयुष्य जगतानाही प्रत्येक माणसात चांगलं काय ते पाहिलं. आपल्या शिष्यांवर चांगले संस्कार केले. सर्वांना प्रोत्साहन देणं, कौतुक करणं हा त्यांचा सहजधर्म होता. सगळ्या शिष्यांना त्यांनी मनापासून शिकवलं. हातचं राखून ठेवलं नाही. गुरू म्हणून कधी देखावा केला नाही.

कोणत्याही शिष्यानं घरी राहायला बोलावलं की प्रेमानं जात आणि तिथल्याच होत. १९८० ते १९९६ या सोळा वर्षांत पुण्याला आल्यावर बाई कितीतरी वेळा घरी राहायला आल्या. त्यांना आमचं घर मनापासून आवडे, कारण घरात सतत गाण्याचं वातावरण असे. जुनं रेकॉर्डिंग ऐकायला त्यांना फार आवडायचं. उत्साहानं गप्पा मारायच्या. आपण भीमसेनजींकडे जाऊ या, अभिषेकींना भेटू या किंवा पु.ल. देशपांडे आहेत का बघ, त्यांच्याकडे जाऊ या असं सारखं चालू असे. कोणी आजारी असेल तर आवर्जून भेटायला न्यायला लावत.

अभिजात स्वरांचं लेणं लाभलेल्या माणिकबाईंचं १० नोव्हेंबर १९९६ रोजी निधन झालं. त्या देहानं आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी आजही त्या देहातील आहेत आणि त्याचा अनुभव मी रोज घेते.

**– शैला दातार**

(सौजन्य – सकाळ वृत्तपत्र)

ग्रंथाली




महाराष्ट्राच्या
# हास्यरेषा

**संपादक : प्रशांत कुलकर्णी**

मराठी व्यंगचित्रकलेचा शतकभराचा आढावा

**मूल्य १५०० रु. । सवलतीत १००० रु.**

**टपालखर्च १०० रु.**

सामाजिक–राजकीय घटनांवर मार्मिक भाष्य करणारी व्यंगचित्रे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. मराठी माणसाला समृद्ध करणाऱ्या व्यंगचित्रकलेचा आणि तो रेखाटणाऱ्या व्यंगचित्रकारांचा हा शतकभराचा आढावा आहे. मराठीमध्ये व्यंगचित्रकलेचा व्यवहार १८८० पासून सुरू झाला. शं.वा. किर्लोस्कर हे गेल्या शतकातील आद्य व्यंगचित्रकार. त्यांच्यापासून ते आजचा तरुण व्यंगचित्रकार असा मोठा कालखंड या ग्रंथात सामावलेला आहे. सामाजिक हास्यचित्रे, पॉकेट कार्टून, कॉमिक स्ट्रिप, अर्कचित्रे, इलस्ट्रेशन, राजकीय व्यंगचित्रे असा सर्वांगाने वेध या ग्रंथात घेतला आहे. अशा प्रकारचा ग्रंथ इतर भारतीय भाषांमध्ये नाही. मराठी व्यंगचित्रकलेचे हे एक डॉक्युमेंटेशन तर आहेच, त्याचबरोबर त्याचे सर्वांगसुंदर दर्शन घडवणारा हा एक अपूर्व ग्रंथ आहे.

सिॲटल

# हे झाड जगावेगळे

**डॉ. निर्मोही फडके**



**‘नो** पल्स’, ‘नो रेस्पिरेशन’, ‘नो रिस्पॉन्स’ असं जेव्हा एखाद्या रुग्णाबद्दल डॉक्टर सांगतात, तेव्हा त्या रुग्णाच्या नातेवाइकांच्या मनाची तयारी झालेली असते. रुग्ण आधीपासूनच काही वाटण्याच्या पलीकडे गेलेला असतो. त्यामुळे, तो कशाचा विचार करत असेल हा प्रश्न इतरांच्या मनात उद्भवणं शक्य नसतं. त्यांना पुढच्या क्षणांचे वेध लागलेले असतात. रुग्ण त्याच क्षणावर थांबलेला असतो. पण... लाखात एखाद्याच रुग्णाला आतल्या आत जाणवत राहतं, की तो थांबलेला नाही. जाणवत राहते त्याला त्याच्या मेंदूची जागृती. कुठल्याशा एका तंद्रावस्थेतली ‘स्थिती’ प्राप्त झाल्यागत असतो तो, आणि अचानक तंद्रीचा स्फोट होतो. रुग्ण जागृतावस्थेत येतो. इतरांच्या दृष्टीनं तो चमत्कार असतो, तर रुग्णाच्या दृष्टीनं साक्षात्कार. जिवंतपणी घेतलेलं ‘मृत्युदर्शन.’ वास्तव अनुभवांच्या जीवनकथा अनेक लेखक लिहितात, पण रुग्णशय्येवरची वास्तव ‘मृत्युकथा’ लिहिणं जिकिरीचं. कारण मृत्यूचं कराल वास्तव हे जगण्यातल्या करकरीत वास्तवापेक्षाही भयावह असतं.

लेखाच्या नमनाला मृत्यूबद्दल घडाभर तेल ओतण्यास कारणीभूत आहे, अशा अनुभवांतून गेलेल्या एका ज्येष्ठ साहित्यिकाचा– वसंत नरहर फेणे ह्यांचा – लेख, ‘मृत्युचिये द्वारी.’ ज्येष्ठ साहित्यिक वसंत नरहर फेणे ह्यांचं जन्मशताब्दीवर्ष नुकतंच सुरू झालं आहे. त्यानिमित्तानं त्यांचा हा लेख वाचनात आला. ह्या फक्त एका लेखावरच खरं तर एक वेगळा लेख लिहायला हवा.

फेणे ह्यांच्या जन्मशताब्दीवर्षाच्या प्रारंभाच्या निमित्तानं त्यांच्या स्मृतींना आणि साहित्यसेवेला नम्र अभिवादन!

ज्या लेखाचा वर उल्लेख केला, त्या आत्मकथनपर ललित लेखात फेणे ह्यांनी मृत्युशय्येवर असलेल्या माणसानं केलेलं जे चिंतन मांडलं आहे, ते वाचकाला वेगळ्या अर्थानं खिळवून ठेवतं. त्यात भय तर आहेच, त्याचबरोबर मानवी प्रवृत्तींचा बारकाईनं घेतलेला वेध वाचकाला काही ठिकाणी हसवतोही. मृत्युशय्येवरही आपल्या बोलण्यात काही गफलत झाली आहे असं कुणाला वाटू नये, म्हणून, पुन्हा पुन्हा ‘आय ॲम हॅपी, आय ॲम नॉट अनहॅपी’, असं म्हणत राहणं, किंवा ‘शेवटी तोंडांत देशाचं नाव असावं म्हणून जय हिंद! म्हटलं, पण लगेच काहीतरी राहिलंसं वाटलं म्हणून चटकन वंदे मातरम्! म्हणून घेतलं.’ असे उल्लेख कारुण्यातून विनोदनिर्मिती करतात. हात पाहून भविष्य सांगणाऱ्याच्या शब्दांवर विश्वास न ठेवताही, विचारांच्या कोपऱ्यात त्यानं केलेल्या भविष्यवाणीचा नकळत विचार करत राहणं, हे सामान्य माणसाकडून घडतंच. इथे लेखक स्वानुभव म्हणून

ते मांडतो, तेव्हा आपण स्वतःला त्याच्याशी जोडत जातो. फेणे ह्यांच्या सर्व लेखनकृतींमध्ये वाचकाला हे स्वतःचं जोडलेपण गवसतं. फक्त तेवढंच नाही, त्याहीपेक्षा अधिक काही. हे जे अधिक काही आहे, त्यामुळेच त्यांच्या लेखणीला समकालीनांच्या लेखणीपेक्षा पृथकत्व लाभलं आहे.

मागच्या दशकाच्या शेवटी, म्हणजे २०१८मध्ये फेणे ह्यांचं निधन झालं. त्यांच्या निधनापूर्वी दोन-एक महिने त्यांची 'कारवारी माती' ही ६०० पानांची बृहद् कादंबरी प्रकाशित झाली. तिचं लेखन त्यापूर्वी सहा वर्षांपासून ते करत होते. एखाद्या हाडाच्या लेखकाची चिकाटी म्हणावी, तर ती अशी. फेणे ह्यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम ग्रंथालीकडून जाहीर झाला, तेव्हा अनेक वाचकांना त्यांच्या ह्या 'कारवारी माती' कादंबरीची आठवण आली. मात्र आज पन्नास-पंचावन्न वर्षं वयात असलेल्या मराठी साहित्याच्या वाचकांच्या पिढीतल्या - जी हे वाचन करणारी शेवटची पिढी असावी - अनेक वाचकांनी, 'वसंत फेणे ह्यांचं नाव आम्हाला माहीत आहे, पण त्यांच्या साहित्याचं तितकंसं वाचन मात्र आम्ही केलेलं नाहीये', अशी प्रांजळ कबुलीही दिली. तेव्हा फेणे ह्यांचं लेखन त्यांच्या समकालीनांसारखं लोकप्रिय का होऊ शकलं नाही, असा प्रश्न मनात आला.

फेणे ह्यांच्या काही ज्येष्ठ साहित्यिक सुहृदांनी, नातेवाइकांनी त्यांच्याविषयी सांगितलेल्या आठवणींमधून, अभ्यासकांनी लिहिलेल्या लेखांमधून ह्या प्रश्नाचा उलगडा काही प्रमाणात झाला. लोकांशी सतत संबंध येणाऱ्या कार्यक्षेत्रात असूनही वसंत फेणे ह्यांनी स्वतःला मराठी साहित्य क्षेत्रातल्या संमेलनादी सोहळ्यांपासून दूर ठेवलं. वयाच्या ५२व्या वर्षांपर्यंत त्यांनी एस.टी. महामंडळात नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेतली. नोकरी करत असताना महाराष्ट्रात विविध ठिकाणी पोस्टिंग झाल्यामुळे भरपूर अनुभव त्यांच्या गाठीशी बांधलेले होते. निवृत्त होण्यास काही वर्षं बाकी असताना त्यांनी स्वेच्छानिवृत्तीचा घेतलेला निर्णय हा केवळ साहित्यावरील खऱ्या प्रेमापोटी होता. चिंतन-लेखन करण्यास नीट बैठक लाभावी हा विचार त्यामागे होता.

रूढार्थानं मराठी साहित्याचे अभ्यासक नसलेल्या वसंत फेणे ह्यांना साहित्य प्रकारांची व्यवस्थित जाण होती. मराठी साहित्यपरंपरेविषयी अभ्यासपूर्ण माहिती होती. वाचन होतं. ज्येष्ठ साहित्यिक आणि फेणे ह्यांचे मित्र मधु मंगेश कर्णिक ह्यांनी फेणे ह्यांच्या मृत्यूनंतर श्रद्धांजलीपर लेखात लिहिलं आहे, की 'त्याचे वाचन चांगले होते. साहित्याची जाण माझ्यापेक्षा चांगली होती. त्याला साहित्याची विलक्षण आवड होती. पण ती पुस्तकापुरती. एकाही साहित्यिकाला भेटण्यासाठी तो उत्सुक नसे. त्याने एक दिवस हेंमिंग्वेची 'ओल्ड मॅन अँड द सी' ही कादंबरी माझ्या हाती दिली. म्हणाला, ही वाच. कादंबरी कशी असावी ते तुला कळेल आणि उद्या तू कादंबरी लिहिणारच आहेस. ...आता मी त्याला गुरुस्थानी मानायचे तेवढे बाकी ठेवले होते. मी कथा लिहितो, म्हणून बहुधा तोही मला मानायचा. साहित्यावर गप्पागोष्टी करण्यासाठी एसटीच्या रूक्ष कचेरीत त्याला मीच एकटा भेटलो होतो.' (ललित, एप्रिल, २०१८)

मधु मंगेश कर्णिक ह्यांच्या या उद्‌गारांतून फेणे ह्यांचं साहित्याविषयीचं निरीक्षण, व्यासंग दिसून येतो, तसंच त्यांची एककल्ली वृत्तीही लक्षात येते, आणि अशी वृत्ती असणं हे चुकीचं ठरू शकत नाही.

अनेक वाचकांना वसंत नरहर फेणे ह्या नावासह त्यांची 'सेंट्रल बस स्टेशन' ही कादंबरी आठवते. एस.टी.मध्ये अनेक वर्षं नोकरी केल्यामुळे, 'जे जगणं ते कागदावर उतरणं' हे साहजिकच झालं. मात्र ह्या कादंबरीच्या कथानकात वास्तवाच्या तपशिलांचं नुसतंच भरताड नसून, बस स्टँड आणि तिथलं धूळभरलं वातावरण (जे आजही तसंच असतं), ग्रामीण बोलीचा चपखल वापर, संवादांची 'क्लिक' देवाणघेवाण आणि अल्पाक्षरी संवादांतूनही निर्माण झालेली भावनांची वलयं आहेत. त्यामुळे, ही कादंबरी वाचकाच्या मनाची पकड घेते. असं असूनही ती संवादबंबाळ झालेली नाही. कादंबरीच्या सुरुवातीपासूनच लेखक मृत्यूचं एक गूढ पेरत जातात. त्याची उकल होऊनही, वाचकाला संभ्रमात ठेवण्यात लेखक यशस्वी होतात. आपल्या कोणत्याही लेखनकृतीतून कोणत्याही विचारधारेचा झेंडा न फडकावता, लेखकाच्या 'मानवतावादी' भूमिकेशी एकनिष्ठ राहत फेण्यांनी 'आहे रे आणि नाही रे' हा न संपणारा सामाजिक, सांस्कृतिक संघर्ष १९८० साली प्रकाशित झालेल्या ह्या कादंबरीत रूपकात्मकरीत्या अतिशय ताकदीनं उभा केला आहे.

'कारवारी माती' ही त्यांची दीर्घ कादंबरीही वाचकप्रिय ठरली. कारवार प्रदेशात फेणे ह्यांचं बालपण गेलं, त्यामुळे साहजिकच त्यांना त्या मातीची ओढ होती. १९०१ ते १९४७ हा कालपट असलेल्या ह्या कादंबरीला भारतीय स्वातंत्र्यचळवळीची भव्य पार्श्वभूमी आहे. ह्या कथानकाला, व्यक्तिरेखांना, भाषेला कारवार प्रदेशातल्या मातीचा गंध आणि निसर्गाचा रंग असला, तरी ही कादंबरी कारवार ते लंडन, जर्मनी, जपान व्हाया रशिया इतका भूप्रदेश व्यापते. नव्या सहस्रकातल्या पहिल्या पंचविशीतल्या मराठी कादंबरीचा आढावा घेताना 'कारवारी माती'ची दखल घेणं अपरिहार्य

आहे.

'पहिला अध्याय', 'अजोड', 'ऱ्हासपर्व', 'विश्वंभरे बोलविले' अशा ११ कादंबऱ्यांचं लेखन करणाऱ्या फेणे ह्यांची ओळख मात्र 'कादंबरीकार फेणे' ह्यापेक्षा 'कथाकार फेणे' म्हणून अधिक आहे. मराठी कथाप्रेमींना फेणे त्यांच्या कथालेखनाची ओळख १९७० नंतरच्या म्हणजे नवकथेनंतरच्या काळात झाली. १९७२मध्ये त्यांचा 'काना आणि मात्रा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आणि त्या कथासंग्रहासाठी फेणे ह्यांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यामुळे, तत्कालीन कथालेखकांच्या यादीत फेणे ह्यांचं नाव अग्रक्रमावर आलं. १९७२ ते २०११ ह्या चाळीस वर्षांच्या काळात फेणे ह्यांचे १६ कथासंग्रह – 'पाण्यातील लेणी', 'सावल्यांची लिपी', 'पंचकथाई', 'ऐस आणि पैस', 'शतकान्तिका', 'ध्वजा' इत्यादी – प्रकाशित झाले. 'माणूस आणि त्याच्या वृत्ती' ह्या केंद्राभोवती फिरणाऱ्या त्यांच्या कथांमधल्या व्यक्तिरेखा ह्या आचार-विचारानं पुरोगामी ठरतात. 'सिंगल मदर' अर्थात 'एकल मातृत्व' हा क्रांतिकारी विचार करणारी आणि तो प्रत्यक्षात आणणारी त्यांची 'रागिणी' नावाची नायिका आजही परंपरावादी वाचकांना अतिआधुनिक वाटण्याची शक्यता आहे.

फेणे ह्यांच्या कथांमध्ये जाणवतं ते आशयवैविध्य. त्यांच्या कथांचा पैस अहिल्यानगरपासून, मुंबईतल्या गिरणगावापासून अमेरिका, रशिया, आफ्रिका, इराणपर्यंत पसरलेला दिसतो. त्यांच्या कथांमधल्या स्त्री-व्यक्तिरेखा अस्सल आहेत. 'ध्वजा'मधली कॉम्रेड जयंतराव ह्यांना कम्युनिस्ट चळवळीत साथ देणारी त्यांची पत्नी वीणा, मुलगी ज्योती ह्या व्यक्तिरेखांच्या जगण्यातला सर्वसामान्य स्त्री आणि चळवळीतली कार्यकर्ता असा संघर्ष फेणे ह्यांनी बारकाईनं चितारला आहे. नेल्सन मंडेला ह्यांच्या सुटकेच्या वेळी उसळलेल्या वांशिक दंगली, सामान्य माणसाचे बळी इत्यादींचं चित्रण करणारी 'ज्याचा त्याचा क्रूस' ही कथा किंवा तेहरानमधली धर्मपिसाट वृत्ती आणि तिथल्या स्त्रियांचा शोकान्त सांगणारी 'धर्मसंकट' नावाची कथा, अशा अनेक कथांची उदाहरणं आहेत, जी फेणे ह्यांच्यातल्या लेखकाचं द्रष्टेपण आणि वैश्विक मूल्यांना आपल्या शब्दांच्या कवेत घेऊन मांडण्याची ताकद दाखवतात. सामाजिक, आर्थिक, भावनिक स्थित्यंतरांचा कॅनव्हास असलेल्या त्यांच्या कथा अधिकतर व्यक्ती ते समष्टी असा प्रवास करतात, तितक्याच त्या गहिरं मनोविश्लेषणही करतात. मानवी मनातल्या विकृतींचा शोध त्यांच्या कथांमध्ये दिसतो. 'मराठी कथा : रूप आणि परिसर' ह्या ग्रंथात ज्येष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकर फेणे ह्यांच्या कथांविषयी लिहितात, 'वसंत फेणे ह्यांच्या कथांतून वासनांचे फेसाळणारे प्रपात बेबंदपणे धावतात. …वासनांच्या या फुसांडत जाणाऱ्या लोंढ्यांनी सामान्य अभिरुचीची दमछाक होते.' तर ज्येष्ठ संपादक कुमार केतकर ह्यांना फेणे ह्यांच्या कथांतील प्रसंग भावनांच्या आणि मानवी संबंधांच्या रोलर कोस्टर राइडसारखे वाटतात.



**वसंत नरहर फेणे**

वसंत फेणे ह्यांनी 'मी पुरुष पूर्ण पुरुष' हे एकमेव तीन अंकी नाटक लिहिलं. राज्य परिवहन मंडळाकडून (एस.टी.) हे नाटक महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत सादर केलं गेलं. त्यामध्ये आताच्या ज्येष्ठ चरित्र अभिनेत्री उषा नाडकर्णी (पूर्वाश्रमीच्या उषा कलबाग) ह्यांना चिंतामणराव कोल्हटकर नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट अभिनेत्रीचा आणि फेणे ह्यांना उत्कृष्ट नाट्यलेखनाचा राज्य पुरस्कार मिळाला होता. पुरुषाची लैंगिक समस्या हा विषय आजही सर्वसामान्य घरात कुजबुज स्वरूपात असताना त्या विषयाला नाटकाचा आशय-गाभा करून फेणे ह्यांनी पंचावन्न वर्षांपूर्वी एक आव्हानच स्वीकारले होते.

'वैताग वानोळा' हे विनोदी लेखन, 'काही प्यादी
















काही फर्जी' हे व्यक्तिचित्रण आणि 'साम्यवाद : एक अभ्यास' हा अनुवाद; हे फेणे ह्यांचं इतर लेखन आहे.

१९८७ साली, वयाच्या ६१व्या वर्षी त्यांचं हृदय बंद पडलं आणि काही क्षणांपुरते ते मृत झाले. डॉक्टरांनीही 'कार्डिक अरेस्ट' असं घोषित केलं. मात्र काही क्षणांनंतर त्यांचं हृदय पुन्हा चालू झालं आणि ते शुद्धीवर आले. 'मृत्युचिये द्वारी' – ज्याचा या लेखाच्या आरंभी उल्लेख केला आहे – ह्या लेखात हा अनुभव फेणे ह्यांनी शब्दबद्ध केला आहे. ह्या लेखातून मानवी जीवन-मृत्यूच्या अनेक आयामांचं दर्शन घडवताना फेणे ह्यांची लेखणी वाचकाला हसवते आणि चिंतन करायलाही भाग पाडते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंत लेखन करणारा हा कलंदर लेखक 'एकला चालो रे' ह्या पंथातला होता. एस.टी. महामंडळातलं 'लेखाकार' हे तसं साधं असं पद. त्या पदावर नोकरी करताना, त्यांचा लहानसा संसार फुलला. दुर्दैवानं त्यांची सुविद्य पत्नी मंगला ह्यांचं अचानक दुःखद निधन झालं. संसाराच्या अर्ध्या वाटेवर त्यांना आणि मुलांना त्या सोडून गेल्यामुळे, फेणे ह्यांच्या आयुष्यात एक कायमची पोकळी निर्माण झाली. ह्या घटनेनंतर 'एकला चालो रे' हे फेणे ह्यांना कदाचित अधिकच पटलं. नोकरीमध्ये 'आपण बरं की, आपलं काम बरं', हेच ब्रीद त्यांनी ठेवलं आणि नोकरी सोडल्यावरही ते तसंच जगले. निखळ साहित्यनिर्मितीसाठी आणि आपल्या कुटुंबीयांसाठी, नातवंडांसाठी ब्याण्णव वर्षांपर्यंत लाभलेलं दीर्घ आयुष्य ते आनंदानं जगले. कंपूशाही करणाऱ्या साहित्यिक गोतावळ्यांत फेणे कधी रमले नाहीत. म्हणूनच कदाचित हारतुरे, मान-सन्मान, पुरस्कार इत्यादीपासून ते वंचित राहिले. अर्थात त्यांना त्याचं सोयरसुतक नव्हतं. वसंत नरहर फेणे ह्यांच्या सुहृदांना त्यांच्या वंचितावस्थेबद्दल वाईट वाटत असलं तरी, वसंत नरहर फेणे मात्र त्यांच्या 'एकला चालो रे'च्या स्टाईलमध्ये आत्मसन्मान राखत, साहित्याचा कसदार दस्तऐवज साहित्यप्रेमींसाठी मागे ठेवून पुढे निघून गेले आहेत.

**– डॉ. निर्मोही फडके**
phadkenirmohi03gmail.com

सिॲटल

# ग्रामीण जीवनाचा अस्सल शब्दचित्रकार



**राजीव श्रीखंडे**

**म**राठी साहित्यात ग्रामीण कथेला स्वतंत्र प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या लेखकांमध्ये शंकर पाटील यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ग्रामीण महाराष्ट्राचे जीवन, त्यातील माणसे, त्यांचे सुख-दुःख, संघर्ष, भोळेपणा, चातुर्य आणि बदलत्या काळाचे परिणाम यांचे जिवंत चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून केले. व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार आणि शंकर पाटील या त्रयीने मराठी ग्रामीण साहित्याला नवी दिशा दिली. त्यात शंकर पाटील यांची शैली विशेषतः त्यांच्या अस्सल ग्रामीण भाषेमुळे, विनोदी दृष्टिकोनामुळे आणि माणसांबद्दलच्या अपार जिव्हाळ्यामुळे वेगळी ठरते.

मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण पूर्वीपासून आढळते. परंतु विसाव्या शतकाच्या मध्यावर ग्रामीण कथा हा एक स्वतंत्र आणि प्रभावी साहित्यप्रकार म्हणून विकसित झाला. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील खेडी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बदलांच्या उंबरठ्यावर उभी होती. या बदलांचे वास्तववादी चित्रण करणारे लेखक पुढे आले. शंकर पाटील हे त्यांपैकी एक महत्त्वाचे नाव.

त्यांच्या कथांमधून खेडे हे केवळ पार्श्वभूमी नसून एक जिवंत पात्र आहे. गावातील चावडी, जत्रा, शेत, विहिरी, बैलगाड्या, पंचायती, नातेसंबंध, भांडणे, मैत्री, सण-उत्सव आणि मानवी स्वभावाचे अनेक पैलू समोर येतात.

शंकर पाटील यांचा जन्म ग्रामीण वातावरणात झाला. त्यांनी गावाकडचे जगणे जवळून अनुभवले. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये कृत्रिमता दिसत नाही. त्यांनी लिहिलेली माणसे ही पुस्तकातून आलेली नाहीत; ती त्यांच्या आसपास जगलेली, भेटलेली माणसे आहेत.

याच कारणामुळे त्यांच्या कथांतील पात्रे वाचकांच्या मनात घर करतात. ती आदर्शवादी नाहीत; ती गुणदोषांनी युक्त अशी सामान्य माणसे आहेत. त्यांच्या कथा वाचताना वाचकाला स्वतःच्या गावातील एखादा शेतकरी, सरपंच, शिक्षक, कारकून किंवा गावगुंड आठवतो.

शंकर पाटील यांच्या कथांचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे जिवंतपणा. कथेत घडणाऱ्या घटना अगदी सहज वाटतात. त्यात नाटकीपणा नसतो. छोट्याशा प्रसंगातून ते मानवी स्वभावाचे मोठे चित्र उभे करतात. दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विनोद. त्यांच्या कथांमधला विनोद हा केवळ हसवण्यासाठी नसतो. तो जीवन समजून घेण्याचा एक मार्ग असतो. अनेकदा गावातील विसंगती, अज्ञान, अहंकार किंवा सामाजिक रूढी यांवर ते हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करतात. त्यांच्या विनोदात कटुता नाही. पात्रांची त्यात टिंगल नसते. त्यामुळे वाचकही त्या पात्रांवर रागावत नाही; उलट

त्यांच्याशी त्यांचे एक आत्मीय नाते निर्माण होते.

शंकर पाटील यांच्या साहित्याचा विचार करताना त्यांच्या भाषेचा विशेष उल्लेख करावा लागतो. त्यांनी ग्रामीण बोलीभाषेचा अत्यंत प्रभावी वापर केला. त्यांच्या कथांतील संवाद वाचताना जणू गावातील माणसे प्रत्यक्ष बोलत आहेत असे वाटते. मराठी साहित्यामध्ये प्रमाणभाषेचे वर्चस्व असताना त्यांनी ग्रामीण भाषेला सन्मानाने स्थान दिले. त्यांच्या भाषेमध्ये म्हणी, वाक्प्रचार, लोकजीवनातील प्रतिमा आणि बोलण्यातील सहजता आढळते.




भाषेतील हा नैसर्गिकपणा त्यांच्या कथांना वेगळे सौंदर्य प्रदान करतो. त्यामुळे त्यांच्या कथा आपण केवळ वाचत नाही तर आपण त्या ऐकत आहोत असे आपल्याला जाणवत राहते.

शंकर पाटील यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू म्हणजे माणूस. गावातील साध्या माणसांवर त्यांची विलक्षण श्रद्धा होती. ते त्यांच्या पात्रांकडे उपहासाने पाहत नाहीत; तर समजून घेण्याच्या दृष्टीने पाहतात. गरिबी, अज्ञान, रूढी आणि अडचणी असूनही माणसांमधील चांगूलपणा, विनोदबुद्धी आणि जगण्याची जिद्द यांवर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या कथांमध्ये मानवी स्वभावाचे अनेक रंग दिसतात. काही पात्रे स्वार्थी असतात, काही भोळी असतात, काही धूर्त असतात; पण ती सर्व माणसे जिवंत वाटतात.




शंकर पाटील यांच्या कथांमधील व्यंग विशेष उल्लेखनीय आहे. गावातील राजकारण, प्रतिष्ठेच्या कल्पना, अंधश्रद्धा, नोकरशाही, निवडणुका आणि सामाजिक विसंगती याचे त्यांनी प्रभावी चित्रण केले. त्यांचे व्यंग आक्रमक नाही. ते वाचकाला विचार करायला भाग पाडते. हसताहसता ते समाजातील काही मूलभूत प्रश्न समोर आणतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधील विनोद हा केवळ मनोरंजनापुरता मर्यादित राहत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण महाराष्ट्रात अनेक बदल झाले. शिक्षणाचा प्रसार, सहकारी चळवळ, राजकीय जागृती, सरकारी योजना आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा परिणाम गावांवर होत होता. शंकर पाटील यांनी या संक्रमणकाळाचे सूक्ष्म निरीक्षण केले. जुन्या मूल्यांची पकड आणि नव्या जगाची ओढ यामध्ये अडकलेल्या ग्रामीण समाजाचे चित्र त्यांच्या कथांमध्ये दिसते. परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संघर्ष त्यांनी अनेक कथांमधून उभा केला. हा संघर्ष केवळ सामाजिक नाही, तर मानसिकही आहे, त्यामुळे त्यांच्या कथा विशिष्ट काळाशी जोडलेल्या असूनही आजही समकालीन वाटतात.

शंकर पाटील हे उत्तम कथाकार तर होतेच; त्यांच्यात एक प्रभावी कथाकथन–कारही दडलेला होता. त्यांच्या कथांमध्ये संवादप्रधानता, प्रसंगरचना आणि नाट्य–मयता दिसते. त्यामुळे त्यांच्या अनेक कथा कथाकथनाच्या कार्यक्रमांमधून लोकप्रिय झाल्या. ग्रामीण जीवनातील प्रसंग त्यांनी अशा पद्धतीने रंगवले की श्रोते आणि वाचक दोघेही त्यात रमून जात.

त्यांच्या कथांमधील विनोदी प्रसंग रंगमंचावरही प्रभावी ठरतात. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा लोकांशी थेट संवाद निर्माण झाला. त्यांनी खेडयांकडे वास्तववादी दृष्टीने पहिले. गावातील सौंदर्य आणि मर्यादा दोन्ही त्यांनी दाखवून दिल्या. त्यामुळे त्यांच्या कथा दस्तावेजी महत्त्वही प्राप्त करतात. आज ग्रामीण महाराष्ट्र झपाट्याने बदलत आहे. अनेक जुन्या जीवनपद्धती नाहीशा होत आहेत. अशा वेळी शंकर पाटील यांचे साहित्य एका सांस्कृतिक स्मृतीसारखे वाटते. त्यांच्या कथांमधून विसाव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्राचे जिवंत चित्र आपल्यासमोर उभे राहते.

त्यांचे साहित्य केवळ ग्रामीण जीवनाचे वर्णन म्हणून महत्त्वाचे नाही. त्यामध्ये उच्च दर्जाची साहित्यक गुणवत्ता आहे. त्यांच्या कथांमध्ये कथनकौशल्य, व्यक्तिरेखांचे सूक्ष्म चित्रण, विनोद, व्यंग, संवादांची ताकद आणि मानवी स्वभावाचे आकलन दिसते. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका प्रदेशापुरते मर्यादित राहत नाही; ते सार्वत्रिक मानवी अनुभव व्यक्त करते.

खेड्यातील माणूस असो की शहरातील माणूस असो, दुःख, अभिमान, मत्सर, प्रेम आणि संघर्ष या भावना सर्वत्र समान असतात. शंकर पाटील यांच्या कथांमध्ये याच मानवी भावनांचे प्रभावी चित्रण आढळते.

आजच्या डिजिटल युगात ग्रामीण जीवनाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. तरीही शंकर पाटील यांचे साहित्य अप्रासंगिक ठरत नाही. उलट ते आपल्याला आपल्या सामाजिक मूल्यांची आठवण करून देते. त्यांच्या कथा वाचताना आपण एका अशा जगात प्रवेश करतो जिथे मानवी नात्यांना महत्त्व आहे, जिथे माणसे एकमेकांना ओळखतात आणि जिथे जीवनाचा वेग तुलनेने संथ आहे. हे जग आजच्या वाचकाला केवळ भूत-काळाची ओळख करून देत नाही, तर वर्तमानाचा विचार करण्यासही भाग पाडते.

शंकर पाटील हे मराठीतील केवळ एक लोकप्रिय कथाकार नव्हते; ते ग्रामीण महाराष्ट्राचे संवेदनशील इतिहासकार होते. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे खेड्यातील सामान्य माणसांच्या जीवनाला शब्द दिले. त्यांच्या कथांमध्ये विनोद आहे, कारुण्य आहे, वास्तव आहे आणि माणसांवरील अढळ विश्वास आहे.

ग्रामीण जीवनातील साध्या घटनांमधून मानवी स्वभावाचे गूढ उलगडण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. म्हणूनच त्यांच्या कथा काळाच्या कसोटीवर टिकल्या आहेत. आजही त्या तितक्याच ताज्या, जिवंत आणि वाचनीय वाटतात.

शंकर पाटील यांच्या 'धिंड' या कथासंग्रहाचा उल्लेख केला पाहिजे. या कथासंग्रहात अकरा कथा आहेत. त्यातली ही कथा फारच मासलेवाईक आहे. एका गावात १५ ऑगस्टला ग्रामपंचायतीत असा ठराव केला जातो की कुणी गावात दारू पिणार तर त्याची गावभर गाढवावरून धिंड काढली जाईल. चारच दिवसांत असा एक माणूस मिळतो. दारूनं तर्रर अशा या माणसाची मग धिंड काढली जाते, परंतु या धिंडीचे रूपांतर लगेचच वरातीत होते, त्या माणसाला पंचारतीने ओवाळले जाते, धिंड काढणारी माणसे दमतात पण ज्याची धिंड काढलेली असते तो मात्र गाढवावरून उतरायला तयार नसतो. शंकर पाटीलांनी या सगळ्याच विषयावर न बोलता इतके मार्मिक भाष्य केले आहे, त्याला तोड नाही. 'धिंड' या कथासंग्रहातील देशी उपाय, पाळणा यासारख्या बाकीच्या कथा महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाची वेगवेगळी चित्रे आपल्या पुढ्यात सादर करतात, तेही बहुधा उपरोधिक रितीने. त्यात कारुण्याची झालर आहे हेदेखील नेहमी जाणवत राहते.



शंकर पाटील

मराठी ग्रामीण साहित्याचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार त्यांच्यासह शंकर पाटील त्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कारण त्यांनी केवळ कथा लिहिल्या नाहीत; त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या आत्म्याला शब्दबद्ध केले. त्यांच्या साहित्याकडे पाहताना आपल्याला आपल्या समाजाचे, संस्कृतीचे आणि मानवी जीवनाचे एक जिवंत प्रतिबिंबही दिसते. शंकर पाटील यांचे अनेक कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. ज्यात 'वळीव', 'धिंड', 'फक्कड गोष्टी' यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. शंकर पाटलांची 'टारफुला' ही कादंबरी प्रसिद्ध आहे. त्यांचे लोकनाट्य 'कथा अकलेच्या कांद्याची' फार लोकप्रिय झाले. 'गल्ली ते दिल्ली', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' हीही नाटके बरीच गाजली. त्यांची 'प्रसिद्ध मीटिंग' या कथेचं नाट्यरूपांतर डॉ. प्रियदर्शन मनोहर यांनी केले आणि या एकांकिकेचे आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रयोग झाले.

त्यांनी पटकथाकार वेगळी छाप पाडली. 'एक गाव बारा भानगडी', 'पिंजरा', 'गणगवळण', 'पाहुणी' अशा चित्रपटांचे पटकथालेखनही त्यांनी केले.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

सिॲटल

# वीणाताईंचं गारुड!



अश्विनी भोईर

**वी**णा गवाणकर या सिद्धहस्त लेखिकेला भेटल्यावर, त्यांच्याशी मनसोक्त गप्पा मारल्यावर माझ्या मनात आलं, गप्पांमधून भावलेल्या वीणाताई झरझर शब्दांतून मांडत जाव्यात. शब्दांना निगुतीनं जपणाऱ्या या विदुषीच्या सहवासात घालवलेल्या क्षणांचं मोल चिरकाल जपण्याचं शब्दांशिवाय अन्य कोणतं माध्यम असू शकत नाही.

लहानपणी मी 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक वाचलं होतं. तेव्हा माझ्यासाठी कार्व्हर म्हणजे केवळ एक वाचनीय चरित्रात्मक पुस्तक नव्हतं, तर माझ्यासारख्या अनेकांसाठी ती एक प्रेरणा होती. आजही अनेकांसाठी ती आहे. जगण्याचं एक प्रकारचं नाकारलेपण आलेला कार्व्हर स्वतःच्या सुखदुःखांपलीकडे जाऊन मानवजातीच्या कल्याणासाठी आपलं आयुष्य समर्पित करतो, एवढा मोठा विचार त्या वयात मला कळला नव्हता, परंतु परिस्थिती कितीही वाईट असली तरी मनुष्य जिद्दीनं आणि परिश्रमांनी आयुष्य घडवू शकतो, ही प्रेरणा कार्व्हरनं दिली होती. मनाची जडणघडण होण्याच्या वयात जे पुस्तक आपण वाचलं, ज्या पुस्तकानं आपण प्रभावित झालो, त्या पुस्तकाच्या लेखिकेच्या घराच्या पायऱ्या आपण चढत आहोत... हा विचारच मनाला रोमांचित करणारा होता. मी स्वतःलाच एक चिमटा काढला आणि वीणाताईंच्या वसईतील 'राधा' या वास्तूत शिरले. वीणाताईंकडून त्यांच्या घराचा पत्ता समजावून घेताना त्यांना फोनवर विचारलं, 'वीणाताई, घराजवळचा लँडमार्क काय आहे?' त्या म्हणाल्या, 'अग, राधा हाच वसई गावातील लँडमार्क आहे. पारनाक्याला आलीस की कोणालाही विचार.' वीणाताई म्हणाल्या त्याप्रमाणे त्यांचं घर सहज सापडलं. प्रवासात ही गोष्ट आठवल्यावर मनात विचार आला की वसई गाव ऐतिहासिक दृष्ट्या प्रसिद्ध आहेच. गावाला व शहारला वैभव प्राप्त आहे, ते इथे वास्तव्यास असलेल्या साहित्यिक व कलाकारांमुळे. अशांपैकी वसईला महाराष्ट्रातीलच नव्हे जगातील मराठी वाचकांपर्यंत पोहोचवणारं एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे वीणा गवाणकर.

आज सुप्रसिद्ध चरित्रलेखिका वीणा गवाणकर यांची 'ग्रंथाली'च्या 'साहित्यव्रती' या कार्यक्रमासाठी एक-दीड तासाची मुलाखत घ्यायची याचं मनावर काहीसं दडपण होतं. त्या विचारातच वीणाताईंच्या घरी पोचले. दरवाजा उघडाच होता. आमचा तंत्रसाहाय्यक समीर कदम माझ्या आधीच पोहोचलेला होता. कॅमेरा लावणं वगैरे तयारी सुरू होती. मी आत शिरले तर समोरच खुर्चीत वीणाताई बसलेल्या होत्या. मला पाहताच अगदी मनमोकळं हसत त्यांनी माझं स्वागत केलं.

लांबलचक प्रशस्त हॉल. हॉलच्या तिन्ही भिंतींना ऐसपैस बैठका. मधोमध डायनिंग टेबल. वीणाताईंचे पती चंद्रकांत हे आर्किटेक. त्यांनीच हे घर डिझाइन करून १९८५मध्ये बांधलं होतं. विशेष म्हणजे तेव्हाच्या काळात आधुनिक वाटावी अशी या घराची रचना आहे. तळमजल्याला स्टिल्ट पार्किंग. पहिल्या मजल्यावर गवाणकर यांच्या बंधूंचं घर आणि दुसऱ्या मजल्यावर त्यांचं. प्रशस्त लांबलचक दिवाणखाना व त्याला जोडून असलेली गॅलरी. अगदी चौरस्त्यावर असलेलं हे घर. गॅलरीतून चारही बाजूंचे रस्ते, ओळीनं असणारी घरं, झाडं, प्रसन्न वातावरण. या घरातील वीणाताईंकडून कळलेली विशेष गोष्ट म्हणजे त्यांच्याकडे सोलार चूलदेखील होती. अलीकडेच ती काढून टाकली. घराच्या वरच्या मजल्यावरच्या खोल्यांमध्ये पुष्कळ सारी पुस्तकं. घरातील वाचनालयच. आता सर्व पसारा सांभाळणं, पुस्तकांची देखभाल ठेवणं जमत नसल्यानं त्यांनी पुस्तकं सिंधुताई सकपाळांच्या वाचनालयाला देऊन टाकली. दिवाणखान्यात लक्ष वेधून घेणारी एक वेगळी गोष्ट म्हणजे वरच्या बाजूला असलेली झरोक्यासारखी लांबलचक खिडकी. घरात तयार झालेली उष्ण हवा वरच्या बाजूनं बाहेर निघून जाऊन, नैसर्गिक रीत्या घरातील तापमान कमी राखण्याची ही एक उत्तम सोय. घर साधं, सुंदर आणि कलात्मक.

एका भिंतीला पुस्तकाचं कपाट आणि त्याच्या आजूबाजूला अनेक कलात्मक वस्तू. १२५ वर्षं जुना बेल्जियम आरसा, त्यांच्या आईचा पितळेचा जग, कुंकवाची फणेरी, अशा दुर्मिळ वस्तूंचा संग्रह, छानशी वीणा, वीणाताईंचं स्केच, पेंटिंग... वस्तूंची नुसती जमवाजमव नाही. तर छान कलात्मकतेनं केलेली मांडणी घराचा एकेक कोपरा उजळत होती. घरात नैसर्गिक प्रकाश चांगला असल्यानं शूटिंगसाठी कोणत्याच कृत्रिम लाईटची गरज आम्हाला भासली नाही.

मुलाखतीला आरंभ करण्याआधीच आमच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. वीणाताईंना म्हटलं, वीणाताई, 'कार्व्हर' १९८१ साली प्रकाशित झालं आणि आज त्याची पन्नासावी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. मला या गोष्टीची फार गंमत वाटत आहे. ते प्रकाशित झालं तेव्हा मी अवघ्या दोन वर्षांची होते आणि आज मी तुमची मुलाखत घ्यायला तुमच्यासमोर बसले आहे! आज इतक्या वर्षांनीही कार्व्हरचा प्रभाव तितकाच आहे. लोक पुस्तक घेऊन वाचत आहेत आणि चक्क पन्नासावी आवृत्तीही प्रकाशित झाली आहे.

यावर वीणा ताई हसल्या आणि म्हणाल्या, अग, हा विचार तुझ्याच मनात आला असं नाही. तुला गंमत सांगते. आपल्या मुलांच्या जन्माबद्दल बोलताना लोक म्हणायचे, तुझ्या मुलाचा जन्म कार्व्हरच्या आधीचा की नंतरचा! 'कार्व्हर' हे लोकांमध्ये इतकं रुजलं की रोजच्या जगण्याशीही ते जोडलं गेलं. अश्विनी, तुला सांगू का, खरं तर तुझा जन्म 'कार्व्हरङ्ख' आधीचा वा नंतरचा नाही. ज्या वर्षी कार्व्हर पहिल्यांदा 'माणूस'मध्ये प्रकाशित झालं त्या वर्षीचा तुझा जन्म.

माझं जन्मवर्ष आणि कार्व्हरचं जन्मवर्ष एकच आहे हे ऐकताच उगीचच माझी छाती गर्वानं फुलून आली. चेहऱ्यावरचा तो आनंद लपवत मी मुलाखातीकडे वळले. कार्व्हर पुस्तकाच्या संदर्भात लेखन करताना अनेकांनी अनेक आठवणी सांगितलेल्या आहेत. त्यातील एका आठवणीला आम्ही उजाळा दिला. पु.ल. देशपांडे हे नाव साहित्यिक म्हणून किती मोठं आहे, याचा आजही आपल्याला प्रत्यय येतो. ज्या काळात पुल होते, त्या काळात त्यांचा समाजमानसावर किती प्रभाव होता याची आपण कल्पना करू शकतो. 'कार्व्हर' वाचून पुल भारावून गेले होते आणि प्रत्येकानं हे पुस्तक वाचायलाच हवं असं त्यांनी जाहीरपणे सांगितलं होतं. तर दुसरी एक आठवण सांगलीतील वृत्तपत्र विक्रेत्याची. 'कार्व्हर' वाचल्यावर तो प्रभावित झाला. त्यानं आनंदानं संकल्प केला की कोणतंही कमिशन न घेता कार्व्हरच्या १००० प्रती मी विकेन. 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाचं सर्व स्तरांतील वाचकांकडून स्वागत झालं, हे कळण्यासाठी मला वाटतं या दोन बोलक्या प्रतिक्रिया पुरेशा आहेत.

गप्पा मारता मारता मी वीणाताईंना विचारलं, वीणाताई, लिहिताना लेखक आपलं पुस्तक किती लोकांपर्यंत पोहोचेल, किती लोकप्रिय होईल याचा विचार करत नाही. तरी आज 'कार्व्हर'च्या यशाकडे तटस्थपणे पाहताना, ते इतकं लोकप्रिय का झालं असं तुम्हाला वाटतं? यावर वीणाताई सहजतेनं म्हणाल्या, याचा विचार मी तसा कधी केला नव्हता. परंतु मला 'कार्व्हर' वाचून जी पत्रं येत होती, प्रतिक्रिया येत होत्या त्यावरून लक्षात येत होतं की ग्रामीण भागात कार्व्हर अधिक प्रमाणात वाचलं गेलं आहे. त्यानं अनेकांना आत्मविश्वास दिला, की ज्याच्याकडे काहीच नाही तो माणूस मानवजातीच्या कल्याणासाठी केवढं मोठ कार्य करू शकतो. त्यामानानं आपली परिस्थिती तर खूपच चांगली आहे, त्यातून आपण आपलं आयुष्य घडवू शकतो. ही सकारात्मकता 'कार्व्हर'नं वाचकांना दिली. तो सामान्यातल्या सामान्य माणसाच्या आयुष्याशी सहज जोडला गेला.

वीणाताई मुळात ग्रंथपाल. त्यांचे वडील ब्रिटिशांच्या



वीणा गवाणकर

काळत पोलिस अधिकारी होते. वडिलांनी वाचनाला, शिक्षणाला नेहमीच प्रोत्साहन दिलं. त्यातूनच त्यांचा वाचनाचा पिंड घडत गेला. तर्कशुद्ध विचारांचं बाळकडू कसं मिळालं, याचा धमाल किस्सा वीणाताईंकडून ऐकायला मिळाला. गावात भुताखेतांच्या गोष्टी खूप सांगितल्या जायच्या. लहान मुलं या गोष्टी रस घेऊन ऐकायची, पण त्यामुळे मनात एक प्रकारची भीतीदेखील निर्माण होत होती. वीणाताईंच्या वडिलांनी एकदा मध्यरात्री, मिट्ट काळोखात वीणाताई आणि त्यांच्या बहिणीला चक्क सर्व स्मशानाची सैर घडवली! घरी आल्यावर त्यांनी मुलींना विचारलं, दिसलं का भूत? दोघींनीही नकारार्थी मान हलवली आणि त्यानंतर भुताखेतांबद्दलची भीती मनातून निघून गेली, ती कायमची. वडिलांचं जिथे पोस्टिंग असेल त्याप्रमाणे ग्रामीण भागात वीणाताई लहानाच्या मोठ्या झाल्या. महविद्यालयीन शिक्षण त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात होस्टेलमध्ये राहून घेतलं. तिथल्या जयकर लायब्ररीत त्या अधिक रमल्या. तिथल्या ग्रंथपालांनी वीणाताईंचा नेमका कल ओळखला. ग्रंथपालांच्या सल्ल्यानुसार कोर्स करून त्या औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून रुजू झाल्या. पुढे आर्किटेक्ट चंद्रकांत गवाणकर यांच्याशी विवाहबद्ध होऊन त्या वसईत आल्या. तेव्हापासून आजतागायत त्या वसईतच वास्तव्याला आहेत. वीणाताईंचे पती चंद्रकांत हे वसईतील पहिले आर्किटेक्ट. वीणाताई आपले पती आणि त्यांच्या नात्याबद्दल सांगतात, त्यांच्यातील नातं भावनिक आहे. शिवाय दोघांच्याही विचारांत तर्कशुद्धता असल्यानं नेहमी नवरा-बायकोत होतात तशी भांडणं त्यांच्यात कधी झाली नाहीत.

वसईत आल्यवर वीणाताईंनी रूढार्थानं कोणती नोकरी केली नाही. त्या वसईतील निसर्गरम्य वातावरणात वाचन-लेखनप्रपंचातच गुंतल्या. आपल्या मुलांना सांगण्यासाठी त्यांनी साध्यासोप्या भाषेत 'कार्व्हर'ची गोष्ट लिहून काढली होती. ती प्रथम लेखस्वरूपात प्रसिद्ध झाली. पुढे, पुस्तकरूपात प्रकाशित झालेल्या 'कार्व्हर'नं रचलेला इतिहास आपल्या डोळ्यांसमोर आहे.

'एक होता कार्व्हर' हा वीणाताईंच्या लेखनाचा आरंभबिंदू ठरला. त्यांनतर फारशी प्रकाशझोतात नसलेली, उत्तुंग कार्य करणारी व्यक्तिमत्त्वं वीणाताईंच्या लेखणीतून वाचकांपर्यंत पोहोचली. चरित्रलेखिका वीणाताईंना चरित्र हा वाङ्मयप्रकार वाचायला अधिक आवडतो. आपण कोणाचं चरित्र लिहायचं हे तुम्ही कसं ठरवता याविषयी त्या म्हणाल्या, ही गोष्ट अशी ठरवून होत नाही. मी पुष्कळ वाचत असते. मी लिहिलेल्या विषयांपेक्षा न लिहिलेले विषय मनात अधिक आहेत. जे लिहिल्याशिवाय, सांगितल्याशिवाय मला राहवतच नाही त्या विषयांवर मी लिहिते.

वीणाताईंनी गप्पांच्या ओघात त्यांच्या चरित्र-नायकांबद्दल दिलेली माहिती रोमांचकारी होती. वसई गावातच वास्तव्यास असलेले जगविख्यात डिझायनर रॉबी डिसिल्व्हा यांचं चरित्र वीणाताईनी लिहिलं. त्यांची आणि रॉबींची भेट स्टेट बँकेत झाली होती. बँकेत बाजूला बसलेल्या गृहस्थांनी विचारलं, आर यू मिसेस वीणा गवाणकर? आणि तिथेच रॉबी डिसिल्व्हा आणि वीणाताईंचा परिचय झाला. खूप छान योगायोग असा होता, की ज्या स्टेट बँकेत वीणाताईंना रॉबीसर भेटले, त्या स्टेट बँकेचा लोगो रॉबीसरांनीच बनवला होता. रॉबीसरांनी दाखवलेले अनेक मोठ्या व्यक्तींशी झालेले पत्रसंवाद, त्यांनी सांगितलेल्या आठवणी यातून वीणाताईंना एक डिझायनर उलगडत गेला, त्याचं मोठेपण कळत गेलं. इटलीतील नंबर एकचा बोजेरी स्टुडिओ रॉबी यांना गळ घालून आपल्याकडे घेऊन जातो आणि आपल्याच गावात असलेल्या एवढ्या मोठ्या माणसाची बूज राखली गेली नाही याची खंत वीणाताईंना वाटते. त्या विचार करतात,



अशा व्यक्तीवर आपण नाही लिहिणार तर कोण लिहिणार? गावातील लोकांनाही प्रश्न पडतो, हा माणूस स्वतःचं साधं घरही रंगवत नाही आणि हा कुठचा चित्रकार, ज्याच्याशी ही बाई तासन्तास बोलत असते नि यावर ही काय लिहिणार? मात्र वीणाताईंना या माणसाचं मोठेपण कळून चुकलं होतं. त्या नेटानं आपलं काम करत राहिल्या. काळाच्या पुढे जाऊन काम करणाऱ्या रॉबी डिसिल्व्हा यांचं काम वीणाताईंच्या लेखनातून मराठी वाचकांपर्यंत आलं.

पंधरा वेळा नोबेल नाकारली गेलेली भौतिकशास्त्रातील शास्त्रज्ञ लीझ मायटनर, बायोलॉजिस्ट रोझलिंड फ्रँकलिन, पाणीपंचायत योजना गावागावात राबवणारे पाणीतज्ज्ञ विलास साळुंखे, पूर्णतः अंधारात गेलेले खानखोजे, भारतातील बालमाता-बालमृत्यू या मूलभूत प्रश्नांवर काम करून वेलोर इथे इस्पितळ उभं करणारी आयडा स्कडर, एक सामान्य शिक्षिका ते इस्रायलच्या राष्ट्राध्यक्ष असा प्रवास करणाऱ्या गोल्डा मायर, शिक्षणपद्धतीवर मूलभूत काम करणाऱ्या माँटेसरी, वृक्षसंवर्धनासाठी आयुष्य समर्पित करणारा रिचर्ड बेकर, अमेरिकेतील पर्यावरणप्रेमी तत्त्वज्ञ थोरो, अशा पायाभूत काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय वीणाताईंच्या चरित्रलेखनानं मराठी वाचकांना करून दिला. ही सगळी चरित्रं वाचताना जाणवतं ते वीणा गवाणकर या लेखिकेच्या साध्यासोप्या शैलीचं कसब. त्या त्या व्यक्तीच्या चरित्रलेखनासाठी प्रचंड वाचन-संशोधन झालेलं असताना, त्या प्रभावातून बाहेर पडून तटस्थपणे त्या लेखन करतात. यामुळे त्यांनी लिहिलेलं चरित्र वस्तुनिष्ठ असतं. कुठेही ते गौरवपर होत नाही. वाचकाला वाचनात गुंतवून त्या त्या व्यक्तीचं कार्य त्या आस्थेनं आणि भावभावनांचं निर्लेपन टाळून पोहोचवतात.

वीणाताई त्यांच्या चरित्रलेखनाविषयी म्हणतात, मी लिहिलेलं चरित्र परिपूर्ण आहे असं मी म्हणणार नाही. चरित्रनायकातील माणसाचा शोध घेत मी लेखन करत जाते. वाचकांना त्या व्यक्तीचा परिचय होतो. ज्या वाचकाला अधिक माहिती जाणून घ्यायची आहे तो स्वतः शोध घेत जातो.

वीणाताईंच्या बोलण्यातून त्यांची पर्यावरणावरची आस्था स्पष्टपणे जाणवते. त्याविषयी बोलताना त्या सालेमान आणि थोरोच्या विचारांचा आवर्जून उल्लेख करतात. त्या म्हणतात, सालेमान आपल्याला कित्येक वर्षांपूर्वीच पर्यावरणाचा समतोल कसा राखावा याविषयी सांगून गेले. ते म्हणायचे की प्रत्येक शेताच्या बांधावर झाडं हवीत. ती कशासाठी? तर एका झाडावर घुबडाची एक जोडी येऊन राहते. ती रोज उंदीर मारून खाते. शेतकऱ्याच्या शेतात उंदरामुळे होणाऱ्या नासधुशीला आपसूकच आळा बसतो.

हे सांगत वीणाताई पोटतिठकीनं म्हणतात, आज या साखळीचे दुवे आपण तोडत आहोत. विकास हवा आहे, पण पर्यावरणाचा समतोल बिघडवून नव्हे. एखादा प्रकल्प सुरू करण्याच्या पाच वर्षं आधी दुसऱ्या ठिकाणी झाडं लावा, ती मोठी करा आणि मग प्रकल्पाच्या जागेवरील झाडं तोडा. थोरोचे विचार आधाराला घेऊन वीणाताई म्हणतात, की आपण निसर्गाचाच एक भाग आहोत याची जाणीव आपल्यात असली तर आपण आपसूकच निसर्गाचं रक्षण करू. ही जाणीव माणसात राहत नाही तेव्हा निसर्गाचा ऱ्हास सुरू होतो.

पर्यावरणाशी संबंधित एक सुंदर आठवण त्यांनी सांगितली. पर्यावरण पाठशाळाचे विद्याधर वालावलकर आणि त्यांच्या टीमनं टिटवाळ्याजवळचा उघडाबोडका डोंगर देशी झाडं लावून हिरवागार केला आहे. वालावलकर यांनी त्या डोंगरावर सकाळी ९ वाजता वीणाताईंना बोलावून त्यांच्या 'अवघा देहची वृक्ष झाला' या पुस्तकाचं प्रकाशन केलं होतं आणि वीणाताईंची एक तासाची मुलाखत घेतली होती. या कार्यक्रमाचा कुठेही गाजावाजा नाही. डोंगरावर पाण्याची-खाण्याची कोणतीही सोय नसताना पर्यावरणप्रेमी, पुस्तकप्रेमी मंडळी सायकलनं, स्कूटरनं त्या डोंगरावर आली होती. वीणाताई म्हणतात, अशी 'ओॲसीस' तयार होतात, ती माझ्या दृष्टीनं महत्त्वाची आहेत.

वीणाताईंच्या व्यक्तिमत्त्वातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तरुण पिढीशी संवाद साधण्यात त्यांना असलेलं औत्सुक्य. त्या स्वतःच्या घरी दर महिन्याला एक छान कार्यक्रम योजतात. कार्यक्रम हा शब्द मी सोयीसाठी वापरत आहे. त्या कार्यक्रमाला छोटेखानी अनौपचारिक मैफल वा सुसंवाद, कलेची देवाणघेवाण असं म्हणायला हवं. याची सुरुवात दीपक राजाध्यक्ष आणि त्यांच्या 'आविष्कार'च्या टीमनं 'गांधी'वर केलेल्या अभिवाचनापासून झाली. अक्षय शिंपी यांचा नाट्यप्रयोग, नुकतंच झालेलं स्वप्नील वारके यांच्या 'माकडवाला' कथेचं विकास पाटील यांनी केलेलं अभिवाचन... असे विशेषतः तरुण कलाकारांचे कार्यक्रम वीणाताईंच्या 'राधा'मध्ये होत असतात. तो संवाद त्यांना महत्त्वाचा वाटतो.

'ग्रंथाली'च्या वसईतील वाचकदिनाच्या कार्यक्रमातही त्यांनी अपर्णा पाडगावकर, मंगेश सातपुते आणि मकरंद सावंत या तरुण लेखक-दिग्दर्शकांची मुलाखत घेतली होती. त्यावेळेसही त्या म्हणाल्या होत्या, की तुम्ही माझी मुलाखत ठेवली असती तर कदाचित मी नकार दिला असता. मला तरुण मुलामुलींशी संवाद साधायला मिळणार आहे, यासाठी मी येत आहे. त्यांच्या वयाचा मी इथे उल्लेख करणार नाही. कारण त्या म्हणतात की आता वय मोजायचं सोडून दिलंय. मनानं कायम चिरतरुण असलेल्या वीणाताईंची म्हातारपणाविषयीची छान व्याख्या आहे. त्या म्हणतात, वयस्क होणं म्हणजे काय, तर मनाचे दरवाजे बंद करून घेणं. मनाचे दरवाजे उघडे ठेवले तर आपण तरुण पिढीशी सहज संवाद साधू शकतो.

वीणा गवाणकर यांच्या पुस्तकांचा वाचकवर्ग मोठा आहे. त्यांच्या पुस्तकांची विक्रीही चांगली होते. तरीही इतर मराठी पुस्तकाचं काय, हा प्रश्न त्यांना सतावतो. दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात तब्बल ऐंशी हजार विद्यार्थी नापास झाले, ही बातमी त्यांच्या मनाला त्रास देते. 'भाषा कितीही आल्या तरी कमीच, मात्र मातृभाषेला कमी लेखू नका,' असं सांगायला त्या विसरत नाहीत.

जाता-जाता ग्रंथालीच्या एका कार्यक्रमाची एक गोड आठवण त्या आवर्जून सांगतात. त्या म्हणतात, 'ग्रंथाली'कडून माझं पुस्तक प्रकाशित झालं नाही, परंतु ग्रंथालीच्या कार्यक्रमांना मी आवर्जून जायचे. ग्रंथाली परिवारातील सर्वांशी माझे जिव्हाळ्याचे संबंध होते. ग्रंथालीच्या एका कार्यक्रमाला आशाताई भोसले आल्या होत्या. आशाताई म्हणजे उत्साही व्यक्तिमत्त्व. वासंती मुझुमदार, मी अशी अनेक लेखक, रसिक मंडळी आशाताईंभोवती बसलो होतो. एक गृहस्थ (आता नाव आठवत नाही) मुलाखत घेत होते. अतिशय गंभीर चेहऱ्यानं गंभीर काहीतरी बोलत होते. आशाताई त्यांच्याकडे एकटक बघत होत्या. शेवटी न राहवून त्या म्हणाल्या, हे जे काही चालू आहे ते वेगळंच आहे. असं बोलून त्या स्वतःच भरभरून बोलू लागल्या. उदाहरणं देत मोकळेपणानं गाणी गाऊन दाखवू लागल्या. ही आठवण सांगताना नॉस्टॅल्जिक झालेल्या वीणाताईंना हसू आवरत नव्हतं.

राहणीमानातला साधेपणा, डोळ्यांत बुद्धिमत्तेची चमक, बोलण्यात मृदुता; म्हणजे अगदी आवडता-नावडता कोणताही विषय असला तरी संयत बोलणं, यामुळे वीणा गवाणकर संवाद साधताना केवळ लेखिका राहत नाहीत, त्या एक उत्तम संवादक होतात. त्यांच्या बोलण्यात जगाबद्दल कुतूहल आहे, त्यामुळे मनाचे दरवाजे उघडे ठेवून त्या बोलत राहतात... सहजतेनं गप्पांची मैफल रंगवतात... आणि आपणही नकळत त्या संवादयात्रेतील शब्दयात्री होत जातो.

**- अश्विनी भोईर**
ashwinibhoir23@gmail.com

# स्मिता भागवत एक अष्टपैलू व्यक्तिमत्व



डॉ. प्रियदर्शन मनोहर

**सु**प्रसिद्ध ज्येष्ठ लेखिका श्रीमती स्मिता भागवत ह्यांना २१ जुलै रोजी मुंबई इथे वयाच्या एक्क्याऐंशीव्या वर्षी देवाज्ञा झाली. त्यांचा जन्म बडोदा शहरातल्या सुप्रसिद्ध कप्तान घराण्यात झाला. माहेरच्या विजू (विजया) कप्तान अभ्यासात अत्यंत हुशार आणि वाङ्मयात प्रवीण विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध होत्या. बीएससीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर तरुणपणीच त्यांनी लेखनाला सुरुवात केली. सिद्धार्थ भागवत ह्यांच्याशी विवाह झाल्यावर त्या बडोद्याहून अहमदाबादला स्थायिक झाल्या. तिथे गुजराती लेखन सुरू केले. पुढे त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांसमवेत कॅनडामध्ये स्थलांतर केलं. त्यांच्या पश्चात त्यांची तीन मुले - नंदिता, स्वाती (अनघा), आणि सलील, त्यांचे कुटुंबीय आणि मोठा आप्त परिवार आहे. आमच्यासारखे जगभरचे मराठी वाचक त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहेत.

स्मिता भागवत ह्यांचे व्यक्तिमत्त्व चौफेर होते. माझा आणि स्मिताताईंचा परिचय गेल्या दहा वर्षांचा. मराठी लेखनकलेला उत्तेजन देण्यासाठी मी २०१६ मध्ये 'माझा मराठीचा बोल (मामबो)' ह्या साहित्यिक समूहाची स्थापना केली तेव्हापासून स्मिताताई त्यात उत्साहाने भाग घेऊन नवोदित लेखकांना मार्गदर्शन करत आल्या आहेत. सगळ्यांशी मिळूनमिसळून आणि निरहंकारीपणे वागणाऱ्या स्मिता भागवत मामबो सदस्यांना स्मिताताई किंवा स्मितामावशी वाटत असत. त्यांचे वर्णन करण्यासाठी मी 'चौफेर' हा शब्द काळजीपूर्वक निवडला आहे. ह्याचे कारण असे की त्या मराठी, गुजराती, इंग्रजी आणि हिंदी अशा चारही भाषांत लेखन करत असत. त्यांची अनेक पुस्तके मराठी आणि गुजरातीमध्ये प्रसिद्ध झाली आहेत. आजतागायत त्यांची जवळजवळ शंभर पुस्तके प्रसिद्ध झालेली असून त्यांना अनेक साहित्यिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. स्मिताताई मला वाटते मराठीपेक्षा कदाचित कांकणभर जास्तच गुजरातीमध्ये लेखिका म्हणून प्रसिद्ध होत्या. गुजरातीतील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक उमाशंकर जोशी ह्यांचा त्यांना आशीर्वाद लाभला होता.

त्यांना 'चौफेर' म्हणण्याचे दुसरे कारण असे आहे की त्यांचे लेखन अनेक विषयांवर होते - ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व (बाजीराव-मस्तानीवर लिहिलेले 'पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या' - ह्या पुस्तकाला १९९५ सालचा गुजरात राज्याचा सर्वोत्तम कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे), सामाजिक व्यक्तिमत्त्व, पुढारी ('इये सयाजीचीये नगरी' - बडोदा संस्थानचे राजे श्रीमंत सयाजीराव गायकवाड, 'सरदार वल्लभभाई पटेल', 'प्रकाशाची सावली' - महात्मा गांधी आणि त्यांचा ज्येष्ठ मुलगा हरिलाल गांधी ह्यांच्या नात्यातला



सत्कार स्वीकारताना स्मिता भागवत



स्मिता भागवत – मधु मंगेश कर्णिक यांच्यासह

तणाव, संत (ज्ञानदेवांची मुक्ताबाई – 'तेजस्विनी'), क्रांतिकारक ('शौर्यगाथा क्रांतिवीरांची', 'नाही चिरा नाही पणती'), धर्मकारण ('महाराष्ट्र धर्म वाढवावा') ह्याचबरोबर सत्यघटनांवर आधारित लेखन ('पुत्र मानवाचा'), पूर्णपणे काल्पनिक लेखन; असा त्यांच्या लेखनाचा प्रवास विविधांगी होता. त्यांनी प्रवासवर्णने लिहिलेली आहेत ('सफरनामा'), आरोग्य ('रेकी जीवनप्रणाली') आणि समुपदेशन (counselling) ह्या विषयावरही लिहिलेले आहे ('नात्यांची वीण उसवताना') तसेच स्त्रीमुक्तीवर विचार मांडलेले आहेत ('शून्याचं मोल अमोल'). त्यांचे कथासंग्रह ('व्यथा व्यक्त होताना', 'तिची कथाच वेगळी') आणि ललित लेखसंग्रह ('आगळी माती, वेगळी माणसं') प्रसिद्ध झालेले आहेत. कथा, कादंबरी, लघु कादंबरी, चरित्र, ऐतिहासिक अशा साहित्याच्या विविध आकृतिबंधांत त्यांनी यशस्वी मुशाफिरी केलेली आहे. त्यांच्या साहित्याला गुजरात साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार ह्यांच्यासह इतर अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत.

शेवटी स्मितातार्इंना 'चौफेर' म्हणण्याचे तिसरे आणि मुख्य कारण म्हणजे लेखनाबरोबरच स्वतःची करिअर आणि संसार उत्तम सांभाळत त्यांनी प्रदीर्घ साहित्यसेवा केलेली आहे. भारतात त्या गणित आणि जीवशास्त्र ह्या विषयांच्या शिक्षिका होत्या. पुढे परदेशी स्थलांतरित झाल्यावर कॅनडाच्या टीव्हीवर त्यांनी अनेक कार्यक्रम सादर केलेले आहेत. विविध विषयांवर अनेक भाषणे दिलेली आहेत. सगळ्यात मोठ्या रंगमंचापासून ते आमच्या छोट्याशा मामबो साहित्यिक कट्ट्यावरसुद्धा त्यांनी हजेरी लावलेली आहे. ह्याचे मला फार कौतुक वाटते. नाहीतर काय होते की लेखक एकदा का मोठा नामधारी झाला, त्याचा 'लेखकराव' झाला की त्याचे सामान्यजनांबरोबरचे नाते तुटत जाते. तसे स्मितातार्इंनी होऊ दिले नाही. त्यांचा कौतुकाचा शब्द अगदी नवशिक्या लेखकाच्या पाठीवरसुद्धा थाप द्यायला सदैव तत्पर असे.

स्मितातार्इ व्यक्ती म्हणून काय होत्या ह्याची एक झलक त्यांच्या पुढील वाक्यांवरून होते : ''दोन माणसं कधीच तंतोतंत सारखी नसतात, हे मी जेनेटिक्समधे शिकले. मॅटर्नल ट्वीनही अगदी सारखी नसतात, हे मी बघितले आहे. मानवी मन माझ्या असीम कुतूहलाचा आणि म्हणून अभ्यासाचा विषय आहे. औपचारिक अभ्यास संपल्यावरही मनापासून अभ्यासलेला! माझंही कामावर नितांत प्रेम आहे. 'कठीण समय येता कोण कामास येतो,' या नैराश्यसूचक शब्दांत बदल करून माझे वडील म्हणत, 'कठीण समयी स्वतःची विचारशक्तीच कामास येते. तिला त्वरित कार्यरत करून वेगाने निर्णय घ्यावेत; पण आवेगाच्या भरात निराश होऊ नये.' स्वतः व्यक्त होणं आणि कुणी व्यक्त होत असताना ऐकणं हा माझा आवडीचा प्रांत आहे.''

संपूर्ण जन्मभर जे तत्त्वज्ञान त्यांनी लोकांना सांगितले तेच त्यांनी स्वतः पाळले. हे महाकर्मकठीण काम स्मितातार्इंनी करून आपल्या सगळ्यांसमोर जगावे कसे ह्याचा एक आदर्श घालून दिलेला आहे. त्यांनी त्यांच्या पुस्तकांतून दिलेला वाचन आणि लेखनसंस्कृतीस उत्तेजन देणे हा संदेश आपण पाळणे हीच त्यांना मनःपूर्वक वाहिलेली श्रद्धांजली ठरेल!

स्मितातार्इ, तुमच्यासारख्या 'चौफेर' व्यक्तिमत्त्वाचे स्वागत करायला देव सिद्ध झाला आहे. शुभास्ते पंथानः संतु!

– डॉ. प्रियदर्शन मनोहर

pmanohar63@hotmail.com

वैयक्तिक घटनांतून उलडणारा समाजाचा आरसा!

# ॲनी अरनॉक्स



संजीवनी खेर

साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळालेली पहिली फ्रेंच लेखिका ॲनी ॲरनॉक्स हिचा जन्म नॉर्मन्डी येथे १ सप्टेंबर १९४० रोजी झाला. प्राध्यापकी हा तिचा आवडता व्यवसाय. तिने तीसहून अधिक पुस्तके लिहिली. त्यात आत्मपर हकिगती लिहिल्या. ज्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला जातो. तिचा विवाह फिलिप ॲरनॉक्स याच्याशी झाला. त्यांना दोन मुले आहेत - डेव्हिड आणि एरिक. त्यांचा घटस्फोट १९८० साली झाला. आता ती पॅरिसच्या एका उपनगरात राहते.

तिचे आईवडील निम्नमध्यमवर्गातले होते. त्यांचे किराणा मालाचे दुकान आणि एक छोटासा कॅफे होता. ते गिरणी कामगारांच्या वस्तीत राहत होते. ती त्यांची एकुलती एक मुलगी आहे. तिची मोठी बहीण सहा वर्षांची होऊन अचानक गेली. तिचे सारे बालपण १९४४च्या नॉर्मंडीच्या युद्धाच्या, बॉम्बहल्ल्यांच्या भीतीच्या छायेत गेले. त्यानंतर तिचे आईवडील जिथे कारखान्यात काम करत होते त्या इव्हॅतो (Yvetot) गावी आले. मात्र त्यांनी ॲनीला कॅथलिक बोर्डिंगमध्ये शिकायला ठेवले. वास्तविक आईवडिलांना ह्या शहराच्या मध्यभागी असलेल्या महागड्या ठिकाणी ठेवणे परवडणारे नव्हते. परंतु तिने शिकून मोठे व्हावे, प्रतिष्ठित लोकांसारखे राहावे-वागावे असे त्यांना वाटे. ॲनीला अभ्यासाची गोडी होती, अभ्यास करून मोठे होण्याची धडपड तिला करावीशी वाटे. आपले आईवडील आपल्या पोटाला चिमटा काढून आपल्याला शिकवत आहेत याची जाणीव तिला होती. शक्यतो काम करून चार पैसे मिळवून आपले शिक्षण आपण पुरे करावे असा तिचा मानस होता. वयाच्या १८व्या वर्षी तिने ROUEN इथे प्रवेश घेतला. तत्त्वज्ञान हा विषय तिने अभ्यासाला घेतला होता. याच काळात तिने सीमोन बोवाचे 'सेकंड सेक्स' हे पुस्तक वाचले आणि तिचे डोके भिरभिरले. तिच्या मनात स्त्री-पुरुष असमान जीवनशैलीची, पुरुषप्रधान समाजरचेनची जाणीव पक्की झाली. ती अक्षरक्षः पुस्तकातील विचारांनी झपाटली गेली. या काळात तिची तब्येत ठीक राहात नसे. याच दरम्यान तिने शाळा अर्धवट सोडून लंडनच्या सीमेवरील फींचले येथील वाचनालयात काम करून वाचन वाढवायचा निश्चय केला. त्या एकाकी क्षणात आपण लेखनच करायचे हा विचार तिच्या मनात घट्ट रुजला. त्यासाठी नीट प्रशिक्षण व्हायला हवे म्हणून तिने Rouen विद्यापीठात आर्ट विभागात प्रवेश घेतला. तिथे तिला शिष्यवृत्ती मिळाली. तिला आधुनिक साहित्य विषयात पदवी मिळाली. तिने शिक्षिका म्हणून नोकरीही सुरू केली. त्याचा सुमारास तिने एक कादंबरी लिहून

प्रकाशकांकडे पाठवली, पण २-३ प्रकाशनगृहांकडून ती साभार परत आली.

दरम्यान तिची भेट फिलिप अरनॉक्स याच्याशी झाली. तो पोलिटिकल सायन्सचा विद्यार्थी होता. ते प्रेमात पडले. त्यातून ॲनीला दिवस गेले. ही आनंदाची बाब होती, परंतु तेव्हाच्या कायद्यानुसार गर्भपात केल्यास अविवाहित तरुणीला तुरुंगावासाची शिक्षा होती. अवैध गर्भपात भयंकर गुन्हा होता. दोघांनाही शिक्षण पूर्ण करायचे होते. त्यात हा भलताच प्रश्न उभा राहिला होता. त्यावेळी पॅरिसमध्ये अवैध गर्भपात करवून घेण्याची अनेक केंद्रे होती. तिने त्या यातनासत्रातून जाऊन गर्भपात करवून घेतला. ते डॉक्टरांचे, नर्सचे भयभीत आणि असुरक्षित हात तिला जन्मभर आठवत राहिले. त्या आठवणीचे तिने आजही अंगावर काटा उभा राहील असे वर्णन आपल्या संस्मरणात आणि कादंबरीत करून ठेवले आहे. स्त्रीच्या शरीरावर समाजपुरुषाचा ताबा ही महाभयंकर बाब होती नि आहे. नंतरच्या काळात तो कायदा रद्द झाला आणि स्त्रीला मोकळे होण्याचा मार्ग मिळाला. तिने फिलिपशी १९६४मध्ये लग्न केले. तो बुद्धिवादी, श्रींमत घरातला तरुण होता. तिला वाटले आपल्याला जे स्थैर्य, सुबत्ता हवी होती ती मिळाली. परंतु हा आनंद फार काळ टिकला नाही. तो आधुनिक असला तरी आधुनिक विचारांचा नव्हता. तो पुराणमतवादी पुरुषांसारखाच विचार करत होता. तिने घर-मुले संभाळावीत, आपल्या प्रतीष्ठेला शोभेलसे राहावे, पार्ट्या द्याव्यात. यापेक्षा काही तिने करू नये. तसे करणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे, असे तो समजत होता. ॲनीसाठी लेखन हेच सर्वस्व होते. मुलांना संभाळणे तिला आवडे, पण घर आणि मुले एवढेच तिचे जग नव्हते. नवी आविष्काराची क्षितिजे तिला हाकारत होती. त्याशिवाय जगणे तिला शक्यच होत नव्हते. म्हणून ती तो घरी नसताना सारे सांभाळून लिहीत बसे.

एकदा आपली कादंबरी लिहून झाल्यावर तिने फिलिपला दाखवलीच नाही. 'क्लिन्ड आऊट' ही तिची पहिली कादंबरी. ती प्रकाशित झाल्यावर त्याला आश्चर्यचकित करायला दाखवली तेव्हा सारे सांभाळून तिने लिहिले तेव्हा तो म्हणाला, 'माझ्या नकळत तू हे उद्योग करत होतीस वाटते?' सुशिक्षित माणसाची ही प्रतिक्रिया ऐकून ती उद्विग्न झाली. त्याच्या मते लेखन म्हणजे आपले काम सोडून वेळ वाया घालवणे होते. तिच्यासाठी लेखन हा मन मोकळे करायचा मार्ग होता. स्वत:च्या एकाकीपणाशी लढण्याचा, स्वत:च्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याचा. पतीला पसंत नव्हते म्हणून तिने या अप्रिय होत चाललेल्या संबंधातून सुटका करून घेतली.

एकीकडे आईवडिलांचा गरीबवर्गातला वावर आणि बोलणे-चालणे, दुसरीकडे नवऱ्याचा श्रीमंतीचा अहंगंड, पार्ट्या यजमानपद भूषवणे इत्यादी. कुठेच मनासारखे वातावरण नव्हते. प्राध्यापकीदेखील बराच वेळ खात असे. तरी ती सुरू ठेवणे तिला महत्त्वाचे, स्वत्व राखण्याचे द्योतक वाटत होते. त्याहून अधिक होती लिहायची ओढ. एरिक आणि डेव्हिड ही मुले मोठी होत होती. ॲनीसाठी लेखन म्हणजे छंद नव्हता तर तिचा श्वासोच्छ्वास होता. त्यामुळे तिला येणारा प्रत्येक अनुभव आणि अनुभूती पुस्तकाचा विषय झालेला आहे. एकाच वेळी अनेक भूमिका जगताना एका स्त्रीची कशी परवड होते, याचे ॲनी एरनॉक्स हे एक जिवंत उदाहरण आहे. लिहिणे ही तिच्यासाठी एक थेरपी होती, स्वतःचे हरवलेले अस्तित्व शोधण्याचा तो एकमेव मार्ग होता.

एरनॉक्सच्या 'अ फ्रोजन वुमन' या १९८१मधील पुस्तकात तिच्या वेदना सविस्तर आल्या आहेत. या पुस्तकात तिने लग्न, मातृत्व आणि लेखिका होण्याचा हा संपूर्ण संघर्ष मांडला आहे.

आपली आई आता या जगात नाही हे तिला कळते तेव्हा ती पार हबकते. 'म्हणजे आता मी तिचा आवाजही ऐकू शकणार नाही? तिला स्पर्श करू शकणार नाही? असे होता कामा नये. मला तिला शब्दांत जिवंत करावेच लागेल,' असे तिला वाटू लागले आणि मग लिहिली गेली एक हळवी कादंबरी. तिने आपल्या आईवर लिहिलेल्या 'वुमन्स स्टोरी' या कादंबरीत, तिच्याबरोबरचे अनेक हळवे क्षण टिपले आहेत. तिचे असणे, आपल्या असण्याशी जोडलेले आहे. मी म्हणजे तिचाच अंश आहे. जशी मी दिसते, बोलते, वागते तिचीच छाया त्यात असते. तिचे बोलणे, हसणे, रागावणे सारे तिला आठवत असते आणि आता किती मोठ्या ऐवजाला आपण मुकलो आहोत याची जाणीव तिला होते. तिने लेखनातून मांडलेले ते हळवे क्षण वाचताना वाचकांच्या मनाला घरे पडतात. तिच्या बालपणातील अनेक घटना तिला अस्वस्थ करतात. आईचे कामगार वर्गातून येऊन, मध्यमवर्गात मुलीला तरी जाता-वावरता यावे यासाठी केलेली धडपड तिला प्रत्यहीं आठवू लागते. त्या साऱ्या काळाशी लेखिकेचा जोडला गेलेला एकमेव दुवा असतो, आई. त्या काळाचा ती तुकडा असते.

आई जेव्हा जेव्हा लेकीच्या उच्चभ्रू वस्तीतील घरी येते, तिच्या अभिजन मित्रमंडळीत वावरते तेव्हा ती जणू स्वत:ला लपवत असते. ती लेकीच्या घरी चूप बसून राहते. आपल्या गावंढळ दिसण्या-वागण्याचा लेकीला कमीपणी वाटू

नये म्हणून. ती लेकीकडे येते तेव्हा तिच्याकडे काम करते. मुलांना संभाळते, आपला भार तर होत नाही ना याचा विचार करते. आपल्या नि लेकीच्या जीवनात खूप फरक पडलाय याचे तिला भान होते. तिच्या डोळ्यांत लेखिकेसाठी खूप कौतुक असे, ज्याची किंमत नवऱ्याने केलेल्या दुर्लक्षाने अधिकच तीव्रतेने जाणवत असे.

कादंबरीत आपल्याला बेचैन करतो तो अखेरचा भाग. आई अल्झायमरने अनेक गोष्टी विसरू लागते. जणू लेखिकेची लेकच होते. तिला संभाळणे ही तारेवरची कसरत असते. इथे लेखिका कुठेही अती करुणेचा आव आणत नाही. आहे तसे एक प्रकारच्या कोरडेपणाने तरी हळुवारपणे वास्तव मांडते. अखेरच्या भागातले हे आईचे चित्र मात्र फारच भावुक करणारे आहे. आई सारे विसरत चाललेली आहे. स्वत:चे नाव, कपडे नीट घालणे, कुठे जात आहोत हे विसरणे, जेवलेले विसरणे.. पुढे तर लेकीलाही विसरणे. हा आजाराचा बेचैन करणारा भाग आहे. त्यामुळे आता आईलेकीच्या भूमिकांची अदलाबदल झाली आहे.

म्हणूनच तिच्या लेखनाला सामाजिक दस्तऐवजाचे रूप येत जाते. तिच्या साऱ्याच कादंबऱ्या या समाजजीवनाचा एक तुकडा समोर ठेवतात, भलेही तो तिचा वैयक्तिक अनुभव असला तरी! अनेकदा आपल्याला वाटते की साहित्यात कल्पनाशक्ती म्हणजे एखादी परीकथा रचणे किंवा काल्पनिक पात्र तयार करणे. परंतु ॲनी एरनॉक्सच्या बाबतीत कल्पना-शक्तीची व्याख्या बदलते. तिच्यासाठी कल्पनाशक्ती म्हणजे स्मरणशक्तीला मिळालेली दृष्टी आहे. ती आपल्या-समोर तिचा एखादा जुना फोटो ठेवते, तेव्हा तो फोटो फक्त कागदाचा एक तुकडा उरत नाही. कल्पनाशक्तीच्या सुरीने त्या त्या फोटोच्या मागचे सत्य उघडे करते. त्या काळात त्या खोलीत पडलेला प्रकाश, वातावरणातील अस्वस्थता या सर्वांची पुनर्रचना होते. एरनॉक्स कल्पनेचा वापर खोटे बोलण्यासाठी नाही, तर विस्मरणात गेलेले सत्य पुन्हा जिवंत करण्यासाठी करते. आणि म्हणूनच, तिचे हे वास्तववादी लेखन कोणत्याही काल्पनिक कादंबरीपेक्षा जास्त थरारक वाटते.

हे जाणवते खास करून 'हॅपनिंग' या कादंबरीत तिने करून घेतलेला गर्भपात. स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यातना, कायद्याची भीती वैयक्तिक अनुभव वा केवळ एक विदारक घटना राहत नाही तर त्या काळातील अत्यंत भीतिदायक अनुभव असतो. त्या ठिकाणाचे वास्तव, तेथील खिडकीतून येणारा अंधुक प्रकाश, कुबट खोली, तिथला रक्ताचा वास, नर्सचा थंडगार स्पर्श यातून लेखिकेला जे सांगायचे आहे ते



ॲनी ॲरनॉक्स

स्पष्ट होते. त्या घटनेनंतर अनेक काळानंतर लिहिणे म्हणजे ते पुर्ननिर्मित करणे. त्यातून वाचकाला त्या काळातील भीतीचा अनुभव देणे, हे सफल होते. इथे तिची सृजनशीलता दिसते.

ह्या पुस्तकातून लेखनकर्मी स्त्रीची तसेच एकूणच कायद्याने नाडलेल्या स्त्रीवर्गाची तगमग समोर येते. ती घटनांतील सत्य लपवत नाही. अप्रिय असले तरी तिचे लेखन जणू काळाचा पट होत जाते. जणू साहित्यिक पुरातत्त्व मजकूर होत जातो. महायुद्धकाळ, स्त्रियांचे समाजातील स्थान, त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा, त्यांच्या लैंगिक भावनांवरील दडपणे, पण तिच्या भावनांचा निचरा तिच्या शारीर तृष्णेने शमन कसा होणार? त्या भावना दाबून टाकलेल्या राहिल्या तर? यांचे अगदी उघडेवाघडे चित्रण तिच्या 'गेटिंग लॉस्ट' या कादंबरीत वाचायला मिळते. जे तिने दुसऱ्या एका 'सिंपल पॅशन'मध्ये लिहिले आहे.

त्या कादंबरीतील वर्णने वाचल्यावर मला प्रश्न पडला, की हे पार्नोग्राफी वाटावी असे लेखन नोबेल पुरस्कारासाठी महत्त्वाचे का मानले असावे? त्यासाठी त्याबद्दलचे अनेक लेख वाचून देखील मनाला पटत नव्हते. नक्की लेखिकेला काय मांडायचे आहे? फक्त एका पन्नास वर्षीय स्त्रीची एका तीस वर्षांच्या रशियन राजनयिक खात्यातील विवाहित पुरुषाबद्दल आत्यंतिक शारीरिक ओढ, त्याच्याविना होणारी तिची तडफड, लेखनही न होऊ शकणे, तो आज ना उद्या त्याच्या देशात परत जाणार हे ठाऊक असतानाही; स्वत:ची दोन मोठी मुले असून, त्याच्याकरता वेडेपिसे होणे, आपल्या वाचकांनाच नव्हे तर मोकळ्या लैंगिकतेच्या फ्रेंचानाही थोडे अवघड गेले होते. पुढे ती कादंबरी आणि तिच्या डायरीतले उल्लेख लोकांच्या पचनी पडले.

ज्या साहित्याला आपण अभिजात मानतो, तिथे




लैंगिक ओढ किंवा शारीरिक संबंध हे नेहमी सूचक किंवा प्रतीकात्मक भाषेत मांडले जातात. एरनॉक्सने मात्र सर्व मर्यादा ओलांडून हे अगदी सपाट आणि उघड्या स्वरूपात मांडले आहेत. पन्नासाव्या वर्षी अशा तीव्र शारीरिक ओढीचे आणि वेडेपणाचे प्रदर्शन करून एरनॉक्सला नेमके काय साधायचे आहे, वासनेचे राजकारण आणि स्त्रीचे शरीर (Politics of Desire) साहित्यात आणि समाजात पुरुषाने आपल्या लैंगिक इच्छांवर, वासनेवर किंवा अनेक स्त्रियांसोबतच्या संबंधांवर उघडपणे लिहिणे नेहमीच 'पुरुषी पराक्रम' म्हणून स्वीकारले गेले आहे. मात्र एका पन्नास वर्षांच्या, प्रगल्भ आणि दोन मुलांच्या आईने आपल्या शारीरिक भुकेबद्दल इतक्या उघडपणे लिहिणे, हा समाजात एक मोठा टॅबू मानला जातो.

लेखणीचे मोठेपण यात दिसते की एरनॉक्सला दाखवायचे आहे की स्त्रीचे शरीर आणि तिची इच्छा ही कोणत्याही वयात संपत नाही. पन्नासाव्या वर्षीही स्त्रीमध्ये तितकीच तीव्र कामुकता, Erotic desire, असू शकते. ती केवळ एक आई किंवा आजी नसते, तर ती शेवटी एक हाडामासाची स्त्री असते, हे सांगणे हाच एक क्रांतिकारी विचार आहे.

पोर्नोग्राफीचा उद्देश वाचकाला किंवा प्रेक्षकाला केवळ उत्तेजित करणे हा असतो. तिथे भावनांना स्थान नसते. एरनॉक्सच्या लेखनात शारीरिक संबंधांच्या वर्णनामागे एकाकीपणाची आणि अगतिकतेची दडलेली तीव्र वेदना आहे. ती इथे स्वतःचे उदात्तीकरण करत नाही. ती दाखवते की एवढी मोठी लेखिका असूनही ती एका पुरुषाच्या फोनसाठी तासन् तास कशी वाट पाहत राहते, स्वतःची प्रतिष्ठा कशी विसरते. लेखनदेखील होऊ शकत नाही. तशी मन:स्थितीच नसते. तिच्या ह्या डायरीच्या पुस्तकात 'त्याचे' नाव दिलेले नाही. तारीखवार घटनाक्रम दिला आहे. लेखकांच्या सभांमध्ये रशियन कॉन्स्युलेटने तिला बोलावले असताना ही ओळख होते. त्याचा उल्लेख 'एस' असाच केलेला आहे. त्याची कामुक ओढ एवढेच पुढे शिल्लक असते. बरे, या पुस्तकात काल्पनिक काही नाही तर त्यात तिच्या डायरीतील नोंदी आहेत. यात हे शरीराचे प्रदर्शन नाही, तरल मानवी लाचारीचे आणि स्वतःला पूर्णपणे गमावण्याचे (Getting Lost) ते एक अस्वस्थ करणारे मानसिक चित्रण आहे.

मरणाची वेळ जवळ आल्याच्या भावनेने, जीवन हातातून सुटेल अशा वेळी जगण्याच्या इच्छेने तिला झपाटले आहे. त्यात 'तो' नाही हे निश्चित असल्याने त्या विरहाचेही दु:ख आहे. वास्तविक बौद्धिक पातळीवर तो तिच्या बरोबरीचा नाही, त्याच्याशी काही चर्चा होऊ शकत नाही. त्याच्या आवडीनिवडीही अती सामान्य आहेत. तो आपल्या पत्नीची आठवणही अधूनमधून काढतो. आणि एक दिवस सहजपणे तिला न सांगता निघून जातो. तिला ही फसवणूक वाटते. त्यानंतरच्या पानांत तिला पडणाऱ्या त्याच्या आणि आईच्या स्वप्नांचे उल्लेख येतात. आंतरिक ओढ असलेले लेखन ती हरवून बसते. त्यातून बाहेर यायला, पुन्हा पूर्वीसारखे लेखन, व्याख्यान देणे सुरू व्हायला, साहित्यिक वर्तुळात वावरायला तिला वेळ लागतो. ह्या पुस्तकात तिने उघडपणे स्त्रीच्या वासनांचे वर्णन केले आहे. त्यापुढे तिने समाजातील स्त्रीच्या कामनांवरील इच्छांना झुगारलेले दिसते. स्वत:च्या डायरीत तरी आपण सूचक लिहिण्याहून सत्य लिहिणे तिने मान्य केले.

माणूस वयाच्या पन्नाशीत पोहोचतो, तेव्हा त्याला हळूहळू म्हातारपण आणि मृत्यूची चाहूल लागायला लागते. एरनॉक्ससाठी त्या रशियन मुत्सद्द्याशी असलेले शारीरिक संबंध म्हणजे तरुण राहण्याचा आणि जिवंत असण्याचा एक अट्टहास होता.

गूढ अर्थ : ती तीव्र शारीरिक ओढ म्हणजे मृत्यूच्या भीतीविरुद्ध पुकारलेले एक युद्ध होते. जोपर्यंत शरीरात ती तीव्र वेदना आणि ओढ जिवंत आहे, तोपर्यंत आपण जिवंत आहोत, ही भावना तिला त्या वयात टिकवून ठेवायची होती.

एरनॉक्सच्या मते पारंपारिक साहित्यात आपण ज्याला सूचकता म्हणतो, ते अनेकदा सत्याला लपवण्याचे किंवा त्याला सभ्य बनवण्याचे ढोंग असते.

ती म्हणते, आपण आपल्या डायरीतही स्वतःशी प्रामाणिक राहू शकलो नाही, तर आपण खरे लेखक होऊच शकणार नाही. तिने मला त्या वयात अशी तीव्र ओढ लागली होती, मी वेडी झाले होते आणि मी माझी प्रतिष्ठा गमावली होती, हे सत्य कोणत्याही शाईचा किंवा कल्पनेचा मुलामा न लावता कागदावर ओतले.

आपण जे अनुभवले ते प्रामाणिकपणे कागदावर टिपणारी ही जागतिक कीर्तीची लेखिका. तिचे लेखन वाचूनच आपण तिच्याबद्दल मत बनवावे हे बरे.

**– संजीवनी खेर**

sanjeevanikher@gmail.com

# नव्या दिशा न्यू डिरेक्शनसची मालिका



नंदन जोशी

New Directions ही प्रकाशन संस्था अनेक वर्षांपासून नवीन लेखन प्रसिद्ध करत आली आहे. केवळ इंग्रजीतलंच नव्हे, तर भाषांतरित साहित्यदेखील. २०२२मध्ये त्यांनी Storybook New Directions ही आठ पुस्तकांची मालिका प्रसिद्ध केली. शंभर पानांहून कमी आकाराच्या लघुकादंबऱ्या व कथासंग्रह यात समाविष्ट आहेत. आपल्या लहानपणी सुट्टीच्या दिवशी एका बैठकीत वाचून संपवलेल्या पुस्तकांची आठवण होईल असा अनुभव देणारी पुस्तकं. अर्थात एक पुस्तक वगळता ही प्रौढांकरता काढलेली मालिका आहे. अपवाद म्हणजे Clarice Lispector या ब्राझीलमधील लेखिकेचं 'The Women who killed the Fish' हे लहान मुलांच्या गोष्टींचं पुस्तक. तसं पाहता Lispectorचं बरंचसं लिखाण हे प्रौढांकरता केलेलं : वर्तमानपत्रांमधले कॉलम, कथा, कादंबऱ्या आणि निबंध.

या मालिकेतील आठही लेखक-लेखिका या विविध देशांतल्या अभिनव संवेदनाशीलतेच्या आहेत. या मालिकेत निवडलेलं लिखाण संक्षिप्त स्वरूपातलं असलं, तरी अभिनव आणि महत्त्वपूर्ण आहे. या लेखामार्फत लेखनाच्या कोणत्या नवीन दिशा दाखवल्या आहेत याचा शोध घ्यायचा होता.

मालिकेतील आठ पुस्तके

१. Laszlo Krasnahorkai : Spadework for a Palace
२. Yoko Tawada : Three Streets
३. Natalia Ginzburg : The road to the city
४. Helen Dewitt : The English understand wool
५. Rachel Ingalls : In the Act
६. Qsamu Dazai : Early Light
७. Cesar Aira : The Famous Magician
८. Clarice Lispector : The Woman who killed the Fish.

प्रस्तुत लेखामध्ये पहिल्या दोन पुस्तकांवर लक्ष केंद्रित केलं आहे. सर्वप्रथम Yoko Tawadaच्या Three Streets कडे वळू या. या संग्रहात तीन कथा आहेत ज्यांची शीर्षकं बर्लिन शहरातील तीन रस्त्यांची आहेत. यातील प्रत्येक रस्ता एका कलाकाराच्या किंवा कवीच्या नावाचा आहे. पहिली कथा Kathe Kollwitz या चित्रकाराच्या नावाच्या रस्त्यावर घडते. बर्लिन शहरात निवेदकानं केलेल्या भ्रमंती-विषयीची आहे. या भ्रमंतीत निवेदकाला मुलांची वेगवेगळी रूपं भेटतात : रोबॉट मुलं, आई-वडिलांसोबत बागडणारी मुलं आणि एका मुलाचं भूतदेखील. या सर्व प्रकारच्या मुलांसोबत वागता-बोलता शेवटी निवेदक Kollwitzच्या

दगडी पुतळ्यापाशी पोचतो. कधी खऱ्या-खुऱ्या संवादांनी तर कधी विचारांच्या वा स्वप्नवत जगात घडणारी. यात समाजाविषयीचं भाष्य येतं. उदाहरणार्थ, रोबॉट मुलाकडे बघून समकालीन तरुण-तरुणीचं मनोविश्व उघड होऊ लागतं. मुलं वाढवण्याची हौस तर आहे, परंतु त्या सांगोपनाची ओढ रोबॉट मुलाबरोबरच्या सहवासातून ते पूर्ण करतात. हाडा-मांसाच्या मुलांसारखेच रोबॉट मूलही हट्ट करते. ज्यावेळी निवेदकाची मुलाच्या भुताशी गाठ पडते, ते मूलदेखील त्याला खाऊ घेऊन देण्याचा हट्ट धरतं. हे करत असताना निवेदकाला दिसतं की या मुलाचा चेहरा खंगलेला, मृतदेहासारखा आहे. त्याला या मुलाला सांगावंसं वाटतं की तू फार गोड खाऊ नकोस, पण मेल्यानंतर या गोष्टींचा काय संदर्भ असंही वाटतं. चालता-चालता निवेदक Kollwitzच्या पुतळ्याजवळ येतो. तिथे त्याचा पुतळ्याशी, म्हणजे Kollwitzशीच संवाद सुरू होतो. Kollwitzचा धाकटा मुलगा पहिल्या महायुद्धात मारला गेलेला असतो. खरं पाहता त्याला युद्धात सामील होण्याची गरज नसते. त्याचा मोठा भाऊ युद्धात भरती होतो. आईच्या चेहऱ्यावरची अपेक्षा आणि गर्व पाहून धाकटा मुलगा हा निर्णय घेतो. तो गेल्याचे अर्थात Kollwitzला अपार दुःख होतं आणि आयुष्यभर ती एक अपराधी भावनेनं ग्रस्त राहते. या भावनांपासून दूर होण्याकरता ती स्वतःला आपल्या कलेत झोकून देते. तरीदेखील अपराधी भावनेची सल जात नाही. Kollwitzstrasseच्या पार्कमधील तिच्या दगडी पुतळ्याचा तुकडा-तुकडा पडत जातो.

ही कथा नक्की कशाविषयी आहे हे Yoko Tawada ठळकपणे निर्देशित करत नाही. बर्लिनमधील एक संध्याकाळ हा कथेचा वेळकाळ. वेगवेगळ्या मुलांशी संभाषण करता-करता चालत निवेदक शेवटी Kollwitzच्या पुतळ्यापाशी पोचतो. मुलांचं मनोविश्व स्वच्छंदतेनं आणि निरागसतेनं भरलेलं आहे. त्याशिवाय त्यांचे प्रौढांशी झालेल्या परस्परसंवादाचे देखील आहे. या अनुभवांच्या श्रृंखलेला Kollwitzशी झालेल्या शेवटच्या संवादानं टोक येतं. निवेदकाला शेवटी भेटलेलं मुलाचं भूत ही Kollwitzच्या अपराधी भावनेची प्रतिमा होऊन येतं. तिचा पुतळा दगड दगड तुटत जाणं हे तिच्या आंतरिक क्लेशाचं बाह्यरूप आहे.

शहरातील भटकंतीत येणारी वेगवेगळी पात्रं आणि अनुभव याची वीण या कथेला आकार देते. त्या श्रृंखलेला स्वप्नांना असते तशी तर्कशून्यता आहे. एकेठिकाणी निवेदक म्हणतो की हे दृश्य मी कृष्णधवल रंगात पाहतोय. मी हे खरोखर जगतोय की माझं आयुष्य सिनेमाच्या पडद्यावर घडतंय?

कथेचा अंत शोकात्मिकेचा सूर लावतो, तरी बरीचशी कथा कुठल्याही विशिष्ट मूडमधली नाही. आपल्या जगण्यातले अनुभवही काहीसे तसेच असतात. कधी स्वप्नरंजनात्मक तर कधी सत्यस्थितीशी जोडलेले. अशा मिश्र, विविधस्तरीय जगण्याशीच ही कथा नातं जोडते.

Majakowslairing ही संग्रहातील दुसरी कथा. ही कथा सत्यजगतापासून अधिक दूरची आहे. Majakowksi या रशियन कवीचं नाव असलेला Ring Road शहराला विळखा घालून बसलेला. इथे निवेदक एका कॅफेत आपल्या मैत्रिणीची वाट पाहत बसलेला असतो. अशावेळी त्याच्या मनात वेगवेगळे विचार घोळू लागतात. मैत्रिणीचा वाट पाहता-पाहता त्याला वाटतं की कोण जाणे १५-२० वर्षांपूर्वी माझी भेट दुसऱ्या मुलीशी झाली असती तर ती कदाचित माझ्यासोबत कॅफेमध्ये आता बसली असती. शहरात हिंडता-फिरताना अनेक लोक आपल्या सान्निध्यात येत असतात. त्यामुळे वेगळ्या अनुभवांच्या अनेक शक्यता निर्माण होतात. असं अनेकपदरी जगणं शहरात शक्य आहे.

कॅफेत निवेदक बसलेला असतो त्यामागे Majakowksiची तस्वीर टांगलेली असते. निवेदकाचं विचारांचं चक्र चालू असताना खुद्द Majakowksiच समोर ठाकतो. ही या कथेतील फॅण्टसीची सुरुवात असंही म्हणता येणार नाही. कारण कॅफेमध्ये पाय ठेवण्याआधीच निवेदकाला शंका वाटत असते की आपण वर्तमानकाळात आहोत की १५-२० वर्षांपूर्वीच्या भूतकाळात.

Tawadaची ही कथादेखील, आधीच्या कथे-सारखीच, भटकंतीची आहे, स्वप्नरंजनाची आहे आणि वास्तव-काल्पनिक जग यांच्याशी खेळ करत राहते. शहरातून वावरताना निवेदकाला स्वच्छंद आणि मुक्त वाटतं. शहरातील रस्ते, इमारती अनुभवताना तो प्रेक्षकाची भूमिका वठवतो आणि कुठल्याही व्यवहाराशी स्वतःला जोडून घेत नाही. वाटेत तिथे थांबावं, वाटेल त्या रस्त्यानं चालत राहावं.

आधी म्हटल्याप्रमाणे Majakowksi अवतीर्ण होऊन निवेदकाच्या मैत्रिणीची विचारपूस करतो. थोड्या वेळानं संभाषण Majakowksiची मैत्रीण Lilyaकडे वळतं. तीदेखील Majakowksiला सोडून Osip Mandelstam बरोबर सहवास करत असते. (Osip Mandelstam हा मोठा कवी होऊन गेला.) Majakowksi Lilya साठी फुलांचा गुच्छ घेऊन जातो, पण ती दिलेल्या फुलांना फेकून देते आणि













Majakowksiशी अपमानास्पद वागते. असं मनोगत सांगून झाल्यावर Majakowksi कोट व स्कार्फ घालून कॅफेबाहेर पडतो. निवेदकाला अचंबा वाटतो की हा उन्हाळी हवेत गरम कपडे का घालतोय. तो कॅफेतून बाहेर येतो पण तोपर्यंत Majakowksi दूर पोचलेला असतो. निवेदक वळून पाहतो तर Majakowksiचं चित्र, कॅफेतला वेटर आणि कॅफेदेखील नाहीसे होतात. आपण जे पाहिलं, ज्याच्याशी संभाषण केलं त्यातलं कितपत खरं, कितपत खोटं हा प्रश्न त्याला पडतो. तो पुढे चालत जातो आणि दुसरा कॅफे लागतो जिथे Lilya व Osip बसलेले असतात. ते निवेदकाशी संभाषण करतात. निवेदकही यात सामील होतो; ती दोघं त्याला Majakowksi समजून त्याच्याशी वागू लागतात. Lilya तर त्याच्याशी जवळीक साधू पाहते. निवेदक मन मोकळं करून Majakowksiच्या मनातलं सत्य बोलून दाखवतो. Lilya ला सांगतो की तुझ्याबरोबर असतानाच माझ्याकडून चांगली कविता लिहून होते. परंतु नंतर संभाषणाचा नूर बदलतो. Lilya व Osip अपमानास्पद वागतात आणि Majakowksi झालेला निवेदन कॅफेतून बाहेर पडतो; Ring पलीकडे जातो. तिथे पोचल्यावर त्याला झोपेतून जागा झाल्याचा अनुभव येतो. तो असपास पाहतो तर तो जंगलाच्या कडेला असतो जिथून Ring Road आणि त्यात वसलेलं शहर दिसतं. पण त्याची शहराविषयीची तीव्र ओढ निवळते. जंगलाच्या कडेला एक मुक्ततेची जाणीव होते.

Majakowslairing ही कथा अनेक विषयांना हात घालते आणि अनेक भावनिक छटा व्यक्त करते. वास्तव आणि काल्पनिक जगांमध्ये विहार करते. Yoko Tawadeच्या संग्रहातील सर्वच कथांना रस्त्यांची नावं आहेत. या कथेत निवेदकाच्या मनातील विचारप्रवाहांचा आलेख आहे. निवेदक सबंध वेळ मैत्रिणीची वाट पाहत असतो पण शेवटी तो एक फलक रस्त्यावर लावतो. 'मी अनेक तास तुझी वाट पाहत बसलो, पण आता पुरे. मी घरी परत येणार नाही. गुडबाय!' निवेदकाच्या मनात मैत्रिणीनं भेट द्यावी ही इच्छा आणि न येण्यानं आलेली निराशा या भावना मनात घर करून राहिलेल्या असतात. परंतु कथेदरम्यान Majakowksi-Lilya-Osipशी झालेल्या भेटीनंतर तो शहर, मैत्रीण यांपासून मनानं दूर जातो, असा त्याचा प्रवास. शहरातील वास्तविक जग आणि निवेदकाचं मनोविश्व या प्रदेशात ही कथा विहार करते. खऱ्या व काल्पनिक विश्वाची सरमिसळ हा या कथेचा आकृतिबंध आहे.

Pushkinallee या तिसऱ्या कथेत आधीच्या दोन कथांमध्ये हाताळलेले विषय आहेत : युद्धाचे पडसाद,












काल्पनिक प्रसंग, मैत्रिणीची वाट पाहणं, त्याविषयीची निराशेची भूमिका. सगळी कथा एका पार्कमध्ये घडते. Soviet Red Army वर आधारित असलेलं पार्क. या कथेतदेखील निवेदक कुठे आहे या विषयीची संदिग्धता आहे. कधी बर्लिन तर कधी रशियातल्या शहराचा भास होतो.

Yoko Tawadeच्या इथे विचारात घेतलेल्या कथा शहर आणि तेथील भ्रमंतीविषयीच्या आहेत. निवेदकाच्या भटकंतीत, स्वतःच्या विचारांमध्ये गुंग असताना हे कलाकार, लेखक प्रकट होतात आणि त्या अनुभवाला एक वेगळा रंग आणि परिमाण देतात.

New Directions मालिकेतलं दुसरं पुस्तक हे Laszlo Krasznahorkaiचं Spadework for a Palace. हिला आपण दीर्घकथा किंवा लघुकादंबरी म्हणू शकतो. यातदेखील शहरातील भ्रमण आहे, मात्र मुख्यतः एक लेखकाचा- हरमन मेलविनचा शोध आहे. या कथेचा निवेदक आहे एक ग्रंथपाल. एके दिवशी त्याची पत्नी त्याला New Yorkच्या Museum of Modern Artमधील एका प्रदर्शनाला घेऊन जाते; ते असतं Lebbens Woods नावाच्या वास्तुविशारदाच्या कलाकृतींचं. वेगवेगळ्या काल्पनिक इमारतींची चित्रं असलेल्या या प्रदर्शनातील बहुतेक वास्तूंचे आकार असे असतात की ते प्रत्यक्षात साकारणं अशक्य. या प्रदर्शनाला दिलेल्या भेटीतून निवेदकाच्या मनात विचारांचे अनेक तरंग उठतात. Manhattonच्या वास्तूं-विषयीचे, अमेरिकेतील विविध ठिकाणांच्यामधल्या संस्कृतीतले फरक, इत्यादी. आपल्याला निवेदकाविषयी थोडं अधिक कळू लागतं. हा ग्रंथपाल आहे; परंतु याचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्याचं म्हणणं आहे की जे खरे हाडाचे ग्रंथपाल असतात ते आलेल्या लोकांना पुस्तकं वाटण्याचं काम करण्यात आनंद मानत नाहीत. त्यांच्या जगात ग्रंथालय हे जगातील ज्ञानाचं भांडार आहे आणि आपण भांडाराचे रखवालदार आहोत ही धारणा असते. त्यांच्या म्हणण्यानुसार चालत असतं तर येण्याजाणाऱ्याला ते आपल्या ग्रंथालयातलं एक पुस्तकदेखील देणार नाहीत. आपल्याला कळतं की निवेदकाचं नाव आहे Herman Melville. हे नाव 'Moby Dick' कादंबरीच्या प्रसिद्ध लेखकाचंच आहे. सुरुवातीला निवेदकाला या नावाचं विशेष अप्रूप नसतं. हळूहळू तो लेखक Melvilleच्या विषयी अधिकाधिक जाणण्याचा प्रयत्न करतो. त्याने Melvilleच्या Moby Dick आणि Redburn या कादंबऱ्या शाळेत वाचलेल्या असतात. आता तो Melvilleच्या तीन मुख्य चरित्रकारांकडे वळतो आणि त्यांच्या पुस्तकांचा फडशा पाडतो. या तीन चरित्रांच्या वाचनात (३००० पृष्ठसंख्या जवळपास) त्याला Melvilleच्या आयुष्याबाबतील्या अनेक गोष्टी कळतात- त्याची मुलं, पत्नी, सोबतचे लेखक इत्यादी. तरीदेखील त्याला वाटतं की या गाढ अभ्यास केलेल्या चरित्रकारांना Melville सापडला नाहीये. म्हणून त्याच्या शोधार्थ तो Manhattanमध्ये राहिलेल्या Melvilleच्या पदखुणांवरून स्वतःच चालून पाहतो. जिथे त्याचं वास्तव्य होतं तिथपासून त्याच्या Customs House मधील कचेरी-पर्यंत. त्याला वाटतं की अशा प्रकारे तो खऱ्या Melvilleच्या जवळ पोचेल. असं करत असता, एकदा आपला निवेदक वाट चुकतो आणि त्याला कळतं की तो Malcolm Lowry नं घेतलेल्या वाटेवरून चालतोय. Malcolm हादेखील मोठा लेखक. त्याच्या Under the Volcano कादंबरीकरता प्रसिद्ध. तर या Lowryच्या Lunar Caustic मध्ये या वाटेचं वर्णन दिलं आहे. Lowryच्या विषयी हे सांगणं आवश्यक आहे की भरपूर दारू प्यायचा त्यामुळे तो घर, कामाची जागा आणि बार या परिघात फिरायचा.

Krasnahorkaiचं पुस्तक एका वाक्यात लिहिलेलं आहे आणि त्यानं एक प्रवाहीपणा त्या निवेदनाला आला आहे. निवेदक ग्रंथालय, पुस्तकं, लेखक, शहर या दुनियेत जगत असतो. तो जग आपल्या परीनं पाहतो; इतरांना तो दृष्टिकोन विक्षिप्त वाटेल. एका गोष्टीचा ध्यास घेऊन जगण्यामुळे तो प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून तुटत जातो. Spadework for a Palace हे अनेक विचारांनी, विषयांच्या चर्चेनं व्याप्त पुस्तक आहे. वाचकही निवेदकाच्या आवडी-निवडींमध्ये गुंततो आणि त्याबरोबर प्रवास करू लागतो. साधारणपणे कथेला असलेला कथनात्मक आकार या कथेला नसला तरी वाचक त्या विचारांच्या श्रृंखलेत खेचला जातो. एका विक्षिप्त ग्रंथपालाच्या प्रवासात त्याला मोहित करणाऱ्या आणि महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींवर भाष्य करून जातो.

New Directions च्या मालिकेतील 'नव्या दिशां'चा शोध घेणाऱ्या या दोन पुष्पांकडे आणि त्यांच्या वेगळेपणाचा या लेखात आपण विचार केला. या दोन पुस्तकांमध्ये निवेदकाचं मनोविश्व, पुस्तकं-शहरं यांवरचं प्रेम, आणि साहित्य-समाजावरचं भाष्य त्यांच्या आगळ्या कथनशैलीतून प्रकट होतं. या मालिकेतील इतर पुस्तकं आपापल्यापरीनं नवीन आकारातून कथेतून जे मांडणं शक्य आहे त्याच्या मर्यादांपलीकडे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यांचं विश्लेषण पुन्हा कधीतरी.

**– नंदन जोशी**
nandanpjoshi@gmail.com

सिॲटल

# हॉलीवूड डायरी

जयंत नाईकनवरे



**म**हाराष्ट्र पोलिससदलात सुमारे बत्तीस वर्षे सेवा बजावून मी ३१ डिसेंबर, २०२३ रोजी पोलिस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र या पदावरून सेवानिवृत्त झालो. ही कारकिर्द संपत आल्यानं गुलजारसाहेबांच्या गाण्यानुसार 'फुरसत के रात दिन' आल्यावर त्यांचं नक्की काय करायचं याबाबत विचारमंथन चालू झालं. पोलिसदलातील अंगवळणी पडलेल्या शासकीय निवासस्थान, वाहन, कार्यालय, चालक, मदतनीस अशा सोयीसुविधा वजा करता शिल्लक उरणार होतं ते स्वावलंबन. आपला समाजामध्ये प्रासंगिक संबंध काय राहणार हा प्रश्न सोडवायचा होता. ढोबळ मानानं हे निश्चित केलं की सेवानिवृत्तीनंतर व्याख्यानं वगळता सल्लागार सेवा किंवा पुन्हा इतरत्र नोकरी करायची नाही. म्हणून ठरवलं, आपल्याला रस आहे त्या पटकथालेखनाबद्दल मूलभूत माहिती देणारा अमेरिकेतला वर्षभराचा कोर्स करावा. तिथे जाऊन राहण्याइतपत जवळचं कुणी नसल्यानं, जायचं तर स्वत: सगळा खर्च करून जावं लागणार होतं. माझी पत्नी रीना हिनं सोबत यायला आनंदानं होकार दिला.

'आनंदयात्री - पोलीस अधिकाऱ्याची डायरी' हे सत्यघटनांवर (नॉन-फिक्शन) आधारित पुस्तक लिहिण्याचा अनुभव गाठीशी होता. परंतु काल्पनिक कथांवर (फिक्शन) आधारित लेखन कधी केलं नव्हतं. त्यामुळे काल्पनिक कथानकं लिहिण्यासाठी न्यू यॉर्क फिल्म ॲकॅडेमीचा (नायफा) पटकथालेखनाचा कोर्स योग्य राहील असं वाटलं. न्यू यॉर्क फिल्म ॲकॅडेमीचे न्यू यॉर्क, लॉस एंजल्स, मायामी हे अमेरिकेत तसेच इटली आणि ऑस्ट्रेलिया हे अमेरिकेबाहेर कॅम्पस आहेत. न्यू यॉर्क शहराचा हिवाळा फार कडक असतो त्यामुळं कॅलिफोर्निया राज्यातील लॉस एंजल्स कॅम्पसच्या पटकथा-लेखन (स्क्रीन रायटिंग) या सर्टिफिकेट कोर्सची ॲडमिशन फॉर्म फी भरली. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याचा पुरावा, बारावीची मार्कशिट, डिप्लोमा, पासपोर्ट, बँक स्टेटमेंट इत्यादी पाठवून दिल्यावर न्यू यॉर्क फिल्म ॲकॅडमीनं दोन प्रकारच्या शिष्यवृत्त्या दिल्या. पहिली गुणवत्तेवर (टॅलंट बेस्ड) आधारित ७००० डॉलरची व दुसरी आर्थिक (नीड बेस्ड) निकषांवर आधारित ५००० डॉलरची होती. म्हणजे वर्षभराच्या फीमधून १२,००० डॉलर वजा झाले. अनामत रक्कम भरल्यानंतर नायफानं आय-२० दाखले पाठवले. त्या आधारे माझा एफ-१ व रीनाचा एफ-२ व्हिसा काढला. अमेरिकेत वर्षभर राहायचं ठरल्यानं व कॅनडात रीनाचे नातेवाईक असल्यानं त्यांना भेटायला जाणं शक्य व्हावं म्हणून आम्हा दोघांचा कॅनडाचा टूरिस्ट व्हिसा घेतला. लॉस एंजल्सनजीक उत्तर हॉलीवूड स्थित बरबँक नावाच्या शहरात सिक्युरिटी

डिपॉझिट भरून ४२२१ क्लिंग स्ट्रीट, बरबँक या ठिकाणी फर्निश केलेलं स्टुडिओ अपार्टमेंट बुक केलं.

३१ डिसेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्तीचा निरोपसमारंभ छान झाला. कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याची आपली सेवा समाप्त होताना परंपरागत पद्धतीनं परेडवरून निवृत्त होण्याचा मान मिळावा अशी मनोमनी इच्छा असते. मलाही बरं वाटलं. त्या रात्री शेगावला मुक्काम करून नवीन वर्ष २०२४च्या पहिल्या दिवशी मुंबईत दाखल झालो.

४ जानेवारी २०२४ रोजी सर्वांचा निरोप घेऊन विमानतळावर पोचलो. फ्लाईट दोन तास उशिरा सुटल्यामुळे सिंगापूरहून मिळणारी कनेक्टिंग फ्लाईट चुकली. सिंगापूरला उतरल्यावर एअरलाइनच्या खर्चानं हॉटेल नोवोटेलमध्ये राहण्याची सोय झाली. ५ तारखेला हॉप-ऑन-हॉप-ऑफ बिग बसमधून सिंगापूर फिरलो. त्या संध्याकाळी सिंगापूर ते लॉस एंजल्स फ्लाईट वेळेवर सुटली. माझे लॉस एंजल्स स्थित स्नेही पंकजभाईंचा मुलगा निशिथनं टिग्रान हकोबियान हा ड्रायव्हर पाठवला होता. सामानासह राहण्याचं बदललेलं ठिकाण ४४०० सारा स्ट्रीट युनिट १५ वर पोहोचलो. विशिष्ट ठिकाणी नंबर लॉक असलेल्या पारदर्शक होल्डरमध्ये ठेवलेली चावी शोधून घर ताब्यात घेतलं. हीटरचा शोध दुसऱ्या दिवशी लागल्यानं शुक्रवारची रात्र कुडकुडत काढली. अमेरिकेत ब्रिटिश मापनपद्धत वापरली जाते त्यामुळे हीटरवर फॅरनहिट लिहिलं होतं त्याचं सेल्सियसमध्ये रूपांतर करून मग स्विच कुठे सेट करायचा ते ठरवावं लागलं. कॅपी रेसिडन्स या कंपनीच्या सारा स्ट्रीटवरील हे स्टुडिओ अपार्टमेंट होतं. आठ महिन्यांचा करार होता. गावाहून शिकायला मुंबईत आलो तेव्हा म्हाडाच्या वनरूम किचनमध्ये राहात होतो. आता आयुष्य वर्तुळात फिरून पुन्हा वनरूम किचनमध्ये घेऊन आलं होतं. कचरा कुठे टाकायचा, पोस्टाच्या पेटीची चावी, ॲमॅझॉनचा डेपो कुठे आहे, वॉशिंग मशिन कोणत्या ठिकाणी आहे व ते कसं वापरायचं याची माहिती मिळाली. टीव्हीवर मॅक्स, पॅरामाऊंट, हुलू, नेटफ्लिक्स, ॲमॅझॉन प्राइम, ॲपल टीव्ही या चॅनलची वर्गणी भरली.

न्यू यॉर्क फिल्म ॲकॅडमी लॉस एंजल्स कॅम्पस बरबँक शहरात रिव्हर ड्राइव्ह रस्त्यावर वॉर्नर ब्रदर्स स्टुडिओच्या समोर आहे. व्हर्डूगो डोंगररांगांच्या पायथ्याशी लॉस एंजल्स नदीच्या काठी वॉर्नर ब्रदर्स हा फाइव्ह स्टार स्टुडिओ आहे. त्याच्यामागे तितकाच भारी युनिव्हर्सल स्टुडिओ आहे. युनिव्हर्सल स्टुडिओच्या समोर न्यू यॉर्क फिल्म ॲकॅडमीची बरहॅम या नावानं ओळखली जाणारी दुसरी इमारत आहे.

८ जानेवारी २०२४ हा ओरिएंटेशनचा दिवस होता. दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत पटकथालेखन विभागाचे प्रमुख नुन्झीओ डी फिलिपीस व त्यांच्या साहाय्यक जेन्नी स्टर्नर यांनी विभागाबद्दल आणि कोर्सबद्दल माहिती सांगितली. आम्ही एकून चार विद्यार्थी हजर होतो. मला वगळता माझी मुलगी जाईच्या वयाच्या तीन मुली होत्या. एक मुलगा कौटुंबिक कारणांमुळे उशिरा येणार होता. अन्य एक मुलगी काही विषयांसाठी आमच्या वर्गात असणार होती. सोबत नेलेल्या मॅकबुक एअर या लॅपटॉपवर नायफाकडून देण्यात आलेलं 'फायनल ड्राफ्ट' हे सॉफ्टवेअर लोड करून घेतलं. सगळं पटकथालेखन हे 'फायनल ड्राफ्ट'वर करायचं होतं.

वर्गात मी आणि दोन भारतीय, तीन अमेरिकन व एक ब्राझीलचा असे सहा जण होतो. पटकथालेखनाच्या पहिल्या सत्रात लेखनाची तत्त्वं (इस्रायल गुटीरेझ), दूरदर्शनच्या मालिकांसाठी लिखाण करणं (रेचल कॉलमन), पटकथालेखनाची कार्यशाळा (एरिक नेल्सन), हेतुपुरस्सर गोष्टींचं कथन (कोलेट फ्रीडमन), कथेची निर्मिती (जॉन श्वेड), चित्रपटसृष्टीची ओळख (रॉबर्ट पुची) या विषयांवर शिकवण्यात आलं.

सगळी अमेरिकन विद्यापीठं आणि फिल्म स्कूल अतिशय व्यावसायिक पद्धतीनं प्रशिक्षण देतात. नायफा याला अपवाद नव्हती. सगळं काही पेपरलेस होतं. गुगल क्लास-रूमच्या माध्यमातून आणि ई-मेलवरून प्रशासकीय माहिती दिली जायची. गुगल क्लासरूमवर कोणतं लेक्चर कोणत्या क्लास-रूममध्ये होईल ते समजायचं. प्रत्येक प्रशिक्षक आपापल्या विषयाचा अभ्यासक्रम, गुण देण्याची पद्धत आणि इतर माहिती गुगल क्लासरूमवर टाकायचे.

पटकथालेखनाची तत्त्वं - हॉलीवूडमध्ये पटकथा-लेखनाचं एक फॉरमॅट किंवा टेम्प्लेट विकसित झालेलं आहे. फॉन्ट कोणता व किती साइझचा इथपासून सुरू होऊन ॲक्शन लाइन, संवाद, घटना; वेळ; ठिकाण कसं लिहावं याचे नियम आहेत. 'फायनल ड्राफ्ट' हे सॉफ्टवेअर वापरून लिखाण करताना हॉलीवूडला अपेक्षित फॉररमॅट सुलभ रितीनं ठेवता येतं. तशी इतर सॉफ्टवेअरही आहेत, परंतु 'फायनल ड्राफ्ट' हे सर्वमान्य झालं आहे. पानाच्या संख्येनुसार किती मिनिटांचा चित्रपट होईल याचा स्टुडिओच्या लोकांना अंदाज येतो. हे इतकं पक्कं झालं आहे की एखादी पटकथा या पॅटर्नमध्ये नसेल तर ती मुळात वाचलीच न जाण्याच्या धोका असतो.

लेखन ही कला आहे इथून सुरुवात करून सहा मोड्युलमध्ये नाट्यकलेची मूलभूत तत्त्वं, कथेला तीन अंकांमध्ये विभाजित करताना कोणत्या पद्धती वापरल्या जातात, पात्रांची रचना, सीन आणि सिक्वेन्सलेखन, कथेचं

विश्व तयार कसं करायचं, कथेची थीम आणि कथेचे प्रकार असा सर्वंकष विचार करायला लावणारा हा अभ्यासक्रम होता. व्याख्यानं, अवांतर वाचन, चर्चा, गाजलेले चित्रपट बघून त्यावर चर्चा या पद्धतीनं ३४ सेशनमध्ये हा विषय शिकवला गेला.

दूरदर्शनच्या मालिकांसाठीचं लिखाण आणि फीचर फिल्मसाठीचं लिखाण हे दुसरे आणि तिसरे विषय होते. या वर्गांमध्ये थिअरी बेताचीच असायची. मुख्य भर वर्कशॉपवर असायचा. म्हणजे विद्यार्थ्यांनी एखादी कथा रचायची आणि दर तासाला तिची पाच-सहा पानं लिहून आणायची. लेक्चरचं स्वरूप चर्चात्मक (इंटरॲक्टिव्ह) आणि कार्यशाळा (वर्कशॉप) पद्धतीचं असायचं. त्यामुळे लेक्चर संपलं की होमवर्क दिलं जायचं आणि ते विहित वेळेत पूर्ण करून गुगल क्लास-रूमवर अपलोड करावं लागायचं. दुसऱ्या लेक्चरला प्रत्येक विद्यार्थ्यानं सादर केलेलं लिखाण सर्वांनी मिळून वाचलं जायचं. त्यावर प्रत्येकाचं काय मत आहे ते सांगावं लागायचं. याला नोट्स देणं म्हणतात. शेवटी लेक्चरर लिखाणाची समीक्षा करून आणखी नोट्स द्यायचे. अपेक्षा ही असायची की दिलेल्या नोट्सच्या आधारे लिखाणामध्ये योग्य तो फेरफार करावा. नोट्स या नेहमी मार्गदर्शक असायच्या, परंतु काही नोट्सनुसार बदल का केले नाहीत हे सकारण सांगावं लागायचं.

जानेवारी ते एप्रिल २०२४ या पहिल्या सत्रात सर्वांनी प्रत्येकी तीन पटकथा लिहिल्या. २१ ते २८ एप्रिल २०२४ या मिड टर्म ब्रेकपूर्वी परीक्षणासाठी अपलोड केल्या. दूरदर्शनसाठी मी विल ट्रेन्ट या इंग्रजी मालिकेवर आधारित एपिसोड लिहिले होते. विल ट्रेन्ट हा अमेरिकेतील अटलांटा शहर पोलिसांमधील स्पेशल एजंट असतो. तो उत्कृष्ट तपासअधिकारी असतो. ज्या गोष्टी इतरांना दिसत नाहीत त्या तो केवळ घटनास्थळाची पाहणी करून पटकन सांगू शकतो. ही अमेरिकेतली प्रसिद्ध मालिका होती. त्या मालिकेची थीम, पात्रं आणि सगळं काही आहे तसं ठेवून पुढचा एपिसोड लिहायचा होता. तो थोडा थोडा लिहीत, सगळ्यांच्या सूचना लक्षात घेऊन, त्यात सुधारणा करत पूर्ण लिहून अपलोड केला. फीचर फिल्ममध्ये मी कफल्लक ते अतिश्रीमंत या प्रकारची इंडोनेशिया व अमेरिका या दोन देशांमध्ये घडणारी कथा लिहिली होती. त्या कथेची निर्मितीसुद्धा कार्यशाळा पद्धतीनंच केली.

मिड टर्म ब्रेक दरम्यान कॅनडाला रीनाच्या आईला भेटायला, तिचा भाऊ मनीषच्या कुटुंबासोबत त्यांच्या टोरोंटोजवळच्या मिसिसागा शहरात राहायला गेलो. टोरोंटो शहर, नायगारा धबधबा पुन्हा पाहायला मजा आली. २००७ मध्ये नायगारा धबधबा पाहायला गेलो होतो तेव्हा नोव्हेंबर महिना होता. हिवाळा असल्यामुळं वातावरण ढगाळ होतं. तशात थंडी असल्यामुळं फक्त आवाजच ऐकू आले होते. अधूनमधून एखादी झलक दिसायची. यावेळी मात्र निरभ्र आकाश आणि सूर्यप्रकाश असल्यामुळं नायगारा अतिशय चांगल्या प्रकारे पाहता आला. मागच्या वेळी बंद असल्यानं हुकलेली 'मेड ऑफ द मिस्ट' ही धबधबे कोसळतात तिथे घेऊन जाणारी बोटीची सफर करायला आणि धबधब्याच्या मागील बोगद्यांमध्ये जायला मिळालं. बुधवारी रीनाच्या मावशीकडे, तिच्या दोन-अडीच तासांवर असलेल्या लंडन (कॅनडातलं) या शहरातल्या, घरी गेलो. २८ एप्रिलला टोरोंटो-मिनीयापोलिसमार्गे बरबँकला परत आलो.

कोर्सच्या दुसऱ्या सत्रात स्क्रिप्ट टू स्क्रीन या विषयामध्ये आठ-दहा मिनिटांची पटकथा लिहून चित्रित करायची होती. शूटींगसाठी फिल्म स्कूलमधूनच अभिनेते, अभिनेत्री आणि तांत्रिक टीम घेतली होती. पटकथालेखन आणि दिग्दर्शन मी केलं. चित्रीकरणाचं ठिकाण होतं नॉर्थ हिल्स भागातलं एक घर. तांत्रिक चमू, कलाकार आणि विविध परवाने, थोडीफार गडबड वगळता सगळं काही व्यवस्थित पार पडलं. ५ ऑगस्टला बरहॅम इमारतीतील छोट्या प्रेक्षागृहात सर्वांच्या चित्रफिती बघण्यात आल्या आणि सुस्कारा सोडला. १० ऑगस्टला स्टेज रीडिंसाठी सगळे रिव्हरसाइड इमारतीतल्या प्रेक्षागृहात आले होते. चित्रीकरण केलेल्या पटकथेचं कलाकारांनी वाचन केलं आणि कोर्सची सांगता झाली.

मी २०००-२००१ या काळात संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रतिनियुक्तीवर बोस्निया-हर्जेगोविना या देशात वर्षभर होतो. तसं पाहिलं तर अमेरिकन प्रशासकीय पद्धतीनुसार संयुक्त राष्ट्रसंघाचा कार्यभार चालत असल्यानं अमेरिकेच्या प्रेमात पडलो. सहकुटुंब अमेरिकेची पहिली वारी २००७ साली केली होती. त्यावेळी पूर्वेकडील फ्लोरिडा राज्यात गेलो होतो. यावेळी मात्र पश्चिमेकडील निसर्गरम्य कॅलिफोर्नियात वर्षभर राहायला मिळालं. पॅसिफिक समुद्रकिनाऱ्याचं सौंदर्य मनाला वेड लावणारं आहे. हे राज्य तिथल्या वर्षभर राहणाऱ्या आल्हाददायक हवामानासाठी प्रसिद्ध आहे. तिथल्या सार्वजनिक संस्थांच्या कामाची पद्धत बोध घेण्याजोगी आहे. प्रति चौरस मैल ९५ व्यक्ती इतकी लोकसंख्येची घनता आहे. आपल्या १२६४ व्यक्ती प्रती चौरस मैल या घनतेच्या तुलनेत हा आकडा अगदी नगण्य आहे. लॉस एंजल्स शहराच्या ८३०४ प्रती चौरस किलोमीटरच्या तुलनेत मुंबईची

८३,६६० प्रती चौरस किलोमीटर ही तफावत तर ठळकपणे जाणवली.

वर्षभरात अमेरिकेतल्या बऱ्याच गोष्टींमुळे प्रभावित झालो. त्यापैकी मनावर सगळ्यात जास्त छाप पडली ती महामार्गांच्या जाळ्याची. अमेरिकेत संघ राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ अन्वये अनुक्रमांक असलेले राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यात आले. जुने महामार्ग यात सामाविष्ट करण्यात आले. परंतु कायदा पारित झाल्यापासून दोन दशकांत नवीन महामार्गांसाठी सुमारे दहा लाख लोकांचं स्थलांतर करावं लागलं. 'नागरी वस्त्यांचं नूतनीकरण' या प्रकल्पामध्ये ही स्थलांतरं झाली. १९९२मध्ये आंतरराज्य महामार्गांची बांधणी पूर्ण झाल्याचं जाहीर करण्यात आलं. या प्रकल्पाअंतर्गत सुमारे ७९००० किलोमीटर लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात आले. केंद्र सरकारनं खर्च केला तरी मालकी संबंधित राज्याची राहते. या महामार्गांचं वर्गीकरण प्रमुख (मेन), उप (ऑग्झीलरी), पूरक/पुरवणी (सफिक्स्ड), व्यापारी (बिझनेस) व भविष्यातील (फ्युचर) असं केलं जातं. केंद्र सरकारनं आखून दिलेली मानकं : जसे नियंत्रित प्रवेश, भौतिक अडथळे (फिजिकल बॅरिअर) किंवा मध्यरेषा (मिडियन स्ट्रिप), बिघाड झालेली वाहनं लावण्यासाठी मार्गिका (ब्रेकडाऊन लेन) सिग्नल यंत्रणा नसणं, ही मानकं महामार्गाच्या बांधकामासाठी पाळली गेली.

महामार्गांना अनुक्रमांक देण्याची पद्धत अशी आहे की प्रमुख आंतरराज्य महामार्गांना एक किंवा दोन आकडी क्रमांक दिले आहेत. कमी लांबीचे व मुख्य मार्गांपासून वेगळे होणारे रस्ते तीन अंकी आहेत. या तीन अंकांपैकी शेवटचे दोन अंक ज्या महामार्गापासून वेगळे झाले त्याचे अनुक्रमांक असतात. आंतरराज्य महामार्गांसाठीचा निधी 'महामार्ग विश्वस्त निधी'च्या माध्यमातून उभा केला जातो. त्यासाठी इंधनकर आणि केंद्रीय राजकोषातून पैसे गोळा केले जातात. विषम क्रमांकांचे महामार्ग उत्तर-दक्षिण जातात तर सम क्रमांकांचे पूर्व-पश्चिम. उत्तर-दक्षिण महामार्गांमध्ये पश्चिमेकडून विषम महामार्ग चढत्या क्रमानं पूर्वेकडे सरकतात. याउलट पूर्व-पश्चिम जाणारे महामार्ग दक्षिणेकडून उत्तरेकडे चढत्या क्रमानं जातात.

प्रमुख महामार्गांचा शेवटचा अंक शून्य किंवा पाच असतो. हे महामार्ग पॅसिफिक ते अटलांटिक किंवा सरहद्द ते सरहद्द (कॅनडा ते मेक्सिको) जातात. मुख्य महामार्गांपासून वेगळे होणारे मार्ग दोन प्रकारचे असतात. पहिले, स्पर रूट म्हणजे वेगळे झाल्यानंतर परत मुख्य महामार्गाला जोडले जात नाहीत- वस्ती किंवा शहरांमध्ये विलीन होतात. या मार्गांना तीन अंक असतात. पैकी पहिला अंक विषम व इतर दोन अंक प्रमुख महामार्गाचे असतात. दुसऱ्या प्रकारचे उपमार्ग बायपास किंवा रेडियल असतात. यांचे पहिले अंक सम क्रमांकाचे व दुसरे दोन अंक ज्या महामार्गापासून वेगळे झाले त्यांचे असतात. एक टोक आंतरराज्य महामार्गाला व दुसरे शहरी वस्तीला जोडलेले असते.

दरम्यान माझा मुलगा यश भेट द्यायला आला तेव्हा त्याच्यासोबत लास वेगास, सॅनफ्रॅन्सिस्को व सॅन-डिएगो फिरून आलो. बेवर्ली-हिल्स या हॉलीवूडमधल्या अतिश्रीमंत भागात आम्ही फिरत असताना यशनं आभाळात प्रचंड धूर झालेला पाहिला. ती पॅलिसडेस या ठिकाणी लागलेली मोठी आग होती. त्यानंतर ठिकठिकाणी वणवे लागून हाहाकार उडाला. निसर्गाचं रौद्र रूप जवळून पाहायला मिळालं. या वणव्यांमध्ये भूतो न भविष्यती असं लॉस एंजल्सच्या आणि आसपासच्या भागाचं नुकसान झालं. कित्येक उपनगरं जळून खाक झाली. त्यात हॉलीवूडच्या तारेतारकांच्या आणि श्रीमंत लोकांच्या कोट्यवधींच्या बंगल्यांची राखरांगोळी झाली. हे आगीचं तांडव प्रत्यक्ष पाहायला आणि असुरक्षितता काय असते हे जवळून अनुभवायला मिळालं. निसर्गाच्या प्रकोपापुढे अमेरिकेसारखा बलाढ्य देश हतबल झालेला पाहिला.

आम्ही सुमारे सव्वा वर्ष बरबँक या एकाच शहरात राहिलो. एकदा लेबनॉन हा मूळ देश असलेल्या वाहे नावाच्या चर्मकाराच्या दुकानात बुटांना पॉलिश करवून घ्यायला गेलो असता तिथे एक गोरा ख्रिश्चन पाद्री त्याच्या पत्नीचे सँडल घेऊन आला. माझ्याकडे थोडावेळ त्यानं बघितलं आणि एकदम मराठीत एक वाक्य बोलला. माझा विश्वासच बसला नाही म्हणून मी लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहिलं तर तो म्हणाला, 'तुम्ही मराठी आहात ना?' मी चाटच पडलो. त्याचे वडील खानदेशामध्ये या चर्चमधून त्या चर्चमध्ये असे नेमणूक बदलल्यानं फिरत असत. हा इसम त्यांच्यासोबत असल्यानं त्याला मराठी चांगलं येत होतं. त्याचं नाव होतं मेव्हीन वारमन. तो बरबँकजवळ पॅसॅदिना नावाच्या शहरात राहात होता.

एकदा माझा मित्र संजय निर्मल मुंबई महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून सॅन डिएगोला चालला होता. परतीचा प्रवास लॉस एंजल्समार्गे असल्यानं बरबँकमध्ये एक रात्र मुक्कामाला होता. रिव्हर साईड ड्राइव्हवरील एका हॉटेलच्या रिसेप्शनला चेकइनची प्रक्रिया सुरू असताना आम्ही मराठीत गप्पा मारत होतो. रिसेप्शनवरचा माणूस मान हलवून आमच्या मराठीला दाद देत होता. एकदम म्हणाला, 'बरोबर आहे'! संजय आणि मी एकदम चपापलो. तो माणूस साऊथ

आफ्रिकेत स्थायिक झालेल्या भारतीय कुटुंबातला होता. दोन वर्षं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकला होता. नाव होतं कमल.

बरबँक डाऊनटाऊन हे गोऱ्या अमेरिकनांची वस्ती असलेलं शहर होतं. आम्ही राहात होतो त्या इमारतीसमोर सुमारे पन्नास एकर क्षेत्रफळाचा रिकामा प्लॉट होता. त्याला रँच म्हणायचे. नंतर तिथे झपाट्यानं वॉर्नर ब्रदर्सच्या स्टुडिओचं काम सुरू झालं आणि हळूहळू व्हर्डूगो डोंगरांचा आमचा व्ह्यू नष्ट झाला. शेजारीपाजारी एकमेकांशी बोलत नसत त्यामुळे कोण काय करतं हे समजत नसे. मात्र समोरून कुणी आलं तर लगेच स्मितहास्य करून 'हे, हाऊ डू यू डू', 'व्हॉट्सअप ब्रो' किंवा नुसतंच स्माईल करून मान डोलावणं सामान्य होतं. या बोलण्यानंतर मात्र एकदम मूग गिळून गप्प. मी कुणाशी बोलायला थांबायचो नाही परंतु वाटेतले दुकानदार, सीनियर सिटीझन, सिक्युरीटीवाले या सर्वांना हात उंचावून अभिवादन करायचो. असं करता करता बिल्डिंगमधला अ‍ॅन्ड्रू नावाचा फिल्म एडिटर मित्र झाला. त्याच्या बायकोची रीनाशी ओळख करून दिली.




आमचं सोशलायझेशन म्हणजे पंकजभाईंचा फोन आणि आमंत्रण. ते आणि त्यांची पत्नी वर्षाबेन आम्हाला कुठे कुठे घेऊन जायचे. एकदा त्यांना न कळवता मेमोरियल डेची सलग तीन दिवस सुट्टी आल्यानं आम्ही बसनं सॅन डिएगोला गेलो. तिथल्या जुन्या शहरात मुक्कामाला असताना पंकजभाईंचा फोन आला. त्यांना समजलं की सॅन डिएगोला आहोत, तर सांगून न गेल्यानं नाराज झाले. हळूच म्हणाले, पुढच्या वेळी जाल तर मला सांगून जा. तिथं आपल्या मॉटेलमध्ये राहायची व्यवस्था करू. मी आणि रीना एकदम आश्चर्यचकित झालो की पंकजभाईंच्या मालकीचं सॅन डिएगोसारख्या महागड्या शहरात मॉटेल आहे! आश्चर्याला पुढे पारावार राहिला नाही जेव्हा ते मला एकदा सरप्राइज म्हणून त्यांच्या लॉस एंजल्सजवळच्या दुसऱ्या मॉटेलचं इन्स्पेक्शन करायला सोबत घेऊन गेले. काय भारी माणूस होता राव. त्यांच्या साध्या राहणीमानावरून हा माणूस अमेरिकेतल्या कॅलिफोर्नियातला मिलीयनीअर आहे ह्यावर विश्वास बसत नव्हता. पंकजभाईंची मैत्री आमचं बरबँकमधलं वास्तव्य एकदम ढिंच्याक करून गेली. एकदा कोल्हापूरचे राजपुत्र संभाजीराजे छत्रपतींचा मेसेज आला की मराठी मंडळ लॉस एंजल्स साजरी करत असलेल्या शिवजयंती कार्यक्रमासाठी ते प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहेत. पुण्याचे माझे मित्र विक्रम काकडे यांच्यामुळे राजेंशी माझी ओळख होती. सेरिटोज-आर्टेशिया भागात महाराष्ट्र मंडळाचे विजय पाटील यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला हजर राहून अमेरिकेतली शिवजयंती पाहण्याचा आणि संभाजीराजे छत्रपती यांच्या सान्निध्यात काही काळ घालवण्याचा योग आला.

कुणी काही म्हणो, मला अमेरिका फार आवडते. तिथले निराधार लोकांचे प्रश्न, वर्णभेदावर आधारित काही प्रसंग वगळता बरबँक या शहराच्या आम्ही प्रेमात पडलो. पुन्हा अमेरिकावारीची संधी मिळाली तर सुरुवात बरबँकपासून करणार यात शंका नाही. ते आता आमचं कल्पनेत का होईना सेकन्ड होम झालं आहे.

**– जयंत नाईकनवरे**
timepeace2712@yahoo.com

uct

# UNIQUE CONCRETE TECHNOLOGIES PVT. LTD.

Building Dreams ❖ Crafting Spaces




-: Mission :-

*To create exceptional living Spaces that exceed expectations & enrich the lives of our customers*

**Core Business**
- Civil Construction
- Fabrication
- Structural Strengthening



**Sumit Sarfare**
**9869043030**

**Rajesh Murkar**
**9821151045**

**Milind Naik**
**9321170902**

**Unique Concrete Technologies Pvt. Ltd.**
110, Vasan Udyog Bhavan, Opp. High street phoenix
Lower Parel, Mumbai - 400013
**Tel :- 91-9869043030 / 22-35010718**
sumit@uct.co.in | web :- www.uct.co.in

# डॉ .प्रकाश खांडगे लिखित ‘लोकरंगनायक ’ पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशन समयी – अश्विनी भोईर, डॉ. मृण्मयी भजक, शैला खांडगे, राजश्री काळे–नगरकर, वामन केंद्रे, लेखक प्रकाश खांडगे, ॲड. आशिष शेलार (सांस्कृतिक कार्यमंत्री), उल्हासदादा पवार, अभिराम भडकमकर, शिवाजी साटम, सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी**

---

ग्रंथाली प्रकाशित, प्रा.डॉ. प्रकाश खांडगे लिखित ‘लोकरंगनायक’ या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲडव्होकेट आशिष शेलार आणि माजी विधानपरिषद सदस्य मा. उल्हासदादा पवार यांच्या हस्ते मंगळवार, १२ मे २०२६ रोजी मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिराच्या पु.ल. कलाअकादमी येथे झाले. याप्रसंगी प्रसिद्ध नाटककार पद्मश्री वामन केंद्रे, लेखक–नाटककार अभिराम भडकमकर, लावणीसम्राज्ञी राजश्री काळे–नगरकर, ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम आणि ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

प्रकाशन समारंभात बोलताना, ‘महाराष्ट्रात जेवढ्या लोककला आहेत, तेवढ्या लोककला अन्य कोणत्या राज्यात असतील असे वाटत नाही. ही महाराष्ट्राची श्रीमंती आहे.’ असे ॲड. आशिष शेलार म्हणाले. डॉ. प्रकाश खांडगे हा ध्येयवेडा, ध्यास असलेला माणूस आहे. हिंदुस्थान लिव्हर–मध्ये चांगली नोकरी असताना, ती बाजूला सारून केवळ नि केवळ लोककलेसाठी त्यांनी स्वतःचे आयुष्य समर्पित केले, अशा शब्दांत आशिष शेलार यांनी डॉ. खांडगे यांच्या कार्याचा गौरव केला.

माजी विधानपरिषद सदस्य उल्हासदादादा पवार यांनी भाषणातून लोककलेच्या क्षेत्रातील अनेक आठवणी सांगत लोक कलावंतांच्या प्रतिभेचा पट मांडला. डॉ. प्रकाश खांडगे म्हणाले, की ‘लोकरंगनायक’ हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातील उपेक्षित लोकदीक्षितांच्या कार्याचा परिचय आहे. या पुस्तकाच्या वाचनातून मनोरंजन व प्रबोधन दोन्ही गोष्टी साध्य होतात. ग्रंथाली ही केवळ पुस्तक प्रकाशित करणारी प्रकाशन संस्था नाही आहे. सामजिक बांधिलकी जपणारी संस्था असा ग्रंथालीचा लौकिक होता व आजही आहे. अशी एक संस्था आपले पुस्तक प्रकाशित करत आहे, याबदल लेखक प्रकाश खांडगे यांनी आनंद व्यक्त केला.

पद्मश्री वामन केंद्रे भाषणात म्हणाले, महाराष्ट्राच्या लोककलेला कणा देण्याचे काम प्रकाश खांडगे यांनी केले आहे. नाटककार व लेखक अभिराम भडकमकर यांनी ’लोकरंगनायक’ पुस्तकाविषयी सविस्तर मांडणी केली. ते म्हणाले की लोककलेचा संपूर्ण इतिहास या पुस्तकाच्या माध्यमातून समजून घेता येतो. पुस्तकात तेरा लोकनायकांची केवळ माहिती नाही, तर त्यांच्याशी मारलेल्या गप्पांमधून लोककलेचा इतिहास उलगडत जातो.

लावणीसम्राज्ञी राजश्रीताई काळे–नगरकर म्हणाल्या की डॉ. प्रकाश खांडगे म्हणजे लोककलेचे चालतेबोलते विद्यापीठ आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे, शाहीर यशवंत जाधव आणि सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्रगीत व पोवाडा सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले.

# सारिका कुलकर्णी लिखित 'चित्तर-बित्तर' या पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशन समयी – मंदार भारदे, मुकेश माचकर, लेखिका सारिका कुलकर्णी, पुरुषोत्तम बेर्डे, भूषण कुलकर्णी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. मृण्मयी भजक, धनश्री धारप, अश्विनी भोईर**

ग्रंथाली प्रकाशित सारिका कुलकर्णी लिखित 'चित्तर–बित्तर' या पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध लेखक, सिने–नाट्य दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांच्या हस्ते शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या मिनी थिएटरमध्ये झाले. याप्रसंगी 'मार्मिक'चे कार्यकारी संपादक मुकेश माचकर व 'मॅब एव्हिएशन'चे कार्यकरी संचालक आणि लेखक मंदार भारदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'एरवी नाटक, सिनेमा यात व्यग्र असलेल्या मला चित्तर–बित्तर या पुस्तकामुळे आपणही लेखक आहोत आणि व्यक्तिचित्रणात्मक लेखन आपणही केले आहे, याची पुन्हा एकदा आठवण झाली.' असे म्हणत पुरुषोत्तम बेर्डे यांनी पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. ग्रंथालीचा लोगो माझे गुरू शांताराम पवार यांनी तयार केला होता अशी आठवण पुरुषोत्तम बेर्डे यांनी सांगितली.

चित्तर–बित्तर या पुस्तकाला ज्यांनी ब्लर्ब लिहिला आहे ते लेखक मंदार भारदे यावेळी बोलताना म्हणाले, 'सारिका कुलकर्णी यांचे लेखन नर्मविनोदी शैलीतील आहे. हे पुस्तक वाचल्यावर जाणवले की आपल्या आजूबाजूला इतके काही अभद्र वातावरण असताना ही लेखिका त्यातील भद्र गोष्टी वेचते आणि आपल्या लेखनात मांडते. ही दृष्टी व शैली फार कमी जणांकडे असते.'

या पुस्तकाला लेखक मुकेश माचकर यांची प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकातील लेख ते संपादित करत असलेल्या 'मार्मिक' साप्ताहिकामधून प्रकाशित झाले होते. यासंदर्भात बोलताना माचकर म्हणाले, 'सारिका कुलकर्णी यांनी मला व्यक्तिचित्रणात्मक लेख लिहिणार असे सांगितले तेव्हा माझी प्रतिक्रिया 'काय?' अशी होती. कारण आपल्याकडे पुलंनी केलेले अफलातून व्यक्तिचित्रण आजही लोकांच्या मनात आहे आणि तो मापदंड अशाप्रकारचे लेखन वाचताना वाचकांच्या मनात असतो. परंतु, सारिका कुलकर्णी यांनी आपल्या सहज शैलीत चित्तर–बित्तरमधील लेख लिहिले आहेत. त्यावर कोणाचा पगडा नाही वा अनुकरण नाही. त्यामुळे हे लेख वाचनीय झालेत.'

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविकातून ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पुस्तकाबद्दल ते म्हणाले, 'चित्तर–बितर पुस्तकातील पात्रे आपल्या आजूबाजूला वावरणारी माणसे आहेत आणि ती सारिका कुलकर्णी यांनी कोणताही अभिनिवेश न आणता साध्यासरळ नर्मविनोदी शैलीत चितारली आहेत. या पुस्तकातील लेख नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरतील.

लेखिका सारिका कुलकर्णी यांचे पती भूषण कुलकर्णी यांनी सारिका यांच्या लेखनामागील प्रक्रिया अतिशय हलक्याफुलक्या शैलीत हास्यविनोद करत मांडली. तर लेखिका सारिका कुलकर्णी आपल्या मनोगतात म्हणाल्या, 'बे दुणे पाच' हे माझ्या आंनदाचे बाय प्रोडक्ट होते तर 'चित्तर–बित्तर' हे माझ्या आनंदाचे निधान आहे. मी लेखनातून मिळणाऱ्या आनंदासाठी लिहीत असते. ॲडव्होकेट जयेश वाणी यानी चित्तर–बित्तरमधील एका लेखाचे अभिवाचन केले. पुस्तक प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले.

# ‘यश म्हणजे काय? (भाग ३)’ पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशन समयी – जितेंद्र खेर, अश्विनी भिडे–देशपांडे, शरद काळे, सौरभ राव, अश्विनी भिडे, लेखिका शिल्पा खेर, शर्मिला पिंपळोलकर, ज्येष्ठराज जोशी, मृदुला भाटकर, सुमित्रा बाल्मिक, दमयंती तांबे, मिलिंद बल्लाळ, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. मृण्मयी भजक**

‘ग्रंथाली’ आणि ‘भाग्यश्री फाऊंडेशन’ यांच्या संयुक्त विद्यमाने, ’ठाणे वैभव’च्या सहकार्याने शिल्पा जितेंद्र खेर लिखित ‘यश म्हणजे काय? (भाग ३)’ या पुस्तकाच्या मराठी तिसऱ्या भागाचे व त्याच्या प्रथम हिंदी आवृतीचे प्रकाशन पद्मभूषण मा.डॉ. ज्येष्ठराज जोशी यांच्या हस्ते मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झाले. याप्रसंगी पुस्तकात मुलाखत समाविष्ट असेलेले खासदार सुमित्रा बाल्मिक, माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शरद काळे, वॉर विडो असोसिएशनच्या अध्यक्ष दमयंती तांबे, शास्त्रीय गायिका पद्मश्री अश्विनी भिडे–देशपांडे हे मान्यवर उपस्थित होते. ठाणे महानगरपालिकेच्या महापौर शर्मिला पिंपोळकर आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. ज्येष्ठराज जोशी यांनी ’यशाचं टाइमटेबल’ या विषयावर आपले विचार मांडले. यश प्राप्त करण्यासाठी मनाची एकाग्रता, संयम, चिकाटी आणि नम्रता हे गुण आवश्यक आहेत, असे डॉ. जोशी भाषणात म्हणाले. तसेच, आपल्या देशातील दरडोई उत्पन वाढवण्यासाठी आयात कमी करून स्वदेशी उत्पादनांच्या निर्मितीवर भर दिला पाहिजे, ज्यातून असंख्य बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल व देशाचे दरडोई उत्पन्न वाढेल, असे विचार विविध उदाहरणे देत त्यांनी मांडले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ज्यात ग्रंथालीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असेही डॉ. जोशी म्हणाले.

पुस्तकात ज्यांच्या मुलाखती समाविष्ट आहेत, त्या मान्यवरांनी यश म्हणजे काय याविषयी विचार मांडले. डॉ. शरद काळे म्हणाले की ज्ञानासोबत शहाणपण हवं, यशासोबत जबाबदारीचे भान हवे आणि राक्षसी महत्त्वाकांक्षा असता कामा नये, तर महत्त्वाकांक्षेसोबत संवेदनशीलता हवी. खासदार सुमित्रा बाल्मिक म्हणाल्या की समाजात काम करताना धैर्य आणि तर्कनिष्ठता हवी. यश प्राप्त करण्यासाठी ‘दिलमें जुनून चाहिये’ असे त्या म्हणाल्या. दमयंती तांबे यांनी, लग्नानंतर पती लेफ्टनंट १९७१च्या युद्धात मिसिंग झाल्यानंतर दुःखात बुडून न जाता परिस्थितीतून मार्ग काढत, स्वतःचे आयुष्य सावरत, आज त्या वॉर विडो असोसिएशनच्या अध्यक्ष म्हणून कशाप्रकारे काम करत आहेत या विषयी प्रेरणादायी विचार मांडले. शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे–देशपांडे म्हणाल्या की रियाज करताना ज्या दिवशी तंबोरा मला कौल देतो, तुझे स्वर चांगले लागले आहेत, ते माझ्यासाठी यश आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांची छोटेखानी मुलाखत घेतली. आपली बलस्थाने कोणती, या प्रश्नाला उत्तर देताना अश्विनी भिडे म्हणाल्या, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सकारात्मकता ही त्यांची बलस्थाने आहेत. नागरिकांच्या



**अश्विनी भिडे यांची मुलाखत घेताना न्या. मृदुला भाटकर**

सहभागविषयी बोलताना त्या म्हणाल्या, की सार्वजनिक ठिकाणी वावरताना नागरिकांनी घटनेने दिलेल्या हक्कांसोबत आपल्या जबाबदारीचे भानसुद्धा ठेवले पाहिजे, ज्यातून एखाद्या शहराचे अनेक प्रश्न सुटू शकतात. जीवनात पैशांचे महत्त्व काय, या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या की 'easy money is not real money' कष्ट करून स्वतःच्या क्षमतेवर भरपूर पैसा मिळवा आणि मिळालेल्या पैशांचे योग्यप्रकारे नियोजन करा. प्रेक्षकांमध्ये बसलेल्या विद्यार्थ्यांना अश्विनी भिडे यांनी विशेषत्वाने सांगितले की आज शाळा–महाविद्यालयांत शिकवल्या जाणाऱ्या शिक्षणासोबतच तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञान मिळवण्याचे अनेक स्रोत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता असणे महत्त्वाचे आहे. मृदुलाताईचे नेमके प्रश्न आणि अश्विनी भिडे यांनी मनमोकळी दिलेली उत्तरे यामुळे मुलाखत रंगत गेली.

कार्यक्रमात ठाणे महानगरपालिकेच्या महापौर शर्मिला पिंपोळकर, लेखिका शिल्पा खेर, डॉ .जितेंद्र खेर, 'ठाणे वैभव'चे संपादक मिलिंद बाल्लाळ यांनीदेखील आपली मनोगते व्यक्त केली. आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.

या पुस्तकाच्या जडणघडणीत योगदान देणारे मुखपृष्ठकार सतीश भावसार, प्रूफ रीडर श्वेता कासार, श्रीयांश कांबळे आणि भावना धोत्रे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. भावी अधिकारी घडवणाऱ्या ठाण्यातील चिंतामणराव देशमुख संस्थेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

## कवयित्री शर्मिला भट्ट यांच्या 'सेल्फी' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**प्रकाशनसमयी – धनश्री धारप, अश्विनी भोईर, डॉ. लतिका भानुशाली, गुरू ठाकूर, पद्मश्री वासुदेव कामत, उमेश गांधी, लेखिका शर्मिला भट्ट, ओंकार भट्ट, सुदेश हिंगलासपूरकर, राजीव जोशी**

कवयित्री शर्मिला भट्ट यांच्या 'सेल्फी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन २३ एप्रिल २०२६ रोजी, वांद्रे येथील ग्रंथाली–प्रतिभांगणच्या वास्तूत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार वासुदेव कामत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रसिद्ध गीतकार–कवी गुरू ठाकूर आणि उद्योजक उमेश गांधी उपस्थित होते. यावेळी बोलताना चित्रकार वासुदेव कामत म्हणाले, 'प्रत्येक जण तानसेन होऊ शकत नाही; पण कानसेन होऊ शकतो. त्याप्रमाणे प्रत्येक जण कवी होऊ शकत नाही; पण आपल्याकडे असलेल्या कविमनाने त्या कवितेचा आस्वाद घेऊ शकतो. ही रसिकता प्रत्येकाने जिवंत ठेवायला हवी.'

कवयित्री शर्मिला भट्ट मनोगतात आपला काव्यप्रवास मांडताना म्हणाल्या की, 'माणसाला आधी अक्षरओळख होते, मग शब्द आणि त्यांचे अर्थ कळू लागतात. त्यात भावभावना मिसळतात नि कविता जन्माला येते.' ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

गीतकार गुरू ठाकूर म्हणाले, की 'शर्मिला भट्ट यांनी प्रत्येकाच्या मनातील कविता लिहिली आहे, हे 'सेल्फी' या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. ते असेही म्हणाले की मोबाइल पाहणाऱ्यांच्या गर्दीत पुस्तक वाचणारी माणसे आहेत या श्रद्धेवर पुस्तक प्रकाशित करणाऱ्या माणसांना आपण पाठिंबा दिला पाहिजे.

ग्रंथालीच्या विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी भाषणातून 'सेल्फी' या काव्यसंग्रहाची सौंदर्यस्थळे उलगडली. त्या म्हणाल्या, 'जीवनसमावेशक अनुभवसंचित 'सेल्फी' काव्यसंग्रहात उमटले आहे, ज्यामुळे यातील कवितेचा प्रवास केवळ एका व्यक्तीच्या प्रवासापुरता मर्यादित न राहता व्यक्तीकडून समष्टीकडे होतो.'

शर्मिला भट्ट यांना गुरुस्थानी असणारे उद्योजक उमेश गांधी भाषणात शर्मिला भट्ट यांच्याबद्दल बोलताना म्हणाले, की 'शर्मिला या अतिशय जिद्दी आहेत. एखादी गोष्ट करायची ठरवल्यावर त्या ती करतातच. मागील वर्षी त्या म्हणाल्या होत्या की त्या पुस्तक करणार आहेत आणि त्यांनी ही गोष्ट करून दाखवली.'

शर्मिला यांचे सुपुत्र ओंकार भट्ट यांनीही अनौपचारिकपणे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे निवेदन अश्विनी भोईर यांनी केले.

# सुप्रिया देवस्थळी लिखित 'दिल्ली डायरी'चे दिल्लीत प्रकाशन



**प्रकाशनसमयी – डॉ. लतिका भानुशाली, विनय सहस्रबुद्धे , नतीन गडकरी , लेखिका सुप्रिया देवस्थळी, धनश्री धारप**

२१ एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्युशन ऑफ इंडिया इथे ज्येष्ठ सनदी अधिकारी सुप्रिया देवस्थळी यांनी लिहिलेल्या, 'दिल्ली डायरी' या ग्रंथाली प्रकाशित पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. पुस्तकाला प्रस्तावना लिहिणारे भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे माजी अध्यक्ष आणि माजी राज्यसभा सदस्य विनय सहस्रबुद्धेही कार्यक्रमाला उपस्थित होते.

ग्रंथालीच्या विश्वस्त, संपादिका डॉ. लतिका भानुशाली यांनी ग्रंथालीची वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यातली महत्त्वाची भूमिका विषद केली. ग्रंथालीच्या विविध उपक्रमांबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली.

पुस्तकाच्या लेखिका सुप्रिया देवस्थळी यांनी आपल्या मनोगतात ग्रंथालीशी तरुण वयापासून असणाऱ्या नात्याबद्दल सांगितले. सरकारी नोकरीतल्या बदलीच्या निमित्ताने त्या दिल्लीत आल्या आणि इथल्या आठ–नऊ वर्षांच्या वास्तव्यात त्यांना आलेल्या अनुभवांचे तटस्थ चित्रण त्यांनी 'दिल्ली डायरी' या पुस्तकात केले आहे, असे नमूद केले. दिल्लीत आल्यापासून रोजच्या जगण्यातल्या भाजीखरेदीपासून कार्यालयात मंत्र्यांचे ब्रीफिंग करणे, कॅबिनेट नोट तयार करणे असे सर्व प्रकारचे अनुभव घेतले आणि या अनुभवांबद्दलच या पुस्तकात आपण लिहिले आहे असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

विनय सहस्रबुद्धे यांनी आपल्या भाषणात 'दिल्ली डायरी' हे पुस्तक दिल्लीत नव्याने येणाऱ्या लोकांसाठी माहितीपर आणि मार्गदर्शनपर असेल असे म्हटले. मराठी भाषेचा आवर्जून वापर करून त्या भाषेच्या संवर्धनासाठी आपण हातभार लावला पाहिजे हाही मुद्दा त्यांनी आपल्या भाषणात मांडला.

नितीन गडकरी यांनी आपल्या नेहमीच्या खुसखुशीत शैलीत भाषण केले. दिल्ली आणि मुंबई यातले भौगोलिक अंतर कमी करण्याचा प्रयत्न आम्ही उत्तम रस्ते बांधून करतच आहोत, तरी या दोन शहरांमधले मानसिक अंतर जास्त आहे. ते संपेल यांची शाश्वती देता येत नाही अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली. दिल्लीचा आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक बाज वेगळा आहे त्यामुळेच बहुधा मराठी माणूस इथे यायला उत्सुक नसतो. मलाही पूर्वी दिल्ली आवडायची नाही. इथे फक्त पनीर आणि आलू मिळतात असेच मला वाटायचे. परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे, की आंतरराष्ट्रीय नकाशावर असणारे दिल्ली हे महत्त्वाचे शहर आहे, ती देशाची राजधानी आहे. आणि म्हणूनच दिल्लीत मराठी टक्का वाढला पाहिजे. दिल्लीत येऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल अशी आशा नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित भोसले, राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे सदस्य आणि निवृत्त परराष्ट्र व्यवहार सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, स्टील मंत्रालयाच्या सचिव म्हणून निवृत्त झालेल्या अरुणा लिमये–शर्मा, भारताच्या महालेखा नियंत्रक टीसीए कल्याणी, सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव मनमीत नंदा, केंद्रीय गृहमंत्रालयांचे अतिरिक्त सचिव प्रशांत लोखंडे, विदेश मंत्रालयात सहसचिव पदावर कार्यरत असणाऱ्या प्रतिभा पारकर, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला, महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड असे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुस्तकाचे अतिशय सजीव रेखाटन करणाऱ्या मैत्रेयी नामजोशी यांचाही विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन करणाऱ्या अमित भोळे यांचाही सत्कार ग्रंथालीच्या धनश्री धारप यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित भोळे यांनी केले.

# A
# Well
# Wisher

# Kuldeep Sing Suri

## Corporator
**Navi Mumbai Municipal Corporation**

# प्रसिद्ध कथा-कादंबरीकार वसंत नरहर फेणे यांची जन्मशताब्दी साजरी




**प्रकाशनसमयी – राजीव श्रीखंडे, शशिकांत फेणे, श्वेता फेणे, अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. देवदत्ता सिनकर, सुरेश सबनीस, रविमुकुल, प्र.ना. परांजपे, कुमार केतकर, श्रीहर्ष फेणे, कौस्तुभ फेणे, सीमा सिनकर, साची फेणे, स्नेहा फेणे, खोरशेद फेणे**

ग्रंथाली आणि फेणे कुटुंबीय यांनी संयुक्तरीत्या लेखक वसंत नरहर फेणे यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त 'वसंत नरहर फेणे – व्यक्तित्व आणि साहित्य' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन १ मे २०२६ रोजी, पुल देशपांडे मिनी थिएटर, रवींद्र नाट्यमंदिर येथे केले होते. याप्रसंगी मराठी साहित्याचे अभ्यासक व समीक्षक प्र.ना. परांजपे संपादित, वसंत नरहर फेणे लिखित, एका लेखाचा समावेश करून, त्यांच्या निवडक कथांच्या 'ध्वजा' या संग्रहाच्या नवीन आवृतीचे, आणि अरुण जोशी यांनी संपादन केलेल्या त्यांच्या जीवन–साहित्यावर निर्मित पुस्तिकेचे प्रकाशन झाले. ते प्र.ना. परांजपे, ज्येष्ठ पत्रकार–संपादक कुमार केतकर, प्रा. सुरेखा सबनीस, चित्रकार रविमुकुल, सुदेश हिंगलासपूरकर आणि फेणे कुटुंबीयांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते प्रदीप वेलणकर यांनी 'मृत्युचिये द्वारी' या लेखातील, ज्येष्ठ अभिनेते प्रमोद पवार यांनी 'सेन्ट्रल बस स्टेशन' या कादंबरीतील, स्नेहा फेणे यांनी 'रागिणी' कथेतील आणि श्वेता फेणे यांनी 'कारवारची माती' या कादंबरीतील निवडक अंशाचे अभिवाचन केले. या कार्यक्रमाच्या सूत्रधार डॉ. निर्मोही फडके यांनी फेणे यांच्या साहित्यावर अभ्यासपूर्ण विवेचन करत कार्यक्रम पुढे नेला. त्याआधी फेणे यांचा जीवनपट उलगडणारी ध्वनिचित्रफीत दाखवण्यात आली. तिचे संहिता–दिग्दर्शन राजीव जोशी यांनी केले आहे.

प्रकाशन कार्यक्रमात ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, फेणे यांच्या कुटुंबाशी 'सेंट्रल बस स्टेशन' या कादंबरीच्या निमित्ताने आलेला संपर्क आज ४५ वर्षे आहे, श्रीहर्ष फेणे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या कार्यक्रमात ग्रंथालीला सहभागी होता आले याबद्दल आनंद होत आहे. फेणे यांच्या निवडक कथा–लेखांचे ऑडिओ बूक या प्रसंगी प्रकाशित करत आहोत व हे साहित्य ग्रंथाली वॉच आणि ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर विनामूल्य उपलब्ध करत आहोत असे सांगितले. प्रदीप वेलणकर, प्रमोद पवार, राजन पाटकर, श्रीनिवास नार्वेकर आणि डॉ. मृण्मयी भजक यांनी या साहित्याचे वचन केले आहे.

मुख्य वक्त्यांनी फेणे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या साहित्याचा मागोवा घेतला. वसंत नरहर फेणे यांच्याशी मित्रत्वाचे नाते असलेले प्र.ना. परांजपे म्हणाले, ''फेणे त्यांचं साहित्य मला मित्रत्वाच्या नात्यानं वाचायला देत असत. परंतु त्यांनी कधीही पुस्तक ग्रंथालीनं छापावं असा आग्रह धरला नाही. 'सेंट्रल बस स्टेशन'प्रमाणे मीच 'कारवारी माती' हे पुस्तक आपण ग्रंथालीकडे द्यावं असं त्यांना सुचवलं आणि त्याप्रमाणे ते त्यांनी ग्रंथालीकडे दिलं.' कारवारी माती या कादंबरीत कुठेही कारवार या ठिकाणाचा उल्लेख नाही, मात्र त्यातील भावविश्व कारवारच्या मातीतील आहे, म्हणून या कादंबरीचं शीर्षक 'कारवारी माती' असं ठेवण्यात आलं असं सांगताना परांजपे यांनी भाषणात एक खंतही व्यक्त केली, की फेणे लिहीत होते तो काळ 'सत्यकथे'चा होता. त्या काळात सत्यकथेत लेखन छापून आलं की त्या साहित्याला व लेखकाला प्रसिद्धी नि थोडक्यात मान्यता मिळत असे. फेणे यांनी कधी आपलं लेखन सत्यकथेत छापून यावं यासाठी पाठपुरावा केला नाही, ते केवळ लिहीत राहिले. त्यामुळे त्यांना हवी तशी

प्रसिद्धी मिळाली नाही.

कुमार केतकर भाषणात म्हणाले, समाजाच्या नेणिवेचा स्वर फेणे यांच्या साहित्यातून प्रकट होताना दिसतो, ज्यामुळे त्यांचे साहित्य एका उंचीवर जाते. प्राध्यपिका सुरेखा सबनीस यांनी फेणे यांच्या कादंबऱ्यांवर दृष्टिक्षेप टाकला. त्या पुढे म्हणाल्या, की खरे तर फेणे यांच्या कादंबरीलेखनावर बोलायचे तर एक चर्चासत्रच घ्यावे लागेल, इतके कंगोरे त्यांच्या लेखनाला आहेत. त्यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले, की फेणे यांचं साहित्य उपेक्षित राहिले यात वाचकांची चूक नाही. आम्ही प्राध्यापक व समीक्षकांनी या लेखकाची योग्य दखल घेतली नाही, त्यामुळे त्यांचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचायला वेळ लागला. चित्रकार रविमुकुल यांनी फेणे यांच्या 'ध्वजा' या कथासंग्रहाच्या निर्मितीमागील आठवणीला उजाळा दिला. तसेच, ह.मो. मराठे यांनी दिवाळी अंकात घेतलेली, चित्ररेखाटनासाठी पाठवलेली फेणे यांची कथा वाचून आपण कसे प्रभावित झालो, ही आठवण सांगितली.

कार्यक्रमात वसंत फेणे यांचे पुतणे शशिकांत फेणे, त्यांचे धाकटे चिरंजीव कौस्तुभ आणि डॉ. देवदत्त सिनकर, सीमा सिनकर यांनी मनोगते व्यक्त केली. वसंत नरहर फेणे यांचे सुपुत्र श्रीहर्ष फेणे यांनी आत्मीयतेने सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन डॉ. लतिका भानुशाली यांनी केले.

## -: अभिनंदन :-





ग्रंथाली प्रकाशित, राजीव श्रीखंडे लिखित 'ग्लोबल साहित्यसफर' या ग्रंथास पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'रा. श्री. जोग स्मृती पुरस्कार' प्राप्त झाला. तो संस्थेच्या स्थानिक कार्यवाह सुनेत्रा मंकणी यांच्या हस्ते प्रकाशक म्हणून स्वीकारताना सुदेश हिंगलासपूरकर आणि लेखक म्हणून स्वीकारताना राजीव श्रीखंडे. सोबत संस्थेचे अध्यक्ष योगेश सोमण व इतर मान्यवर




## -: अभिनंदन :-

शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्टतर्फे जाहीर झालेल्या उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कारांचे वितरण आपटे वाचन मंदिराच्या बजाज सभागृहात झाले. यावेळी लक्षणीय गद्य साहित्यकृती पुरस्कार डॉ. सिसिलिय कार्व्हालो यांच्या 'प्रसादचिन्हे' या ग्रंथास मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते मिळाला. त्याबद्दल डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे अभिनंदन!

॥ग्रंथाली॥※॥ प्रतिभांगण

## 'हेमोफेलिया' आजाराविषयी डॉ. ममता मंगलानी यांच्याशी संवाद




**डॉ. ममता मंगलानी आणि सुधा हुजूरबाजार–तुंबे**

ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित 'काहीतरी विशेष' कार्यक्रम–मालिकेच्या २१व्या भागात, २२ एप्रिल २०२६ रोजी, लेखिका सुधा हुजूरबाजार–तुंबे यानी डॉ. ममता मंगलानी यांच्याशी 'हेमोफेलिया' या विषयावर संवाद साधला. डॉ. ममता या खार पश्चिमेतील सनॲक्ट इस्पितळातील रक्तरोग, कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांट विभागाच्या संचालक आहेत.

२१ दिव्यांगांपैकी एक असलेल्या हेमोफेलिया या आजाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी डॉ. ममता यांनी मुलाखतीच्या सुरुवातीला सांगितली. त्या मुलाखतीत म्हणाल्या, हेमोफेलिया हा आजार आनुवंशिक असून रक्त घट्ट होण्याशी संबंधित आहे. हेमोफेलिया या आजाराची लक्षणे सांगत, यासाठी कराव्या लागणाऱ्या रक्तचाचण्या, घ्यावायची काळजी; तसेच, कोणत्या गोष्टी कराव्यात–करू नयेत याचीही सविस्तर माहिती डॉ. ममता यांनी दिली. डॉ. ममता मंगलानी यांची ही मुलाखत ग्रंथाली–प्रतिभांगण या यूट्युब चॅनेलवर पाहता येईल.

## 'बहिअंधत्व एक अदृश्य वास्तव' संपदा शेवडे यांची मुलाखत




**संपदा शेवडे आणि सुधा हुजूरबाजार–तुंबे**

ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित काहीतरी विशेष कार्यक्रमाच्या बाविसाव्या भागात १९ जून २०२६ रोजी 'बहिअंधत्व एक अदृश्य वास्तव' या विषयावर सेन्स इंटरनॅशनल इंडियाच्या संचालक संपदा शेवडे यांची मुलाखत लेखिका सुधा हुजूरबाजार तुंबे यांनी प्रतिभांगणच्या सभागृहात घेतली. संपदा शेवडे या ३० वर्षे दिव्यांगांच्या क्षेत्रात कार्यरत असून बहिअंधत्व क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ आहेत.

मुलाखतीत संपदा शेवडे यांनी बहिअंधत्व म्हणजे काय, ते कसे ओळखावे, या मुलांशी संवाद कसा साधला जातो याचे प्रात्यक्षिकासह स्पष्टीकरण दिले. संपदा यांनी हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर डेफ ॲण्ड डेफब्लाइंड या शाळेच्या प्राचार्य म्हणून काम केले आहे. तेथील अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, 'त्या शाळेत गेल्यावर मी पाहिलं की या मुलांना दिसतही नाही आणि ऐकूही यत नाही. संवाद साधण्याची भाषाच त्यांच्याकडे नाही. डेफब्लाइंड मुलांच्या संवादाची परिभाषा मुलांना शिकवता शिकवता मी शिकत गेले आणि संवादाचं एक संपूर्ण नवीन जग हेलन केलर इन्स्टिट्यूटमध्ये समोर आले.' 'दिव्यांग मुलांच्या बाबतीत लवकरात लवकर त्यांचे निदान होणे आवश्यक आहे, ज्यामुळे त्यावरील उपाययोजना योग्य वेळी करता येतात,' असेही त्या म्हणाल्या. सेन्स इंडिया या संस्थेबद्दल माहिती देताना त्या म्हणाल्या की सेन्स इंडिया ही संस्था भारतातील २४ राज्यांमध्ये सेवा देत असून जवळपास ८४,००० विद्यार्थ्यांपर्यंत ही सेवा पोहोचत आहे. दिव्यांग मुलांना समाजात सन्मानाने, स्वावलंबी जीवन जगता यावे यासाठी ही संस्था शिक्षणापासून त्यांचे व्यावसयिक शिक्षण, रोजगार उपलब्ध करून देणे अशा सर्व स्तरांवर कार्यरत आहे. काहीतरी विशेष कार्यक्रमातील संपदा शेवडे यांची संपूर्ण मुलाखत ग्रंथाली–प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

## सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

# मोहन टांकसाळे यांची मुलाखत

सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मोहन टांकसाळे यांच्या 'बँकिंगचे अमर्याद विश्व' हे मराठी पुस्तक व त्याच्या हिंदी अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशनाच्या वर्षपूर्तीनिमित्त टांकसाळेसरांच्या मुलाखतीच्या




**मा. मोहन टांकसाळे, शरद कुमार आणि राजीव जोशी**

कार्यक्रमाचे आयोजन वांद्रे येथील ग्रंथालीच्या प्रतिभांगण या वास्तूत शनिवार, ९ मे २०२६ रोजी करण्यात आले होते. नाटककार, लेखक राजीव जोशी आणि बँकर शरदकुमार यांनी मोहन टांकसाळे यांची मुलाखत घेतली. टांकसाळे यांचा बँकिंगच्या क्षेत्रातील पाच दशकांचा अनुभव मुलाखतीत उलगडत गेला.

टांकसाळेसर मुलाखतीत म्हणाले, की Banking is mother of economy हे लक्षात ठेवून बँकरनी काम केले पाहिजे. बँकिंग म्हणजे केवळ जमाखर्चाचा ताळेबंद नव्हे. लोकांची दुःखं, समस्या समजून घेऊन काम केले तर balance sheet आपोआपच वाढत जाते. टांकसाळेसरांनी आपल्या बालपणीच्या काही आठवणी सांगत, ते या क्षेत्रात कसे आले हा प्रवासही मुलाखतीतून सांगितला. डिजिटल बँकिंग, फिन्टेक बँकिंग, सर्वसमावेशक बँकिंग अशा विविध पैलूंविषयी मुलाखतीतून सरांनी माहिती दिली. बँकिंगच्या क्षेत्रातील पाच दशकांच्या प्रवासाकडे आपण कसे बघता या प्रश्नाला उत्तर देताना टांकसाळे सर म्हणाले, की माझा पाच दशकांचा प्रवास हा सतत शिकण्याचा आणि बदल स्वीकारण्याचा प्रवास आहे. संस्थात्मक विकासाबरोबरच मी मानवी नातेसंबंध जपले याचे मला समाधान आहे. ते पुढे असेही म्हणाले की क्लर्क म्हणून मी बँकेत कामाला लागलो तेव्हा मनात निश्चय केला होता की ही फक्त सुरुवात आहे, आपल्याला बराच मोठा प्रवास करायचा आहे नि तो मी माझ्या निश्चयाप्रमाणे पूर्ण केला.

मोहन टांकसाळे यांची प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण मुलाखत आपल्याला ग्रंथाली–प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. कार्यक्रमाला अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव सपत्नीक आवर्जून उपस्थित होते. मंदार म्हात्रे यांनी 'बँकिंगचे अमर्याद विश्व' या पुस्तकाची पार्श्वभूमी सांगितली. कार्यक्रमातील मान्यवरांचे आणि सुनील चव्हाण व सतीशकुमार भुकटे यांचे स्वागत ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि संपादक अरुण जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन धनश्री धारप यांनी केले तर अश्विनी भोईर यांनी सूत्रसंचालन केले.

---

## 'साहित्यव्रती' कार्यक्रमात 'न्यूज स्टोरी टुडे'च्या प्रकाशक

# अलका भुजबळ यांची मुलाखत




**अलका भुजबळ आणि अश्विनी भोईर**

ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित 'साहित्यव्रती' कार्यक्रमाच्या सातव्या भागात अलका भुजबळ यांची मुलाखत अश्विनी भोईर यांनी घेतली. अलका भुजबळ या 'न्यूज स्टोरी टुडे' या वेबपोर्टलच्या निर्मात्या, न्यूज स्टोरी टुडेच्या प्रकाशक आहेत. तसेच, 'ओळख' या यूट्यूब चॅनेलवर त्या विविध मुलाखतीदेखील घेतात. अलका यांनी मुलाखतीत एक प्रकाशक म्हणून साहित्यक्षेत्रात देत असलेल्या योगादानासोबतच लहानपणापासूनचा जीवनप्रवासही उलगडला. घरातील परंपरेच्या चौकटी ओलांडत शिक्षण घेत त्या कशा आत्मनिर्भर झाल्या हे त्यांनी मुलाखतीत सांगितले. कॅन्सर या आजाराशी झुंज देऊन पुन्हा एकदा आयुष्यात कशी भरारी घेतली त्या काळाच्या आणि त्यावर आधारित 'कॉमा' या पुस्तकाविषयीच्या आठवणी त्यांनी प्रेक्षकांना सांगितल्या. अलका भुजबळ यांची ही मुलाखत 'ग्रंथाली–प्रतिभांगण' या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

# ग्रंथपान




**चांगदेव काळे**

**९८६९२०७४०३**


**ग्लोबल साहित्यसफर (भाग २)**

**राजीव श्रीखंडे**




'ग्लोबल साहित्यसफर' या निवडक अभिजात जागतिक साहित्यकृतींचा रसास्वाद असलेले दोन खंड नुकतेच प्रकाशित झालेले आहेत. यांत जागतिक स्तरावरील मान्यवर अशा विविध भाषांतील साहित्यिकांचा व त्यांच्या साहित्यकृतींचा परिचय आस्वादक स्वरूपात मांडण्यात आलेला आहे. त्यानुसार दुसऱ्या खंडात १८ साहित्यिकांचा व त्यांच्या गाजलेल्या साहित्यकृतींचा समावेश आहे. ब्लादिमीर नाबोकॉव्ह, आर्थर कोस्लर, दीनो बुझ्झाती, गॅब्रियल गार्सिया मार्केझ, हार्मन मेलव्हील, स्पॉट फिट्झजेरॉल्ड, मशाडो जेसिस, रॉबर्ट मुसिल, योहान ऑगस्ट स्टिंडबर्ग, सिंक्लेअर लुईस, अल्डस हक्सले, ज्युसेपे तोमासी व लॅम्पेडुसा, ओनोरे द बॅल्झॅक, थॉमस मान, फ्योडोर डोस्कोव्हस्की, बोरिस पास्टरनाक, स्टीफन झ्वाईग, जॉर्ज ऑरवेल या साहित्यिकांचा यात समावेश आहे. हे सर्वच साहित्यिक जागतिक स्तरावरील नोबेल या सर्वोच्च सन्मानाच्या पात्रतेचे, पैकी तीन हे या पुरस्काराने सन्मानित झालेले आहेत.

या थोर साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचा, लेखनाच्या प्रवासाचा, त्यांनी घेतलेल्या जीवानुभवाचा जो आलेख आपण वाचतो तेव्हा लक्षात येते, की आपण एका मोठ्या प्रचंड साहित्याच्या गुहेत वावरत आहोत. या साहित्यिकांनी लिहिलेले साहित्य सर्व रागलोभ आणि जीवनाशी निगडित असलेल्या भावभावनांचे चित्रण करतातच; परंतु या साहित्यात माणूस हा केंद्रस्थानी असून त्याच्या जगण्याचा अर्थ आणि भान लक्षात घेऊन ती कशी प्रकट केलेली आहेत व त्यातून जीवनमूल्ये कशी व्यक्त झालेली आहेत, यांचे वास्तववादी दर्शन या साहित्यातून आपल्याला होते. रसिकवाचक म्हणून ज्यांना जागतिक स्तरावरील साहित्य अभ्यासायचे आहे किंवा किमान वाचायचे आहे त्यांच्यासाठी उपयुक्त ठरावा असा महामार्ग म्हणजे 'ग्लोबल साहित्यसफर' होय. संदर्भ म्हणून संग्रही ठेवावा असा हा ऐवज आहे.

राजीव श्रीखंडे हे व्यवस्थापन व्यावसायिक आहेत. श्रीखंडे कन्सल्टंट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. उत्तम वाचक, साहित्याचे अभ्यासक आणि ग्रंथसंग्राहक आहेत. व्यवसायाच्या निमित्ताने होणाऱ्या प्रवासात आणि मिळवलेल्या एकांतात त्यांनी जे वाचन केलेले आहे ते किती अफाट आहे याचा प्रत्यय या 'ग्लोबल साहित्यसफरी'तून येतो.

त्यांच्या या अफाट वाचनज्ञानाचा रसिक वाचकांना परिचय व्हावा यापेक्षा रसिक वाचकांसाठी या अलौकिक साहित्यजगताचा परिचय व्हावा या प्रगल्भ हेतूने ग्रंथालीने यूट्यूब चॅनेलवर दरमहा पॉडकास्ट उपक्रम हाती घेतला आणि राजीव श्रीखंडे यांनी नियमितपणे हा खजिना आपल्या समोर ठेवला. ५० भाग झाल्यानंतर या प्रक्षेपणाचे अक्षरवाङ्मय म्हणून दोन खंड प्रकाशित केले आहेत.

राजीव श्रीखंडे हे या 'ग्लोबल साहित्य–सफर'मध्ये लेखक, त्याच्या साहित्यकृतींचा आणि आवडलेल्या/गाजलेल्या साहित्यकृतीवर भाष्य, अशा स्वरूपात आले आहेत. हे सगळे लेख वाचत असताना ते साहित्यिक आणि साहित्यकृती यांचे चिकित्सक, अभ्यासक, आणि एक रसिक म्हणून किती सखोल आहेत याचा परिचय आपल्याला होतो. प्रत्येक लेखाचा शेवटचा भाग महत्त्वाचा असून तो राजीव श्रीखंडे यांचाच आहे. लेखकाची लेखनशैली, निवेदन, जीवनानुभवाचे विश्लेषण, त्यातून सापडलेली मूल्ये, दृष्टिकोन, वैचारिकता, चिंतन, आशयाला भिडण्याची क्षमता, संवादातून व्यक्त होणारी समग्रता, या सगळ्यांचा राजीव श्रीखंडे मागोवा घेतात आणि त्यावर स्वतःचे अभ्यासपूर्ण भाष्य करतात. त्यांची ही चिकित्सकता रसिक म्हणून मान्य केली तरी ती कुठल्याही मानसशास्त्र, तत्त्वज्ञान आणि भाषाशास्त्राचा अभ्यासक यांच्या समकक्ष ठरावी.

'Words can be like X-rays if you use them properly they'll go through anything.You read and you're pierced.'
– अ‍ॅल्डस हक्सले

अशा अनेक उत्तम वाक्यांचा परिचय ते करून देतात. या परिचयात स्थळ आणि व्यक्ती यांच्या नावांचा उल्लेख इंग्रजीत कायम ठेवून त्यांचा उच्चार मराठीत केलेला आहे. हे साहित्य वाचत असताना आपण कुठेही विदेशी भाषेशी ठेचकाळत नाही.

त्यांचे लेखन संवादरूपात आहे. त्यात कुठेही साहित्य आणि साहित्यिक यांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची दक्षता घेऊन त्यांनी त्यावर आपले स्वतःचे स्वतंत्र भाष्य केलेले आहे आणि हे फार महत्त्वाचे आहे. तरीही त्यांनी 'या कलाकृती इतक्या मोठ्या आहेत की त्यावर समीक्षा करण्याची माझी पात्रता नाही हे मी जाणून आहे. या अभिजात साहित्यकृतींचा रसास्वाद घेण्याचा हा माझा माफक प्रयत्न आहे', अशी विनम्र भूमिका व्यक्त करतात.

प्रत्येक लेखाच्या खाली क्यू आर कोड दिलेला आहे. तो स्कॅन करून लेखाचा रसास्वाद आणि लेखाला अनुषंगिक फोटो, चित्रे, नकाशे आदी प्रत्यक्ष पाहात तो काळ अनुभवता येईल, ही सुविधा अभिनव आहे. याचे आशयगर्भ मुखपृष्ठ हेमंत जोशी यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ६०० रुपये । सवलतीत ३५० रुपये**

# ग्रंथपान

**प्रभात टॉकीजसमोर**
**संजीव फडके**




'आपल्याला माणूस डोळ्यांनी दिसतो, कानाने ऐकू येतो, तेवढाच तो खरा असतो का हो? तेवढाच माणूस आपण समजतो; पण खरा माणूस दडलेला असतो त्याच्या मनाच्या गाभ्यात! माणसाच्या आत दडलेला खरा माणूस शोधायचा असेल ना तर त्याचं हे दप्तर आपण तपासलं, तर तो आपल्याला नक्की सापडू शकतो. काय पटतं का?'

आपण कुठून आलो कसे आलो हे साधारणतः आयक्यू स्वरूपात असले तरी वास्तव सत्यच असते हे नाकारता येत नाही. लेखक राहतात ठाण्यामध्ये 'प्रभात' सिनेमाच्या समोर, भंडारआळीत. मात्र त्यांचं मूळ आहे शेगावजवळ असलेले बाळापूर. त्या अर्थाने वडील, आजोबा, आणि लेखक असा तीन पिढ्यांचा संपूर्ण कौटुंबिक इतिहास तपशिलासह इथे दिलेला आहे. 'भंडारआळी' का तर त्यावेळी ७० टक्के भंडारी समाज या भागात राहत होता म्हणून भंडारआळी. पण इतकेच नाही, भंडारआळी यालाही इतिहास आहे तू इथे सापडतो.

आपण ज्या शहरात राहतो ते पूर्वी भौगोलिक, सामाजिक, कौटुंबिक, या दृष्टीने तपासायचे असेल तर त्याचा संपूर्ण इतिहास आपल्याला माहीत असावा लागतो. अथवा आपण काही काळानंतर त्या इतिहासाकडे वळून पाहावे लागते. तो सगळा तपशिलाचा भाग नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो. ठाणे पूर्वी सर्वार्थाने कसे होते, याचा शोध घ्यायचा झाला तर इतिहासाची पाने चाळण्याची गरज नाही, संदर्भ शोधण्याची गरज नाही. संपूर्ण इतिहास संदर्भासह संजीव फडके या पुस्तकातून आपल्यासमोर ठेवतात. त्यातले बारीक बारीक तपशील वाचताना आपण अचंबित होतो. 'जुन्या खाणाखुणा आठवती पुन्हा पुन्हा', न्यू इंग्लिश स्कूल राम मारुती रोड, हे प्रकरण त्यासाठी अवश्य वाचावे.

१९४५ च्या आसपास ठाण्यात आलेले फडके कुटुंबीय. तेव्हापासून त्यांची कौटुंबिक माहिती देताना घरातील प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, वागण्याची, बोलण्याची पद्धत, नातेसंबंध, शिक्षण, त्यांचे आलेले अनुभव, असा संपूर्ण तपशील देऊन ती व्यक्तिरेखा ठसठशीतपणे साकारतात. यात कुठेही आडपडदा ठेवलेला नाही. नात्यांची गुंफण देखील इतकी हळुवारपणे केलेली आहे की त्यांची मुळे कुठपर्यंत पोहोचलेली आहेत याचा अंदाज येतो. जोडीला घर, अंगण, परिसर आहेच.

संजीव फडके यांचे हे आत्मकथन असल्याने ते केवळ प्रथम पुरुषी आणि स्वतःपुरतेच स्वतःला बांधून घेत नाहीत. संपूर्ण तपशील देत असताना यातले निवेदन तृतीय पुरुषी देखील होते. परंतु त्यामुळे कुठलाही रसभंग होत नाही, तर त्याचा आवाका अधिक विस्तृत झालेला दिसून येतो. प्रत्येक घटनेला स्थळ काळाचा - दिनांकाचा संदर्भ आहे. एखादी नियमितपणे स्वतःची डायरी लिहिलेली असावी त्याप्रमाणे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावरील खुणांची मोहर उमटविलेल्या काळाचा संपूर्ण पटच समोर उभा राहतो.

संजीव फडके यांची लेखनाची संवादी शैली इतकी सहज आणि भावणारी आहे की जणू आपल्याशी संवाद साधत, हितगुज करत ते कथन करत आहेत; आणि खात्री करण्यासाठी आपल्याला विचारताहेत, 'माझे म्हणणे रास्त आहे ना?' अनेक प्रसंगी त्यांच्या संवेदनशील हळुवार मनाची स्पंदने अलवारपणे आपल्याला साद घालताना दिसतात. बाबांच्या अखेरच्या दिवसांतले क्षण आणि स्वतःच्या नव्या आयुष्याला केलेल्या सुरुवातीचे क्षण, यांचे वर्णन वाचताना त्यांचा अनुभव येतो.

या लेखनात घटना आहेत, प्रसंग आहेत. घडणे, बिघडणे, सावरणे, पडणे, जिंकणे, आनंद-दुःख, श्रद्धा-अंधश्रद्धा यांना सामोरे जाणे, या सगळ्यांचा धाडोळा घेताना लेखक केवळ त्याविषयी बोलत नाही, त्यामागे असणारे कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्नही करताना दिसतात. अर्थातच चिंतन असल्याशिवाय आणि जगण्याकडे जागरूकपणे पाहिल्याशिवाय असे तत्त्व लेखनात सहजी येत नाही.

वर्तमानकाळात राहून भूतकाळाचा वेध घेताना संदर्भांची सुसंगती लागणे आवश्यक ठरते. यात गल्लत झाली तर लेखनाचा तोल बिघडू शकतो. मात्र याबाबत संजीव फडके यांनी अतिशय काटेकोर दक्षता घेतलेली दिसून येते. यासाठी त्यांनी लेखनात उपशीर्षकांची कल्पकता योजलेली आहे. अष्टग्रही, आकाशवाणी, संघर्षमय जीवनाची सुरुवात, जीवन चलने का नाम, जाने कहाँ गये वो लोग, काड्या-काड्या सांधून घरटं काढलं बांधून, आपल्याला जे सांगायचे आहे ते स्पष्ट व्हावे यासाठी ही योजना. त्यामुळे लेखनात सुटसुटीतपणा आला. एका विषयातून दुसऱ्या विषयात विषयांतर होण्याचा प्रश्नच शिल्लक राहिला नाही. एका अर्थाने लेखक म्हणून आणि वाचक म्हणून दोन्हीही भूमिका संजीव फडके यांनी लेखन करताना मनाशी निश्चित केलेल्या होत्या हे स्पष्ट होते. सोबत छायाचित्रे दिलेली आहेत तीसुद्धा काळाचा संदर्भ सोबत घेऊन आलेली आहेत.

प्रांजळ मनाने लिहिलेले हे आत्मकथन वाचत असताना आपण लेखनाशी एकरूप होतोच, शिवाय त्यांच्या जीवनप्रवासाचे साक्षीदार होत जातो. एक ठाणेकर म्हणून जसे ठाण्यात रमतो तसे मुंबई, नाशिक ते बाळापूर असा प्रवासही अनुभवत राहतो. अनेक काळानंतर आपले वाटावे असे एक उत्तम आत्मकथन अनुभवले याचा आनंद घेतो. तो प्रत्येकाने घ्यावा असेही सुचवावे वाटते.

सुप्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांनी शीर्षक आणि आशय यांना साजेसे असे अतिशय सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य ५०० रुपये । सवलतीत ३०० रुपये**
**(टपालखर्च : ५० रुपये)**

# ग्रंथपान

**चित्तर–बित्तर**
**सारिका कुलकर्णी**




'मी काय म्हणते, तुम्ही पुण्यात गेलात. कुठेतरी इल्कल साडी नेसलेल्या, अंबाड्याला गजरा लावणाऱ्या देखण्या काकू दिसल्या, त्यांच्याबरोबर असलेले काका तुम्हाला बघून 'वेलकम'च्या ऐवजी "congratulations' म्हणाले आणि नंतर त्यांनी काकूंकडे अभिमानाने बघितले की ओळखा की ते आमचे मुदुबिद्री काका–काकू आहेत. आयुष्य रसरसून जगणे शिकायचे असेल तर काका–काकूंशी ओळख वाढवा. त्यांचे आयुष्य म्हणजे उत्सव आहे.'

'चित्तर–बित्तर' हा सारिका कुलकर्णी यांचा दुसरा लेखसंग्रह. यापूर्वी त्यांचा 'बे दुणे पाच' हा महाराष्ट्र शासनाचा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कारप्राप्त लेखसंग्रह प्रकाशित झालेला आहे. या दोन्हीही लेखसंग्रहांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा आनंदरस!

विनोद हा स्वतंत्र साहित्यप्रकार आहे किंवा नाही या विषयी मतांतरे असू शकतील, परंतु 'बे दुणे पाच' आणि 'चित्तर–बित्तर' हे संग्रह आनंदरसाने पुरेपूर न्हाऊ घालणारे आहेत.

'चित्तर–बित्तर' हा लेखसंग्रह पूर्णपणे स्वतंत्र आहे. या संग्रहात १९ लेख आहेत आणि ते सर्व व्यक्तिचित्रणपर आहेत. व्यक्तिचित्रण करणे आणि तेही आपल्या आनंदमय रसाच्या शैलीत, हे सृजन वाटते तितके सोपे नाही. परंतु सारिका कुलकर्णी यांनी लिहिलेले हे लेख विनोदाचा बाज कायम ठेवलेला असून त्यावर त्यांची स्वतःची खास मुद्रा आहे. इथे कुठेही कुणाचा प्रभाव व अनुकरण दिसून येत नाही, इतके ते स्वतंत्र आहेत. ही गोष्ट खरी आहे, की या लेखांची पूर्वप्रसिद्धी 'मार्मिक'मधून नियमित सदरामध्ये झालेली आहे. परंतु हेही लक्षात यायला हवे की मुकेश माचकर यांच्यासारख्या जाणकार संपादकांच्या टेबलावरून उत्तीर्ण झाल्याची पोच त्यांनी मिळवलेली आहे. त्यामुळे उत्तम हे विशेषण तंतोतंत लागू पडते. याची पावती मुकेश माचकर यांनीच त्यांच्या प्रस्तावनेत दिलेली आहे, 'मुळात विनोदी लेखनासाठी काही एक अविर्भाव, एक पोज घ्यायची असते या सगळ्यातच ही लेखिका अडकत नाही. आजवर तरी न डहुळलेल्या, मिष्कील नजरेनं खुसखुशीत शब्दात भोवताल प्रयत्नपूर्वक उतरवते. अर्थात ते प्रयास वाचकांना न जाणवू देता. वाचक सहजगत्या त्या लेखनात उतरतो लेखिकेच्या नजरेने त्या व्यक्तींना पाहतो.'

या प्रत्येक लेखात एक व्यक्ती आपल्याला भेटते ती तिच्या स्वतःच्या वेगळ्या वैशिष्ट्यांसह. प्रत्येक व्यक्ती आपल्या लक्षात राहते ती त्यांच्या त्या वैशिष्ट्यांमुळेच. आणि हे वैशिष्ट्य लेखिकेने वेळोवेळी केलेल्या जाणीवपूर्वक निरीक्षणातून आलेले आहे. लेखिका स्वतःच त्यांच्या मनोगतात हे स्पष्ट करतात, की कोणत्याही माणसाचे बारकाईने निरीक्षण करणे हा त्यांचा आवडता छंद! माणसाच्या बोलण्याच्या, खाण्यापिण्याच्या लकबी, चालणे, बोलणे, आविर्भाव, विशिष्ट सवयी, छंद, असे सगळे नीट बघून नंतर त्यावर गमतीत बोलत राहणे हा आमचा ठरलेला टाइमपास होता. याचे कारण मी एक अत्यंत माणूसप्रेमी व्यक्ती आहे. त्यांच्या या छंदाची पुरेपूर प्रतीती प्रत्येक लेखातून येते, प्रत्येक व्यक्तीच्या वैशिष्ट्यातून येते. मग तो माथेरानला भेटलेला पितळे असो, पुण्याचा चंदू दुकानवाला असो, घरकाम करणारी चंद्रामावशी असो, नाशिकचे आप्पा भोसले असोत, गोव्याच्या ट्रिपमधील अभिमन्यू असो, की मसूरीचे ज्येष्ठ काकाजी असोत. या प्रत्येकाला साक्षात आपल्यासमोर उभे करण्याची क्षमता लेखिकेमध्ये आहे, आणि आपण त्याकडे त्यांच्या नजरेतून पाहू लागतो.

खरे तर विनोदी लेखन करणे वाटते तितके सोपे नक्कीच नाही आणि लिहायचे म्हणून लिहायचे असे ठरवून तर होतच नाही. मुळात त्यासाठी स्वतःकडे त्याचा अंगभूत ठेवा असावा लागतो आणि त्याचे भरणपोषण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. लेखिका सारिका कुलकर्णी यांच्याकडे हा ठेवा आहेच आणि त्याचे भरणपोषण करण्याचा जोमदार उत्साह–देखील आहे. त्यांची लेखनाची स्वतंत्र शैली आहे, ती सहजसोपी आणि प्रवाही आहे. कुठेही शब्दांची ओढाताण व वागण्याबोलण्यात विसंगती दाखवण्याचा प्रयत्न नाही. नैसर्गिक चित्रण नैसर्गिकरीत्या सादर करण्याची ही कला विशेषच!

याच ओघामध्ये आलेली जीवनानुभवाशी नाते सांगणारी वाक्येदेखील त्यांचे वेगळेपण दाखवून देतात, 'तिच्या मनात काय चाललं ते तर आपण वाटून घेऊ शकत नाही. बघा म्याडम, पण कष्ट तर थोडे वाटून घेऊ शकतो'. 'विरुद्ध दिशेने जाणाऱ्या मुंग्यांच्या रांगेत जशी एक मुंगी दुसऱ्या मुंगीला भेटल्याशिवाय पुढे जात नाही तशी रस्त्यात भेटणाऱ्या प्रत्येक माणसाशी बोलल्याशिवाय चंद्रामावशी पुढे जात नाहीत.' 'तो आनंदी राहण्यासाठी त्याचे तोडगे उत्तम आहेत हे त्याला सांगणे हाच त्याचा तोडगा आहे.'

मी काय म्हणते, हा प्रत्येक लेखाच्या शेवटचा भाग म्हणजे त्या लेखावर लेखिकेच्या मताची उमटवलेली मोहोरच!

सारिका कुलकर्णी यांची स्वतःची कौशल्यविकासाची कामे करणारी कंपनी आहे. विविध भारतीवर काही वर्षे त्यांनी निवेदिका म्हणून काम पाहिलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासोबतच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे पुरस्कार, श्रीस्थानक पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. विविध नियतकालिकांमधून त्यांचे लेखन प्रसिद्ध होत असते.

या लेखसंग्रहाला पुंडलिक वझे यांनी मुखपृष्ठाचा साज चढवलेला आहे. आतील लेखांना पूरक अशी रेखाचित्रे आशुतोष वाळे यांनी रेखाटलेली आहेत.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**
**(टपालखर्च : ५० रुपये)**

ग्रंथाली

# ग्रंथपान

## लोकरंगनायक
## डॉ. प्रकाश खांडगे




'लोकांना शांत करायचे तर पुन्हा तमाशा सुरू करण्याशिवाय पर्याय नव्हता. आईने लगेच निर्णय जाहीर केला, ती नातवाला घेऊन नांदेडला जाणार आणि आम्ही पुन्हा तमाशा सुरू करायचा. पोटच्या मुलाचे रक्ताळलेले शरीर बघून बेबी–ताईला अश्रू आवरत नव्हते; पण परिस्थिती अशी होती, की एकीकडे नाते होते तर दुसरीकडे कलेबद्दलची बांधिलकी. अखेर तिने आपल्या कलाधर्माला जागायचे ठरवले. आई बबलूला घेऊन नांदेडला दवाखान्यात गेली आणि आम्ही दुःख बाजूला ठेवून पुन्हा स्टेजवर गेलो.'

'लोकरंगनायक' या शीर्षकात सात अक्षरांचा समावेश आहे आणि ते शीर्षक सप्तरंगात मुरलेल्या रूपात ग्रंथाच्या मुखपृष्ठावर विराजमान झालेले आहे. दत्ता पाडेकर यांची ही कल्पकता ग्रंथाची अंतरंगातली आशयता सूचित करणारी आहे.

'लोकरंगनायक' या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेवर सहज नजर फिरवली तर लक्षात येईल की ज्यांच्याविषयी आपण वाचणार आहोत ते ज्या कलाप्रांतातून आलेले आहेत त्यांचा परिचय अगोदर होतो. जसे, गोंधळमहर्षी, तमाशातील सिद्धपुरुष वगसम्राट, महाराष्ट्राचे लोकविद्यापीठ, शाहिरीचे मुकुटमणी, शाहीरसम्राट, लोकशाहीर, लोकनागर रंगभूमीवरील अवलिया, विनोदाची जोडगोळी, कीर्तनातला ज्ञानदीप, बाहुलेकार, भारुडरत्न आणि विनोदसम्राट!

याचा अर्थ असा, की गोंधळ, जागरण गोंधळ, तमाशा, वग, शाहिरी, पोवाडा, कीर्तन अशा विविध लोककला होत. लोककलांचे हे वेगवेगळे प्रकार. या प्रत्येक प्रकारात ज्यांनी ज्यांनी म्हणून आपला ठसा उमटवलेला आहे आणि या कलेची सेवा आयुष्यभर समर्पित भावनेने केलेली आहे त्यांच्याविषयी ग्रंथकाराने अतिशय परिश्रमपूर्वक संशोधन केलेले आहे. त्यांची नावे राजारामबापू कदम, दत्तोबा तांबे – शिरोलीकर, दादू इंदुरीकर, पद्मश्री शाहीर साबळे, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर बाबूराव विभुते, विठ्ठल उमप, अशोकजी परांजपे, काळू–बाळू, ह.भ.प. रामदासबाबा मनसुख, परशुराम गंगावणे, रामचंद्र देखणे आणि रघुवीर खेडकर ही होत. या १३ व्यक्ती केवळ कलावंत आहेत असे नाही तर एक स्वतंत्र विद्यापीठ म्हणायला हवे अशा आहेत.

या व्यक्ती ज्या लोककलेच्या प्रांतात लौकिकाला पोहोचल्या त्या कलाप्रांताचा इतिहास, वैशिष्ट्ये, परंपरा, त्याचे मूळ प्रकार, संदर्भ, असा संपूर्ण तपशील लेखकाने संशोधनपूर्वक मिळवलेला आहे. ही संपूर्ण माहिती त्या कलाप्रांताची आपल्यासाठी निश्चितच नवीन आहे. आपण ज्या अपेक्षेने चरित्रनायकाच्या वैयक्तिक आयुष्याकडे आणि त्याच्या कुटुंबाकडे पाहतो तेव्हा त्याचा तपशील खूप विस्तृत स्वरूपाचा अपेक्षित असतो. परंतु कला आणि व्यक्ती यांचा समन्वय स्पष्ट करून दोघांनाही तितक्याच तोलामोलाने सादर करायचे तर कला आणि कलावंत इतक्याच परिप्रेक्ष्यात लक्ष केंद्रित करणे उचित ठरते. ग्रंथकाराने हेच भान प्रत्येक लेखाच्या बाबतीत राखलेले दिसून येते.

शाहीर हा भूतकाळाचा मार्मिक भाष्यकार, वर्तमानकाळाचा साक्षेपी साक्षीदार आणि भविष्यकाळाचा तत्त्ववेत्ता असतो, असे ग्रंथकार येथे नमूद करतात. त्याच अर्थाने लोककलेचा इतिहास समोर मांडताना तो काळ आणि सामाजिक परिस्थिती यांचाही आलेख दृढ होईल इतक्या कसोशीने काळजी घेतात. 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राजा बढे यांनी लिहिलेले महाराष्ट्रगीत ११ एप्रिल १९६९ रोजी सोलापूर येथे यशवंतराव चव्हाण यांनी शेतकरी मेळाव्यात शाहीर साबळे यांना सादर करण्यासाठी विनंती केली होती. हा संदर्भ 'राज्यगीता'च्या निमित्ताने महत्त्वाचा ठरतो.

स्वातंत्र्याच्या जनजागृतीचे कार्य करण्यासाठी त्या काळी जी कलापथके स्थापन झाली होती, त्यांची नावे आणि त्यात सहभागी होणारे अण्णाभाऊ साठे, अमर शेख यांच्यासारख्या अनेक शाहिरांची नावे दिलेली आहेत. दादू इंदुरीकर ज्यामुळे अधिक ओळखले गेले ते वगनाट्य 'गाढवाचं लग्न' परंतु याचे पुराणातील नाव 'चित्रसेन गंधर्वाची कथा' असे होते आणि त्याचे लेखक हरी वडगावकर होते, हे आपल्याला इथे कळते. आत्माराम पाटील यांची प्रत्यक्ष शाहिराच्या मुखावर असणारी 'ज्ञातीविसर्जनाची लावणी' ही वैशिष्ट्यपूर्ण संपूर्ण लावणी इथे वाचायला मिळते. कलावंतांची वैशिष्ट्ये सांगताना काळूबाळू विषयी ते लिहितात, 'काळूबाळू ही केवळ विनोदाची जोड गोळी नव्हती ते पाच पिढ्या चालत आलेले तमाशाची संस्कृती, अनुभव आणि शहाणपण होते.'

अशोकजी परांजपे यांच्याविषयी लिहितात, साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात ग्रामसंस्कृतीबद्दल परम आदर असणारा त्यांच्यासारखा थोर साहित्यिक दुसरा आढळणार नाही. शाहीर साबळे यांनी मराठी रंगभूमीवर जशी मुक्त नाट्याची नवी दिशा दिली तसेच मोबाइल थिएटरचे ते जनक ठरले.

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांनी संशोधन करून मुलाखती घेऊन आपल्यासमोर ठेवलेला 'लोकरंगनायक' ग्रंथ हा एक मौलिक ठेवा आहे. तो डॉ. प्रकाश खांडगे यांनी परिश्रमपूर्वक संशोधन करून अभ्यासकांच्या आणि वाचकांच्या हाती दिलेला आहे. या ग्रंथाला पद्मश्री विनायक खेडेकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे.

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांना सन २०१९ मध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते भारत सरकारचा संगीत नाटक अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये**
**(टपालखर्च : ५० रुपये)**


A
Well
Wisher




मुद्रक, प्रकाशन : डॉ. लतिका भानुशाली यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे त्रैमासिक ट्रिनिटी अकादमी फॉर कॉर्पोरेट ट्रेनिंग लिमिटेड पुणे सर्व्हे क्रमांक २६/५, नऱ्हे इंडस्ट्रियल एरिया, झील कॉलेज रोड, आंबेगाव, पुणे ४११०४१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, १०१, १/बी विंग 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटीसमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.